CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


विशेष पुरवणी

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | मंगळवार, ३१ मार्च २०२६ । वर्ष ४ थे अंक २३ । पाने १२+४ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# कुवेत, सौदीच्या ऊर्जा केंद्रांवर इराणचे हल्ले

## एका भारतीयाचा मृत्यू; १८ कामगार जखमी | तेल शुद्धीकरण प्रकल्पाचे काम थांबले



◆ **दुबई, ३० मार्च**

इस्रायल, अमेरिकेने इराणच्या अनेक शहरांवर केलेल्या हल्ल्यानंतर सोमवारी पहाटेपासून इराणने कुवेत, जॉर्डन आणि सौदी अरबच्या ऊर्जा केंद्रांना लक्ष्य करीत क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात कुवेत आणि सौदी अरबच्या चारपेक्षा अधिक वायू व तेल वायू प्रकल्पांचे नुकसान झाले. कुवैतमधील हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला, तर प्रकल्पात काम करणारे १८ कामगार गंभीर जखमी आहेत.

कुवेतच्या वीज, पाणी आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने सोमवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात तेल, वीज आणि पाणी शुद्धीकरण प्रकल्पाचे नुकसान झाले. हल्ल्यामुळे तेल व वायू प्रकल्पाचे काम थांबविण्यात आले. सोमवारी पहाटे झालेल्या हल्ल्यात भारतीय कामगाराचा मृत्यू झाला, तर १८ जण जखमी आहे. जखमींमध्ये नऊ सैनिकांचा समावेश आहे. हल्ल्यात तीन निवासी इमारतींना आग लागली.

मध्यपूर्वेतील संघर्षात मृत्युमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांची संख्या आठ झाली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तसेच वीजप्रकल्प पूर्ववत करण्यासाठी काम सुरू आहे. दुसरीकडे सौदी अरबमध्ये जीवितहानी झाली नसली तरी, तेल, वायू प्रकल्पांच्या पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. सौदी सरकारने नुकसानीचा अधिक तपशील जारी केलेला नाही. (वृत्तसंस्था)

### अमेरिकेचे ए-३२बी वाहतूक विमान नष्ट

**इराणने इराकची राजधानी बगदाद येथून २० किमी अंतरावर असलेल्या अमेरिकेच्या व्हिक्टरी लष्करी तळावर क्षेपणास्त्रांचा मारा केला. हवाई संरक्षण यंत्रणा क्षेपणास्त्र रोखण्यात अयशस्वी ठरले आणि तळावर तैनात असलेल्या ए-३२बी वाहतूक विमानाला आग लागली. इराकमधील या अमेरिकन लष्करी तळावर हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ आहे. हा तळ इराकमधील अमेरिकेचा सर्वात सुरक्षित मानला जातो. तथापि, हल्ल्याच्या वेळी तळावर सैन्य उपस्थित नव्हते, अशी माहिती इराकच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली.**

### हुथी, हिजबुल्लाहचे इस्रायलवर हल्ले

**येमेनमधील हुथी बंडखोरांनी सोमवारी इस्रायलच्या हैफा शहरावर ड्रोन क्षेपणास्त्रांचा मारा केला. इस्रायली हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच दोन ड्रोन आणि पाच क्षेपणास्त्र नष्ट केले. हे हल्ले येमेनमधून करण्यात आले होते. दुसरीकडे लेबनीज गट हिजबुल्लाहने उत्तर इस्रायल आणि दक्षिण लेबनॉनमध्ये इस्रायली सैनिकांवर हल्ला केला. उत्तर इस्रायलमधील मेटुआल शहराजवळ आणि दक्षिण लेबनॉनमधील खियाम नजरबंदी केंद्राजवळ सैनिकांच्या वाहनांना लक्ष्य केले.**

### माजी पंतप्रधानांच्या मालमत्तांची चौकशी

◆ **काठमांडू, ३० मार्च**

नेपाळचे पंतप्रधान बालेंद्र शाह यांनी चार माजी पंतप्रधान, तत्कालीन अधिकाऱ्यांच्या मालमत्तांच्या चौकशीचा आदेश दिला. यात केपी शर्मा ओली, पुष्प कमल दहल प्रचंड, शेर बहादूर देउबा आणि माधवकुमार नेपाळ यांचा समावेश आहे.

नवीन सरकारने १००-कलमी कृती योजनेचा भाग म्हणून माजी राष्ट्रप्रमुख, वरिष्ठ राजकारणी आणि नोकरशहा यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक आयोगाची स्थापना केली. या आयोगात कायदा, वित्त, महसूल आणि संशोधन क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात २००६ च्या नेपाळी क्रांतीनंतर प्रमुख पदांवर असलेल्या व्यक्ती, तर दुसऱ्या टप्प्यात १९९१ ते २००६ दरम्यान प्रमुख पदांवर असलेले नेते आणि त्यांच्या कार्यकाळातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या मालमत्तांची चौकशी केली जाणार आहे. (वृत्तसंस्था)



महावीर जयंतीच्या पूर्वसंध्येला धार्मिक विधी पार पाडताना जैन समाजाचे मुनी

# बंगालमध्ये १७३ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर आयोगाचा निर्णय

◆ **कोलकाता, २९ मार्च**

मुक्त आणि निष्पक्ष विधानसभा निवडणुका सुनिश्चित करण्याच्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून निवडणूक आयोगाने रविवारी पश्चिम बंगालमधील १७३ पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि निरीक्षकांच्या बदल्या केल्या. यात कोलकाता पोलिसांच्या अखत्यारीतील ३१ ठाण्यांचा समावेश आहे.

या फेरबदलांत कोलकातामधील भवानीपूर आणि पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील नंदीग्रामसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये तैनात अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. कूचबिहार, मालदा, मुर्शिदाबाद, बीरभूम, पश्चिम मेदिनीपूर, हावडा, उत्तर आणि दक्षिण २४ परगणा या जिल्ह्यांमध्ये प्रभारी निरीक्षक आणि प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्त असलेल्या निरीक्षकांचा आणि उपनिरीक्षकांचाही या बदल्यांमध्ये समावेश आहे.

आयोगाच्या आदेशानुसार, यापूर्वी विशेष कृती दलातील सौमित्र बसू हे भवानीपूर पोलिस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारतील. भवानीपूर मतदारसंघात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा सामना त्यांचे एकेकाळचे निकटचे सहकारी आणि आता कट्टर प्रतिस्पर्धी भाजपा नेते शुभेंदू अधिकारी यांच्याशी होणार आहे. त्यामुळे ममता बॅनर्जींचा हा दीर्घकाळापासूनचा बालेकिल्ला राज्यातील सर्वाधिक लक्ष वेधून घेणाऱ्या आणि अत्यंत चुरशीच्या लढतीचे केंद्र बनला आहे. (वृत्तसंस्था)

# इराणमधील ६०० शाळा, महाविद्यालये उद्ध्वस्त

**संघर्षामुळे मुले शिक्षणापासून वंचित**



◆ **तेहरान, ३० मार्च**

अमेरिका आणि इस्रायलने इराणमध्ये महिनाभरात दहा हजारांपेक्षा अधिक हल्ले चढविले. यात ६०० शाळा, महाविद्यालये आणि पाच विद्यापीठे उद्ध्वस्त झाली. हल्ल्यात अनेक विद्यार्थ्यांना आपले प्राण गमावले. संघर्षामुळे मुले शिक्षणापासून वंचित असल्याची माहिती मानवाधिकार संघटना रेड क्रेसेंट सोसायटीने दिली.

शैक्षणिक संस्थांना लक्ष्य करून अमेरिका मानवाधिकार नियमांचे उल्लंघन करीत आहे आणि युद्ध गुन्हेगारासारखे वागत आहे. सततच्या हल्ल्यांमुळे निष्पाप शाळकरी मुलांचे जीवन धोक्यात आले आहे. इतकेच नव्हे तर, विद्यापीठातील प्राध्यापक आणि विद्यार्थीही भयभीत आहेत. संयुक्त राष्ट्र आणि जगाने हस्तक्षेप करून युद्ध थांबविण्याचे प्रयत्न करावे आणि अमेरिका आणि इस्रायलला दोषी ठरवून कारवाई करावी, अशी मागणी सोसायटीने निवेदनातून दिली. (वृत्तसंस्था)

### लेबनॉनमधील हल्ल्यात शांतता सैनिकांचा मृत्यू

**दक्षिण लेबनॉनमधीव अदशित अल-कुसैर भागात इस्रायली तोफगोळ्यांच्या हल्ल्यात पाच संयुक्त राष्ट्र शांतता सैनिकांचा मृत्यू झाला. मृत पावलेले सैनिक इंडोनेशियाचे होते. संयुक्त राष्ट्र आणि इंडोनेशियाने हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. संयुक्त राष्ट्र शांतता दलाने निवेदनात म्हटले की, इस्रायलकडून शांतता सैनिकांना लक्ष्य करणे मानवतावादी कायद्यांचे उल्लंघन आहे.**

# चारधाम यात्रा वाहनांसाठी 'ग्रीन कार्ड'ची प्रक्रिया सुरू

◆ **डेहराडून, ३० मार्च**

उत्तराखंडमध्ये चारधाम यात्रा सुलभ आणि सुरक्षित करण्यासाठी परिवहन विभागाने कंबर कसली आहे. ३० मार्चपासून व्यावसायिक वाहनांसाठी 'ग्रीन कार्ड' तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

चारधाम यात्रा मार्गावरील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, व्यावसायिक वाहनांसाठी म्हणजेच बस, टॅक्सी, मॅक्सी यासाठी 'ग्रीन कार्ड' अनिवार्य दस्तऐवज आहे. वाहन आणि त्याचा चालक डोंगराळ रस्त्यांवर चालण्यासाठी पूर्णपणे योग्य आहेत याचा पुरावा हे 'ग्रीन कार्ड' आहे. याशिवाय कोणत्याही वाहनाला ऋषिकेशहून पुढे यात्रा मार्गावर जाण्याची परवानगी दिली जाणार नाही. परिवहन विभागाने वाहन मालकांच्या सोयीसाठी तीन प्रमुख ठिकाणी नोंदणी आणि तपासणी केंद्रे तयार केली आहेत. ऋषिकेश प्रवासाचा मुख्य थांबा असल्यामुळे येथे सर्वात मोठे केंद्र बनवले आहे. हरिद्वार येथील रोशनाबाद येथे एआरटीओ कार्यालयात स्थानिक आणि बाहेरील वाहनांसाठी व्यवस्था केली आहे. नारसन बॉर्डर येथे यूपी आणि इतर राज्यांतून येणाऱ्या वाहनांसाठी विशेष डेस्क स्थापित केला आहे. ग्रीन कार्ड जारी करण्यापूर्वी विभाग कागदपत्रांची सखोल तपासणी करणार आहे.

गर्दी टाळण्यासाठी परिवहन विभागाने ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधाही दिली आहे. वाहन मालक अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आवश्यक कागदपत्रे अपलोड करू शकतात. यानंतर केंद्रांवर जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करून कार्ड मिळवू शकतात. (वृत्तसंस्था)

**आवश्यक दस्तावेज**

- **वाहनाचे वैध फिटनेस प्रमाणपत्र**
- **अद्ययावत विमा आणि परमिट**
- **प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र**
- **चालकाचे हिल ड्रायव्हिंग लायसन्स (पहाडी लायसन्स) आणि अनुभव पत्र**
- **वाहनात फर्स्ट एड बॉक्स आणि अग्निशमन यंत्राची उपस्थिती**



कर्नाटकातील मंगळुरूजवळ गंजिमठ येथे आयोजित 'आयएमएससी ऑफ-रोड रॅली-२०२६' स्पर्धेत सहभागी झालेला स्पर्धक चिखलातून मार्ग काढताना

### गावकऱ्यांच्या हल्ल्यात दोन जवान जखमी

◆ **जम्मू, ३० मार्च**

जम्मू-काश्मीरच्या सांबा जिल्ह्यातील एका गावात सोमवारी पहाटेच्या सुमारास काही स्थानिक नागरिकांनी केलेल्या हल्ल्यात सीमा सुरक्षा दलाचे दोन जवान जखमी झाले. ही घटना पहाटे सुमारे १.३० वाजता घडली. यात एक निरीक्षक आणि एका उपनिरीक्षकाचा समावेश आहे. दोन्ही जवान सुपवाल भागातील गुज्जर बस्ती द्वारकापुरी येथे एका तपासासाठी गेले असता, स्थानिक लोकांच्या एका गटाने त्यांच्यावर हल्ला केला. यात ते जखमी झाले. त्यांना उपचारासाठी जवळच्याच एका वैद्यकीय केंद्रात दाखल करण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### मलायकाने घेतले आदिनाथ जैन मंदिरात दर्शन



**मुंबई :** चित्रपट अभिनेत्री मलायका अरोरा राजस्थानमधील पाली जिल्ह्यातील नारलाई येथील प्राचीन आदिनाथ जैन मंदिरात दर्शनासाठी पोहोचली. तिने मंदिरात प्रार्थना करून आशीर्वाद घेतला. मलायकाच्या आगमनाची माहिती मिळताच मंदिर परिसरात स्थानिक लोकांची मोठी गर्दी झाली. माहितीनुसार, मलायका अरोरा सध्या मारवाड प्रदेशात सुट्या घालवत आहे. ती नारलाई येथील रावला नारलाई या हेरिटेज हॉटेलमध्ये थांबली आहे. असे सांगितले जात आहे की, ती येथील नैसर्गिक सौंदर्य आणि शांत वातावरणाचा अनुभव घेत आहे. विशेष म्हणजे, नारलाई हे एक धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळ आहे. येथे तपेश्वर आणि जकाल नाथ महादेव मंदिर देखील आहेत. हा प्रदेश लेपर्ड सफारीसाठीही प्रसिद्ध आहे.

### सोनम कपूर दुसऱ्यांदा झाली आई



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री सोनम कपूर दुसऱ्यांदा आई झाली आहे. तिने मुंबईत मुलाला जन्म दिला. यापूर्वी तिला 'वायू' नावाचा एक मुलगा आहे. सोनम आणि तिचा पती आनंद आहुजा या जोडप्याने त्यांच्या अधिकृत समाज माध्यम खात्यावर माहिती दिली. अतिशय आनंद आणि प्रेमाने आम्ही हे सांगू इच्छितो की, आमच्या घरी एका मुलाचा जन्म झाला. आता आमचे कुटुंब मोठे झाले आहे आणि त्याच्या आगमनाने आमची हृदये आनंदाने भरून गेली आहेत. आम्ही आता चार लोकांचे कुटुंब बनून या नवीन सुरुवातीबद्दल खूप आभारी आहोत. प्रेमासह- सोनम, आनंद आणि वायू, असे त्यांनी पोस्ट करीत लिहिले आहे.

# नितीन नवीन यांचा आमदारकीचा राजीनामा

◆ **पाटणा, ३० मार्च**

राज्यसभेवर निवडून आल्यानंतर दोन आठवड्यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी सोमवारी बिहार विधानसभेच्या सदस्यपदाचा राजीनामा दिला. बांकीपूर मतदारसंघातील त्यांच्या आमदारपदाचा राजीनामा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष संजय सरावगी यांच्या मार्फत विधानसभा अध्यक्ष प्रेमकुमार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

पत्रकारांशी बोलताना कुमार म्हणाले, नतीन नवीन यांचा राजीनामा सरावगी यांनी माझ्याकडे सादर केला. तो स्वीकारण्यात आला आहे. पुढील औपचारिकता पूर्ण करण्यासाठी मी तो संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवला आहे.



**नितीश कुमारांनीही सोडले सदस्यत्व**

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही सोमवारी राज्य विधान परिषदेच्या सदस्यपदाचा राजीनामा दिला. नितीन नवीन आणि जदयूचे प्रमुख नितीशकुमार या दोघांचीही १६ मार्चला राज्यसभेवर निवड झाली होती. त्यामुळे या नेत्यांनी विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. (वृत्तसंस्था)

# अतिरिक्त झोप दूर ठेवते हृदयविकार

- ५३ हजारांपेक्षा जास्त प्रौढांचा केला अभ्यास
- व्यायाम, संतुलित आहारही महत्त्वाचा



◆ **वॉशिंग्टन, ३० मार्च**

आजच्या धावपळीच्या काळात अनेकांना झोपेच्या समस्या आहेत तसेच पुरेशी झोप न मिळाल्यामुळे अनेक मासिक आणि शारीरिक समस्या उद्भवत आहेत. थोडी अधिक झोप घेणे, थोडे अधिक व्यायाम करणे आणि दररोज काही प्रमाणात अतिरिक्त भाज्या खाणे यामुळे हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो, असे 'युरोपियन जर्नल ऑफ प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी'मध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनातून सिद्ध झाले आहे.

या अभ्यासात यूके बायोबँकमधील ५३ हजारांहून अधिक प्रौढांचा आठ वर्षांच्या कालावधीत मागोवा घेण्यात आला. तीन वर्तनांमध्ये अगदी किरकोळ सुधारणा केल्यानेही वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण फायदे होत असल्याचे आढळून आले. रात्री केवळ ११ मिनिटे जास्त झोप, ४.५ मिनिटांचा मध्यम ते तीव्र शारीरिक व्यायाम आणि पाव कप अधिक भाज्यांचे सेवन केल्याने हृदयविकाराचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो.

या एकत्रित उपायांमुळे हृदयविकाराचा झटका, पक्षाघात आणि हृदय निकामी होण्याचा धोका १० टक्क्यांनी कमी होतो, असे संशोधकांना आढळून आले. 'युरोपियन सोसायटी ऑफ कार्डिओलॉजी'नुसार, जे मोठे बदल करण्यास सक्षम होते, त्यांना अधिक फायदे मिळाले. सर्वोत्तम संयोजनामध्ये रात्री आठ ते नऊ तास झोपणे, दररोज ४२ मिनिटांपेक्षा जास्त मध्यम ते तीव्र शारीरिक व्यायाम करणे आणि चांगला आहार घेण्याचा समावेश होता. सर्वात कमी आरोग्यदायी जीवनशैली असलेल्या लोकांच्या तुलनेत, यामुळे गंभीर हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांचा धोका ५७ टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले.

संशोधकांनी स्मार्टवॉचसारख्या उपकरणांमधील माहिती वापरून झोपेच्या पद्धती आणि व्यायामाच्या पातळीचे विश्लेषण केले. सहभागींनी त्यांच्या आहाराच्या सवयींची माहिती देखील स्वतःहून दिली. आठ वर्षांच्या पाठपुरावा कालावधीत संशोधकांनी २,०३४ गंभीर हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांची नोंद केली. (वृत्तसंस्था)

**टप्प्याटप्प्याने केलेल्या बदलांचा सकारात्मक परिणाम**

**दैनंदिन जीवनाच्या विविध क्षेत्रांमधील लहान बदलांना एकत्र केल्याने हृदय आरोग्यावर मोठा सकारात्मक परिणाम होऊ शकतो आणि एकाच वेळी जीवनशैलीत मोठा बदल करण्याच्या प्रयत्नांपेक्षा असे टप्प्याटप्प्याने केलेले बदल बहुतेक लोकांसाठी साध्य करण्यायोग्य आणि टिकवून ठेवण्यायोग्य असण्याची अधिक शक्यता आहे, असे या अभ्यासाचे प्रमुख लेखक, सिडनी विद्यापीठातील संशोधन सहकारी डॉ. निकोलस कोमेल म्हणाले.**

### विमानाचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न; तरुणाला अटक

◆ **वाराणसी, ३० मार्च**

हवेत असलेल्या विमानाचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका तरुणाला येथील लाल बहादूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

या तरुणाने विमानाचा दरवाजा उघडण्याचा दोन वेळा प्रयत्न केला. अदनान, असे आरोपीचे नाव आहे. तो शनिवारी रात्री बंगळुरू येथून इंडिगोच्या विमानाने प्रवास करण्यासाठी चढला होता. विमानाने प्रवास करण्याची त्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे त्याला खूप अस्वस्थ वाटत होते. प्रवास सुरू झाल्यानंतर लगेचच या तरुणाने विमानाचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र, विमानातील कर्मचाऱ्यांनी त्याला शांत केले. (वृत्तसंस्था)

**तातडीने पाहिजेत**

सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत** मध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

| | |
|---|---|
| १) डेस्क उपसंपादक | २ पदे |
| २) बातमीदार | ४ पदे |
| ३) डीटीपी ऑपरेटर | २ पदे |

किमान तीन वर्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी तीन दिवसात अर्जासह समक्ष कार्यालयात भेटावे.

**संपर्क: ९८८११९१४४३**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.

CMYK


सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ३१ मार्च २०२६
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



आज भगवान महावीर यांची जयंती

## विचारपुष्प



जर आपल्या कार्याला समाजव्यापी बनवायचे असेल तर त्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्य करण्याची क्षमता असलेले समर्पित कार्यकर्ते हवेत. कार्यकर्ते भाषणे देऊन किंवा चर्चा करून तयार होत नसतात. ते आपल्या आचरणातून, आपल्या वागण्यातून निर्माण होत असतात.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

## महत्त्वाचे

### केरोसीन वितरणास ६० दिवसांची परवानगी

**नवी दिल्ली** : जागतिक ऊर्जा पुरवठ्यावरील दबावाच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने देशभरात घरगुती वापरासाठी केरासीन वितरणास साठ दिवसांची परवानगी दिली आहे. केरोसीनमुक्त घोषित केलेली २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठीदेखील हा निर्णय लागू असेल. पश्चिम आशियातील युद्धामुळे ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली.

# जनगणनेची माहिती गोपनीय

● जनगणना आयुक्तांची माहिती ● आरटीआयमधून उत्तर मिळणार नाहीत ● नागरिकांना द्यावी लागेल ३३ प्रश्नांची माहिती

◆ **नवी दिल्ली, ३० मार्च**

दोन टप्प्यांत होणारी देशव्यापी जनगणनेची १ मार्च २०२७ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. तथापि, लडाख, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड यांसारख्या बर्फाच्छादित प्रदेशांसाठी १ ऑक्टोबर २०२६ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. दुसरा टप्पा १ फेब्रुवारी २०२७ रोजी सुरू होईल. जनगणनेदरम्यान एकूण ३३ प्रश्न विचारले जातील आणि यातून गोळा झालेली वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय राहील. ही माहिती आरटीआय कायद्याच्या कक्षेत येणार नाही.



पत्रपरिषदेत सोमवारी माहिती देताना मृत्युंजय कुमार नारायण. डाव्या बाजूला समन्वयक विश्वजीत दास, प्रधान संचालक धीरेंद्र ओझा

जनगणनेची माहिती न्यायालयात पुरावा म्हणून वापरली जाणार नाही किंवा इतर कोणत्याही संस्थेला दिली जाणार नसल्याची माहिती जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी सोमवारी पत्रपरिषदेत दिली. जनगणना कायद्याच्या कलम १५ चा हवाला देत नारायण यांनी सांगितले की, जनगणनेतून मिळालेली माहिती गोपनीय असेल. देशभरातून एकसमान, विश्वसनीय, लोकसंख्याशास्त्रीय आणि सामाजिक-आर्थिक माहिती गोळा करणे या अभियानाचा उद्देश आहे. यामुळे माहितीची सुसंगतता आणि वैधता सुनिश्चित होईल.

२०११ च्या मागील जनगणनेनंतर भारतीय समाजात झालेले बदल लक्षात घेऊन एकूण ३३ प्रश्नावलीच्या आधारे माहिती गोळा केली जाईल. यामध्ये बदलती सामाजिक रचना समजून घेण्यासोबतच घराचा प्रकार, स्थान, रचना इंटरनेट, एलपीजी, पाणी आणि स्वच्छता यासारख्या मूलभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. स्वातंत्र्यानंतरची ही देशाची आठवी जनगणना असेल. जी देशातील धोरणनिर्मिती आणि विकास योजनांसाठी महत्त्वपूर्ण माहिती प्रदान करेल. *(वृत्तसंस्था)*

### लिव्ह-इन जोडप्यांना विवाहित मानले जाईल

जनगणनेतील एक प्रमुख बदल म्हणजे, लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये एकत्र राहणाऱ्या जोडप्यांचा आक्षेप नसल्यास त्यांना विवाहित मानले जाईल. दोन टप्प्यांत होणाऱ्या जनगणनेसाठी यावेळी माहितीचे संकलन पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केले जाईल. डिजिटल प्रणालीअंतर्गत, लोक स्वतःची माहिती स्वतःच भरू शकतील. यामुळे माहिती संकलन प्रक्रिया अधिक जलद व अचूक होईल आणि यात पारदर्शकता राहील.

### ३० लाख कर्मचाऱ्यांचा समावेश

संपूर्ण मोहिमेत देशभरातील अंदाजे ३० लाख गणक, पर्यवेक्षक आणि इतर अधिकारी, कर्मचीली सहभागी असतील, जे मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे घरोघरी जाऊन माहिती गोळा करतील. व्यक्तींची नावे, वय, जन्मतारीख, वैवाहिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय, धर्म, जात/जमात, अपंगत्व आणि स्थलांतर यांसारखी सविस्तर कर्मचारी माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत बेघर लोकांचाही समावेश असेल. ३३ प्रश्नांत घरात राहणाऱ्या विवाहित जोडप्यांची संख्या, कुटुंबप्रमुखाचे लिंग, म्हणजे तो पुरुष, स्त्री किंवा तृतीयपंथी आहे, याचीही नोंद केली जाईल.

### अडथळा आणल्यास गुन्हा

कोणताही निष्काळजीपणा, डेटाचा गैरवापर, जनगणनेच्या कामात अडथळा आणणे किंवा नागरिकांना आक्षेपार्ह प्रश्न विचारणे हा गुन्हा मानला जाईल. अशा प्रकरणांमध्ये, जनगणना कायदा-१९४८ नुसार दंड आणि तीन वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद आहे. नऊ राज्ये मे महिन्यात ही प्रक्रिया पार पाडतील. तीन राज्ये जूनमध्ये, दोन जुलैमध्ये आणि दोन ऑगस्टमध्ये ही प्रक्रिया पूर्ण करतील.

# डाव्या विचारसरणीमुळे फोफावला नक्षलवाद

## मोदी सरकारने केला नायनाट



◆ **नवी दिल्ली, ३० मार्च**

डाव्या विचारसरणीमुळे देशात नक्षलवाद फोफावला होता, मात्र मोदी सरकारच्या काळात देशातील नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आलो, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवार लोकसभेत केले. नक्षलमुक्त भारताचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साकार केले आहे, असे ते म्हणाले.

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे यांनी लोकसभेत नियम १९३ खाली सुरू केलेल्या नक्षलवादावरील चर्चेला उत्तर देताना अमित शाह म्हणाले की, मोदी सरकारच्या धोरणामुळे कधीकाळी बालेकिल्ला असलेल्या बस्तर भागातून नक्षलवाद आज पूर्णपणे संपला. बस्तर जिल्ह्याच्या दुर्गम भागांत आता शाळा उघडल्या जात आहेत, रेशनचे दुकान तसेच प्राथमिक आणि सामुदायिक आरोग्य केंद्र सुरू केली जात आहेत. तेथील लोकांना आधारकार्ड आणि रेशनकार्ड दिले जात आहे. सहा किलो मोफत धान्याचेही वाटप केले जात आहे.

बस्तर भागात आतापर्यंत लाल दहशतवाद होता, त्यामुळे विकास होऊ शकला नव्हता. आज त्या भागातून लाल दहशतवादांचे निर्दालन केल्यामुळे विकासाची किरणे त्या भागात पोहोचली. गेल्या ६० वर्षांपासून देशात काँग्रेसचे शासन होते, तरीही देशातील आदिवासी विकासापासून वंचित होते. विकास न झाल्यामुळे देशात नक्षलवाद वाढला नव्हे, तर डाव्या विचारसरणीला खतपाणी घातल्यामुळे नक्षलवाद फोफावला, असे अमित शाह म्हणाले.

सशस्त्र नक्षलवादी ही देशासमोरची सर्वांत मोठी समस्या असल्याची कबुली तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी दिली होती. २०१४ नंतर देशात परिवर्तन झाले, विकासाला वेग आला असे ते म्हणाले.

शाह म्हणाले की, संविधानाचा आदर तुम्ही करणार की नाही, हा माझा प्रश्न आहे. कोणावर अन्याय होत असेल तर, त्याला न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालय, विधानसभा आहे. आदिवासींच्या प्रश्नांबद्दल सरकार संवेदनशील आहे. त्यांच्या सर्व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी कृतसंकल्प आहे.

डाव्या विचारसरणीने भाबड्या आदिवासींना फसवले, त्यांची दिशाभूल केली, असा आरोप करत शाह म्हणाले की, नक्षलवाद्यांनी देशातील विकासाच्या प्रक्रियेत तसेच निवडणुकीच्या प्रक्रियेतही अडथळे आणले. *(तभा वृत्तसेवा)*

### गोळीचे उत्तर गोळीनेच दिले जाईल

**नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली टाकावी, सरकार त्यांना मदत करेल. मात्र, जे बंदूक चालवतील, त्यांना आता किंमत चुकवावी लागेल. गोळीचे उत्तर गोळीनेच दिले जाईल. जे आत्मसर्पण करतील, त्यांच्याशी चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. नक्षलवाद्यांनी हिंसाचार करण्याचे दिवस आता सरले आहेत. देशातील १२ राज्यांत आतापर्यंत नक्षलवादाची समस्या होती. पण, आता या सर्व राज्यांतून नक्षलवाद संपला आहे, नक्षलवाद शेवटचे आचके घेत आहे, असे ते म्हणाले.**



# दिवाळखोरी अर्जावर १४ दिवसांत निर्णय घेणे बंधनकारक : सीतारामन्

### बँकिंग क्षेत्राची स्थिती सुधारण्याचा उद्देश

◆ **नवी दिल्ली, ३० मार्च**

दिवाळखोरी आणि नादारी संहिता अर्थात् आयबीसीमध्ये बदल करणे काळाची गरज आहे. खटल्यांचा अतिरिक्त भार आणि बँकिंग क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी १४ दिवसांच्या आत दिवाळखोरीचे अर्ज स्वीकारणे बंधनकारक करण्यात येणार आहे. यामुळे प्रकरणांच्या निराकरणाला गती मिळेल आणि प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होईल, अशी माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सोमवारी संसदेत दिली.



दिवाळखोरी आणि नादारी संहितेत सुधारणा विधेयकाची माहिती देताना सीतारामन् म्हणाल्या, कंपनीची चूक सिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत दिवाळखोरीचे अर्ज स्वीकारणे बंधनकारक आहे. विधेयकात दिवाळखोरी निराकरण अर्जांना मंजुरी देण्यासाठी लागणारा वेळ कमी करण्याच्या तरतुदींसह अनेक बदलांचा प्रस्ताव आहे.

विरोधकांचे आक्षेप लक्षात घेऊन त्यात एकूण १२ दुरुस्त्या केल्या. यामध्ये सामूहिक दिवाळखोरी आणि आंतरराष्ट्रीय दिवाळखोरीसाठी सक्षम करणाऱ्या तरतुदींचा समावेश आहे. यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांशी संबंधित प्रकरणांच्या निराकरणातही स्पष्टता येईल.

आतापर्यंत दिवाळखोरी संहितेमध्ये सात वेळा सुधारणा करण्यात आल्या आहेत. बँकिंग क्षेत्रावरील ताण कमी करणे हा याच उद्देश आहे. या सुधारणांमुळे बँकिंग क्षेत्राची संरक्षण चौकट आणखी मजबूत होईल. बँकिंग क्षेत्राची स्थिती सुधारण्यात आयबीसी महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### 'त्या' सहा पदांना तात्पुरती मुदतवाढ

◆ **मुंबई, ३० मार्च**

नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष कृती कार्यक्रमाला गती आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तर आणि नागपूर विभागीय आयुक्त स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या एकूण सहा अस्थायी (तात्पुरत्या) पदांना मुदतवाढ देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार, संबंधित सहा पदांना १ मार्च ते ३१ ऑगस्ट या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. मंजूर केलेली सहा पदे राज्य आणि विभाग अशा दोन स्तरांवर विभागली आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

## पार्थ पवारांनी घेतली राज ठाकरे यांची भेट



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि नवनियुक्त राज्यसभा खासदार पार्थ पवार यांनी सोवारी दुपारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. काही दिवसांपूर्वीच रोहित पवार यांनीही राज ठाकरेंची भेट घेतली होती. यामुळे पवार घराण्यातील युवा नेत्यांचा शिवतीर्थावरील वाढता राबता राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीच्या अनुषंगाने यापूर्वी काही भेटी झाल्या होत्या. पार्थ पवार यांनी घेतलेली भेट ही केवळ चौकशीसंदर्भात आहे की, यामागे काही वेगळे राजकीय गणित दडले आहे, याबाबत कमालीची गुप्तता पाळली जात आहे.

# विलीनीकरणाच्या वृत्तावर सुनील तटकरेंचे सूचक मौन

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुनर्मिलनाची पुन्हा चर्चा ● सुनेत्रा पवारांच्या हाती निर्णयसूत्रे

◆ **मुंबई, ३० मार्च**



महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर सध्या एक नवा पेच निर्माण झाला असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार का, या प्रश्नाने राजकीय वातावरण तापले आहे. आमदार सुनील शेळके यांनी सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही पक्षांनी एकत्र यावे, असे विधान केल्यानंतर विलीनीकरणाच्या चर्चेला नवे धुमारे फुटले आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर पोरक्या झालेल्या या राजकीय प्रवासाला सावरण्यासाठी विलीनीकरण हाच एकमेव मार्ग असल्याचे संकेत शेळके यांच्या विधानातून मिळत असले, तरी पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर मात्र अत्यंत सावध हालचाली पाहायला मिळत आहेत. या संवेदनशील विषयावर भाष्य करताना राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी अत्यंत चाणाक्ष भूमिका घेतली आहे. विलीनीकरणाबाबत सध्या कोणतीही अधिकृत चर्चा सुरू नसल्याचे सांगत त्यांनी तूर्तास या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, याच वेळी त्यांनी हा चेंडू राष्ट्रीय अध्यक्षांच्या कोर्टात टोलवून भविष्यातील शक्यता कायम ठेवल्या आहेत. पक्षाचे भवितव्य आणि विलीनीकरणासारखा धोरणात्मक निर्णय घेण्याचे सर्व अधिकार केवळ सुनेत्रा पवार यांनाच असल्याचे स्पष्ट करत तटकरेंनी या प्रकरणातील गुंतागुंत अधिक वाढवली आहे. दरम्यान, महायुतीमधील प्रमुख नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर कोणतीही टिप्पणी करणे टाळले आहे. हा राष्ट्रवादी काँग्रेसचा पूर्णपणे अंतर्गत प्रश्न असल्याचे सांगत त्यांनी तटस्थ राहणे पसंत केले आहे. अजित पवार यांच्या पश्चात शरद पवार गट आणि अजित पवार गटातील दुरावा कमी करण्याचे प्रयत्न पडद्याआडून सुरू आहेत की हे केवळ राजकीय फुगे आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. *(वृत्तसंस्था)*

# ६६ कोटींच्या वाढीसह १४४९ कोटींच्या महापालिका अंदाजपत्रकास मान्यता

- **चार वर्षानंतर झाली अंदाजपत्रकीय सभा**
- **नगरसेवकांना मिळणार प्रत्येकी ६६ लाखांचा निधी**
- **महसुली जमेतून मिळणार ८२४ कोटी रुपये**
- **भांडवली कामांसाठी तब्बल १५२ कोटींची तरतूद**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

सोलापूर महापालिका प्रशासनाने पाठविलेल्या प्रशासकीय अंदाजपत्रकात स्थायी समितीत ६ कोटी रुपये तर सर्वसाधारण सभेत ६६ कोटी ३३ लाखांची वाढ करण्यात आली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील महसुली ९९० कोटी ७६ लाख ३६ हजारांसह अनुदान आणि कर्ज व मुन्सिपल बॉन्ड असे एकूण १४४९ कोटी ७१ लाख ९३ हजार ४०१ रुपयांच्या अंदाजपत्रकाला मान्यता देण्यात आली.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, ३० मार्च २०२६ रोजी सोलापूर महापालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा घेण्यात आली. स्थायी समितीचे सभापती रंजीता चाकोते यांनी अंदाजपत्रक सादर केले. सभागृहनेते नरेंद्र काळे यांनी मुख्य सूचना तर एमआयएमच्या गटनेत्या वहिदा भंडाले-शेख आणि काँग्रेसचे नगरसेवक प्रा.नरसिंह आसादे यांनी उपसूचना मांडली. एकापेक्षा अधिक उपसूचना आल्याने त्या मर्ज करण्यात आल्या.

गत अंदाजपत्रकात यंदा महसुली २१७ कोटी ६२ लाख ८० हजार तर एकुण अंदाजपत्रकात १५६ कोटी ४१ लाख ८० हजाराची वाढ करण्यात आली आहे. महापालिकेतील सर्वपक्षीय नगरसेवकांना समान निधी देण्याचा निर्णय या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आला असून प्रत्येक नगरसेवकाला ५० लाख रुपये भांडवली निधी आणि १६ लाख रुपये वार्डवाईज निधी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. प्रशासकीय अंदाजपत्रकात ६ कोटी रुपयांची वाढ करत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील तयार केलेले ९३० कोटी ११ लाख ६१ हजार महसुलीसह १३८९ कोटी ७ लाख १८ हजार ४०१ रुपयांचे अंदाजपत्रक स्थायी समितीने सर्वसाधारण सभेकडे निर्णयासाठी सादर केला होता. कोणत्याही महसूलीसह कर, दरवाढ करण्यात आलेली नाही. मात्र विकासाच्या दृष्टीने विविध बाबीचा उल्लेख करण्यात आला आहे.

सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात महसुली विभागामध्ये महसुली विभाग ८२३ कोटी ९५ लाख ७६ हजार, पाणीपुरवठा १३८ कोटी २९ लाख ६० हजार आणि भांडवलीमध्ये २८ कोटी ५१ लाख आणि आरंभी शिल्लक २ लाख ५७ हजार ४०१ असे ९९० कोटी ७६ लाख ३६ तर खर्चामध्ये महसूल विभाग ६७१ कोटी ४६ लाख ४१ हजार, पाणीपुरवठा १३३ कोटी ३८ लाख ९४ हजार आणि महसुली निधीतून भांडवली कामासाठी वर्ग करण्यासाठी १५७ कोटी ४० लाखांसह भांडवली खर्च १८५ कोटी ९२ लाख १ हजार आणि अखेरची शिल्लक २ लाख ५७ हजार ४०१ अशी जमेऐवढीच खर्च बाजू धरण्यात आली आहे.

**उत्पन्न, अनुदान, कर्जासह १४४९.७१ कोटींचे अंदाजपत्रक**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात महापालिकेला मिळणारे उत्पन्न हे ९९० कोटी ७८ लाख ९३ हजार ४०१ रुपये, शासन अनुदान ३४७ कोटी ९२ लाख आणि महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान पर्जन्य जलवाहिनी महापालिका हिस्सा कर्ज २९ कोटी ४० लाख, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान मल निसारण योजना महापालिका हिस्सा कर्ज ७१ कोटी ६१ लाख आणि शहर अंतर्गत पाणीपुरवठा सुधारणा योजनेसाठी महापालिका हिस्सा मुन्सिपल बॉन्ड स्वरुपात उभारण्यात येणार आहे. यामधून १० कोटी रुपये असे मिळून एकूण अंदाजपत्रक १४४९ कोटी ७१ लाख ९३ हजार ४०१ रुपये इतका झाला आहे. गत वर्षीच्या तुलनेत तब्बल १५६ कोटी ४१ लाख ८० हजाराच्या वाढीने १० टक्क्यांवर वाढला आहे.

**महसुली विभागातून होणार १५७ कोटी वर्ग**

दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही अंदाजपत्रकात महसुली विभागातून रक्कम भांडवली कामासाठी वर्ग करण्यात येणार आहे. पाणीपुरवठा विभागाकडून ४ कोटी ९० लाख रुपये भांडवलीसाठी तर महसुली व पाणीपुरवठा विभागासाठी १५७ कोटी ४० लाख रुपये वर्ग करण्यात येणार आहे. यामुळे प्रशासनाच्या अंदाजामध्ये एकूण ६६ कोटी ३३ लाख ७५ हजार रुपये वाढ झाली आहे.

**दरवर्षी महसुली तूट; प्रशासनाची हतबलता**

अंदाजपत्रक सादर करताना पुढील वर्षातील नियोजन व विकासाची दिशा ठरविणे व गरजेनुसार आवश्यक प्रकल्पांचा विचार करताना जमा व खर्च यात ताळमेळ घालणे आवश्यक आहे. पण महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी महसुली तूट निर्माण होत असून यामुळे आर्थिक ओढाताण होत आहे, अशी हतबलता सुधारित व या अंदाजपत्रकात प्रशासनाने दर्शविली आहे. ही तूट भविष्यात सातत्याने कमी करण्याचा प्रयत्न असल्याचेही स्पष्टीकरण यावेळी देण्यात आले.

**अशी उपलब्ध होणार भांडवली कामासाठी रक्कम**

* विकास शुल्क - २८ कोटी * महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग-१५२ कोटी ४९ लाख ३५ हजार * गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोयी करणे-५१ लाख * पाणीपुरवठा निधीतून भांडवली कामासाठी वर्ग-४ कोटी ९० लाख ६६ हजार * एकूण भांडवली कामासाठी उपलब्ध होणारी रक्कम-१८५ कोटी ९१ लाख १ हजार

**ठळक वैशिष्ट्ये अशी**

* महापालिका एकूण खर्च-९९० कोटी ७६ लाख ३६ हजार * केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान- ३४७ कोटी ९२ लाख (तेवढेच होणार खर्च) * शहरात अतिवृष्टीमुळे आपातकालीन परिस्थिती निर्माण होते. याचा विचार करून कुठेही पाणी साचू नये यासाठी काही ठिकाणी बंदिस्त नाले बांधणार. * मक्तेदारांच्या कामाची थकीत बिले देण्यासाठी १० कोटींची तरतूद. * कार्यक्रम योजनांवरील खर्च- ६५ कोटी ६ लाख १७ हजार * करावरील सूट व परतावा यामध्ये प्रशासनाच्या २९ कोटी रुपयांमध्ये १३ कोटी कमी करत ठेवले १६ कोटी * घसारा निधी ठेवला १ कोटी १५ लाख रुपये * शहरास स्वच्छ सुंदर व लियाबल सिटी बनविण्याचा प्रयत्न होणार (उर्वरित वृत्त पान ५ वर)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# सरकारी सण आणि 'गतीचे गाणे'...

केवळ निर्णयांच्या कागदी घोड्यांच्या फौजा दमदारपणे दौडविल्याने शासन किंवा प्रशासनास गतिमानता प्राप्त होते, असे समजण्याएवढा दुधखुळेपणा अलिकडे समाजात अभावानेच आढळत असल्याने, 'कार्यक्षमता दाखवा आणि जनाधार मिळवा' हा सत्तासंघर्षातील मतदारांच्या ताकदीचा मंत्र झाला आहे. सरकारी तिजोरीची दारे खुली केल्याखेरीज निर्णयांच्या कागदी घोड्यांना अंमलबजावणीचा पोषक खुराक देणे शक्य होत नाही. म्हणून, निर्णय आणि अंमलबजावणी हे कोणत्याही शासनाच्या गतिमानतेचे दोन मापदंड लावूनच मतदार कोणत्याही सरकारांच्या क्षमतांचे मोजमाप करत असतो. उदासीनता झटकणे, कानाडोळा संस्कृती संपुष्टात आणणे आणि 'चलता है' मानसिकतेस मूठमाती देणे ज्या कारभारास साधते, त्या कारभारास 'गतिमान कारभार' म्हणतात. आपले शासन किती गतिमान आहे, याचे मोजमाप करण्याचा हक्काचा दिवस आजच्या तारखेस उगवला आहे.

मार्च महिना म्हणजे आर्थिक वर्षाचा अखेरचा महिना असल्याने, 'मार्च एन्ड' हा परवलीचा शब्द शासन दरबारी घुमू लागतो आणि मंत्रालयापासून ग्रामपंचायतींपर्यंतच्या साऱ्या सरकारी कार्यालयांना एक वेगळीच धुंदी चढते. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी गुढीपाडवा, रामनवमीसारखे दिवस सुटीचे असतात. एखाद्या सप्ताहान्ताच्या सुटीस जोडून असे काही सणासुदीच्या सुटीचे दिवस आले, तर सरकारी कर्मचारी कौटुंबिक सोहळा समजून ते दिवस साजरे करतात. पण अशा सुट्यांच्या दरम्यान येणारा हा मार्च एन्डचा 'सरकारी सण' मात्र वेगळा असतो. या सणाला कोणास सुटी मिळत नाहीच; उलट हक्काच्या सुट्याही विसराव्या लागतात आणि कामाला गतिमानता देण्यासाठी कार्यक्षमतेचा सपाटा लावावा लागतो. अशा तऱ्हेने, सुटीचा विसर पाडणारा व मान मोडून काम करण्याचा हा सोहळा सर्व कार्यालयांत साजरा होतो. त्या सण-सोहळ्याची पूर्वतयारी साधारणतः अखेरच्या आठवड्यापासून सुरू होते. तिजोरीची तोंडे उघडण्याचा सोहळा म्हणूनही या उत्सवाकडे पाहिले जाते. त्याआधीच्या वर्षभरात अनेक तरतुदी तिजोरीबंद अवस्थेत आणि निर्णय बासनबंद स्थितीत सुस्तावल्यागत पडून राहिलेले असतात. मार्च महिन्याची चाहूल सुरू झाली की त्यांना जाग येते. तिजोरी आणि बासनातून बाहेर पडण्याची वेळ झाल्याच्या जाणिवा जाग्या होतात आणि त्या तरतुदी, निर्णय, शासन व प्रशासन यंत्रणांना जाग्या करू लागतात. चालढकल, कानाडोळा हा सरकारी खाक्या मुरलेल्या यंत्रणांना केवळ अशा हालचालींनी जाग येणे सहसा सोपे नसते. शक्य तितकी चालढकल करावी आणि नाईलाज झाल्यावर मगच फायली व कागदपत्रे झटकून कामाला लागावे ही सवय मुरलेल्या यंत्रणा अखेरच्या आठवड्यात कार्यक्षमता दाखविण्यासाठी सिद्ध होतात आणि तिजोरीची तोंडे उघडली जातात. वर्षभरात शासनाने असंख्य निर्णय घेतलेले असतात आणि जनतादेखील या निर्णयांच्या अंमलबजावणीकडे नजरा लावून बसलेली असते. पण केवळ कागदावरचे निर्णय कारभाराला गती देण्यास पुरेसे नसतात. त्याच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणांचा गतिमान कारभार हाच एकमेव उपाय असल्याने, यंत्रणांच्या पावलांना वेग देणारा हा महिना अखेर उजाडतो आणि अखेरच्या आठवड्यातील धावपळीला उत्सवी उधाण येते. कपाटातील, बासनातील व संगणकांच्या वेगवेगळ्या फोल्डर्समधील फाईलींना पाय फुटू लागतात. त्यातील साहेबाच्या मंजुरीच्या स्वाक्षरीकरिता तहानलेल्या कागदपत्रांची इकडून तिकडे धावाधाव सुरू होते. ते कामही सहसा सोपे नसते. कोणत्या फाईलीवरील कोणत्या कागदपत्रांवर सही व्हायला हवी, हे ओळखण्यासाठी चाणाक्षपणा अंगी मुरलेल्या यंत्रणांना कधीकधी त्यासाठी 'चक्रव्यूह'देखील रचावा लागतो. आज त्या धावपळीच्या शर्यतीचा आणि कसरतीचा अखेरचा टप्पा आहे. आज या फाईली, त्यातील कागदपत्रे आणि निर्णयांचे कागदी घोडे अंमलबजावणीच्या अपेक्षेने आश्वस्त होतील आणि बासनबंद अवस्थेतून बाहेर पडल्याच्या समाधानाचा सुस्कारा टाकतील. आठवडाभरात जारी होणाऱ्या शासन निर्णयांनी वर्षभराच्या वेगाला मागे टाकण्याचा विक्रम प्रस्थापित केलेला असेल. गेल्या आठवडाभरात, २९ मार्चपर्यंतच्या काळात महाराष्ट्राच्या विविध खात्यांशी संबंधित असलेल्या शासन निर्णयांनी एक हजाराचा टप्पा पार केला. आजचा दिवस मावळेल, तेव्हा कदाचित तो दोन हजारांच्या घरात पोहोचलेला असेल. कारण, वर्षअखेरच्या गतिमानतेचा तोच पुरावा असतो. गेल्या वर्षी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जारी झालेल्या शासन निर्णयांनी दीड हजारांचा पल्ला गाठला होता.

त्याच धामधुमीचा मार्च महिना उजाडला की सरकारी कार्यालयातील वातावरण नेहमीच बदलून जाते. एरवी, 'आजचे काम उद्या करू' अशा मानसिकतेची सवय झालेल्या यंत्रणा 'उद्याचे कामही आजच पूर्ण करावे', अशा अवस्थेत दाखल होतात. १५ मार्चनंतर तर वेळेच्या गणितालाही काळाचे भान येते आणि उत्सव संपण्याच्या आत सारे सोपस्कार पार पाडण्याच्या जाणिवांचा तणाव जाणवू लागतो. चहा-नाश्त्याची परंपरा पार पडल्याखेरीज ज्या टेबलावरच्या कामाचा दिवस सुरू होत नाही, त्या टेबलावरचा चहा थंड होऊन जातो. कामाच्या ताणामुळे मन मात्र तापलेले राहते. इतकेच नव्हे, तर शिल्लक रजा संपविण्याचे सतत होणारे हिशेबही अनेकांस विसरावे लागतात. रजा मागणे हादेखील गुन्हा वाटावा हे या उत्सवाचे वेगळेपण मानले जाते. वर्षभर ज्या कामांना मंजुरीची प्रतीक्षा असते, त्या कामांना मार्चच्या शेवटच्या आठवड्यात अचानक विमानाचा वेग येतो. ज्या कामासाठी निधीची तरतूद झालेली असते, तो वापरला गेला नाही, तर 'व्यपगत' होणार आणि तसे झाल्यास शासनाच्या गतिमान कारभाराच्या दाव्याचे वाभाडे निघणार याची प्रामाणिक जाणीव प्रशासनास करून देणारा हा दिवस कार्यसंस्कृतीमधील एक सर्वांत सुसंस्कृत दिवस म्हणून गणला जातो.

या काळात केवळ कागदावरच्या निर्णयांना गती येते असेही नाही. काही ठिकाणी अचानक गावोगावीच्या गल्लीबोळातील रस्ते खोदले जातात. नळपाणी योजना सुरू होण्याच्या आशा पल्लवित होतात, रस्त्याकडेच्या दिवाबत्ती योजना गतिमान होतात, सरकारी कार्यालयांतील जुनाट फर्निचर, कपाटे, टेबले हद्दपार होऊन कार्यालयांचे रुपडे बदलून टाकणारे सामान दाखल होते. सणासुदीला घराघरांतही नव्या वस्तूंची खरेदी, नवे कपडे, नवे फर्निचर येते. वर्षअखेरचा हा सोहळादेखील या परंपरेला साजेसा साजरा केला जावा, हे अपेक्षितच असते. अनेक सरकारी कार्यालयांबाहेर कंत्राटदारांची गर्दी सुरू होऊन कार्यालयांना जत्रेचे स्वरूप येते. कागदपत्रांवर मंजुरीच्या स्वाक्षऱ्या उमटल्या की सर्वत्र उत्साहाला उधाण येऊन 'खुशी' व्यक्त करण्यासाठी 'प्रसाद वाटपा'चे सोहळे सुरू होतात. हे सोहळे सर्वांत जास्त जाणवण्याच्या जागेला 'ट्रेझरी' किंवा 'कोषागार' असे म्हणतात. तिजोरीच्या चाव्या या जागी दडलेल्या असतात. त्यामुळे सोहळ्याची सुरुवात होताच या जागेला युद्धभूमीचे रूप येते. टायपिंगचा खडखडाट. संगणकाच्या कीबोर्डचा नाद, 'टोकन' मिळविण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न आणि मोजक्या मध्यस्थांची धावपळ असा धामधुमीचा हा सोहळा 'याचि डोळा' अनुभवण्याचे भाग्य सामान्य जनतेच्या सहसा नशिबी नसते. आज मध्यरात्री, घड्याळाच्या काट्यांनी बारा वाजल्याचे ठोके दिले की हा सोहळा संपुष्टात येईल. 'एक एप्रिल' नावाच्या नव्या दिवसाचे स्वागत सोहळे सुरू होतील. नव्या आर्थिक वर्षाच्या नव्या दिवशी, नवे निर्णय, नव्या तरतुदी आणि नव्या योजनांची कागदी घोडे नव्या 'नस्त्यां'वर स्वार होतील आणि नव्या वर्षाची वाटचाल सुरू करतील. 'चलता है' मानसिकतेच्या दबावाखाली तेदेखील सुस्तावल्यागत होतील, पण नव्या वर्षातही, पुढच्या ३१ मार्चचा वर्षअखेरचा दिवस उजाडणारच आहे आणि तेव्हा पुन्हा गतीने धावावे लागणार आहे, याची त्यांना खात्री असते. सरत्या वर्षाच्या पहिल्या दिवशीदेखील हेच झाले होते एवढ्या प्रचंड गतिमानतेची कमाल कसरत झाल्यानंतर दमछाक तर होणारच! उद्या, १ एप्रिलच्या दिवशी, नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी युद्धानंतरच्या शांततेचा एक वेगळ्या अनुभवाने सरकारी कार्यालयांच्या रुळलेल्या सवयी पुन्हा जाग्या होतील.

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# इराणचा हल्ला अयशस्वी; पण भारताला चिंता

हिंद महासागरातील 'दिएगो गार्सिया' हा केवळ एक लष्करी तळ नाही, तर जागतिक सामरिक समीकरणांचा केंद्रबिंदू आहे. अमेरिकेच्या दृष्टीने हा तळ आशिया, मध्यपूर्व आणि आफ्रिका या तिन्ही भागांमध्ये शक्ती प्रक्षेपणासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. अशा ठिकाणी इराणकडून हल्ला होण्याच्या घटनेकडे केवळ दोन देशांमधील संघर्ष म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. हिंद महासागर हा भारताच्या व्यापाराचा मुख्य मार्ग आहे. भारताचे जवळपास ८० टक्के तेल समुद्री मार्गाने येते. या भागात तणाव वाढल्यास ऊर्जा सुरक्षेवर थेट परिणाम होऊ शकतो. दुसरे म्हणजे या प्रदेशातील लष्करीकरण वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकेचा तळ लक्ष्य झाल्यानंतर या भागात अमेरिका आपल्या उपस्थितीत वाढ करेल, तर इराण आपल्या प्रतिकार क्षमतेचे प्रदर्शन करेल. यामुळे महासागरातील तणाव वाढेल आणि भारताला अधिक सावध भूमिका घ्यावी लागेल. तिसरे म्हणजे भारताच्या किनारपट्टीपासून तुलनेने जवळ असलेला हा भाग अस्थिर झाल्यास गुप्तचर, सायबर आणि दहशतवादी कारवायांचा धोका वाढू शकतो. या संपूर्ण घडामोडींमध्ये चीनची अप्रत्यक्षपणे महत्त्वाची भूमिका आहे. 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरणाद्वारे तो श्रीलंका, पाकिस्तान आणि आफ्रिकेतील बंदरांमध्ये गुंतवणूक करून आपली सामरिक पकड मजबूत करत आहे. या भागात अमेरिकेचा प्रभाव कमी झाला, तर चीनला अधिक मोकळीक मिळू शकते.

या पृष्ठभूमीवर चीन-इराण यांच्यातील वाढते संबंध लक्षात घेण्यासारखे आहेत. ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्रात हे दोन्ही देश सहकार्य वाढवत आहेत. त्यामुळे इराणच्या कारवायांमागे चीनचा थेट हात नसला, तरी त्याला त्यातून धोरणात्मक फायदा मिळू शकतो. इराणने अलिकडेच दोन मध्यम पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली; परंतु त्यापैकी एकही आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचले नाही. इराणचा हा हल्ला अयशस्वी ठरला असला, तरी या घटनेमुळे भारतासमोर सुरक्षा आव्हाने निर्माण झाली. या हल्ल्यावरून सूचित होते की, इराणच्या खोरमशहरसारख्या क्षेपणास्त्रांचा पल्ला तीन हजार किलोमीटरपेक्षा जास्त असू शकतो. इराणने 'दिएगो गार्सिया'वर केलेला हल्ला भारताच्या 'इंडो-पॅसिफिक' धोरणाला मोठा धोका निर्माण करतो. 'दिएगो गार्सिया' भारतापासून चार हजार किलोमीटर अंतरावर आहे. भारतीय लढाऊ विमाने हवेतच इंधन भरल्याशिवाय तिथे पोहोचू शकत नाहीत. तिथे पोहोचण्यापूर्वी भारतीय नौदलाला पाणबुडीविरोधी युद्धाच्या गंभीर धोक्याचाही सामना करावा लागेल.

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाची आग आता भारताच्या 'घरात' म्हणजेच हिंद महासागरात पोहोचली आहे. भारतासाठी सर्वांत मोठी चिंता इराणची वाढती हल्ला करण्याची क्षमता आहे. आतापर्यंत मानले जात होते की इराणची क्षेपणास्त्रे केवळ दोन-तीन हजार किलोमीटरचा पल्ला गाठू शकतात; परंतु 'दिएगो गार्सिया'ला लक्ष्य करून इराणने सिद्ध केले आहे की त्याचा पल्ला चार हजार किलोमीटरपर्यंत वाढला आहे. तांत्रिकदृष्ट्या याचा अर्थ असा की संपूर्ण भारतीय मुख्य भूभाग आता इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात आला आहे. भारताची लष्करी आणि ऊर्जा पायाभूत सुविधा आता या नवीन 'धोका क्षेत्रात' आहे. भारत आपल्या ऊर्जेच्या गरजांपैकी सुमारे ८० टक्के ऊर्जा सागरी मार्गाने आयात करतो. हिंद महासागरातील 'दिएगो गार्सिया'सारख्या सुरक्षित बंदरांवरील हल्ल्यांमुळे संपूर्ण प्रदेश आता एक सक्रिय युद्धक्षेत्र बनला आहे. एव्हाना भारतीय तेलवाहू जहाजे आणि व्यापारी जहाजांवरील सुरक्षेचा धोका वाढला आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यात देशात इंधनाच्या किमतीमध्ये मोठी वाढ आणि पुरवठ्यात व्यत्यय येण्याची शक्यता आहे. या घडामोडीमुळे भारत एका अत्यंत गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीत सापडला आहे. एकीकडे भारताचे इराणसोबत ऐतिहासिक आणि सामरिक संबंध आहेत, तर दुसरीकडे, हिंद महासागरातील स्थैर्यासाठी भारत अमेरिका आणि ब्रिटनसोबत भागीदारी करतो. 'दिएगो गार्सिया'वरील हल्ल्यानंतर भारताला आपली सामरिक स्वायत्तता टिकवून ठेवणे आणि इराणसोबतचे संबंध संतुलित ठेवणे पूर्वीपेक्षा अधिक कठीण होईल. अनेक दशकांपासून 'दिएगो गार्सिया'ला हिंद महासागरातील एक अभेद्य किल्ला मानले जात होते. ते प्रादेशिक धोक्यांविरुद्ध एक भक्कम तटबंदी म्हणून काम करत होते. हे 'सुरक्षित क्षेत्र' गमावल्यामुळे भारताला आता आपली नौदल आणि क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली अधिक मजबूत करावी लागेल. संरक्षणतज्ज्ञांच्या मते भारताला आता हिंद महासागरात आपली गस्त वाढवावी लागेल तसेच प्रादेशिक शक्तींसोबत नवीन सुरक्षा युती करण्याचा विचार करावा लागेल. इराणच्या अलिकडील 'अयशस्वी' क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यापैकी सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे इराण आणि मध्य-पूर्वेतील युद्ध भारताच्या भूभागावर, हिंद महासागरात पोहोचले आहे का आणि याचा भारतासाठी काय अर्थ आहे? दुसरा प्रश्न असा आहे, की नकार देऊनही ब्रिटन या युद्धात सामील झाला आहे का आणि यामुळे त्याची व्याप्ती आणखी वाढेल का?

या घडामोडीमुळे भारतासाठी अनेक चिंता वाढल्या असून 'दिएगो गार्सिया'वरील हल्ल्यामुळे युद्ध अधिक तीव्र होण्याची शक्यता वाढली आहे. अमेरिकेच्या हवाई दलाच्या लांब पल्ल्याच्या बॉम्बर्सकडून वारंवार वापरला जाणारा हा ब्रिटिश लष्करी तळ इराणपासून अंदाजे ३,८०० मैल अंतरावर आहे. इराणने डागलेले क्षेपणास्त्र उत्तर कोरियाच्या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राच्या आधारावर विकसित केले गेले असल्याचे मानले जाते. 'इंडो-पॅसिफिक' आणि हिंद महासागरातील भारताच्या सामरिक स्वातंत्र्यासाठी 'दिएगो गार्सिया' खूप महत्त्वाचे आहे. 'दिएगो गार्सिया'च्या संदर्भात भारत आणि अमेरिका यांच्यात संबंध राहिले आहेत. त्यामुळे असा धोका वाढल्यास भारताचे अमेरिकेवरील अवलंबित्व वाढेल, कारण अमेरिकेशिवाय भारत चीनच्या विस्तारवादावर पाळत ठेवू शकत नाही. अग्नीसारखी लांब पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे 'दिएगो गार्सिया'पर्यंत पोहोचण्यास सक्षम आहेत; परंतु ती अण्वस्त्र प्रतिबंधासाठी तयार केली आहेत. तटबंदीयुक्त लष्करी पायाभूत सुविधांवर अचूक पारंपरिक हल्ल्यांसाठी नाहीत. 'दिएगो गार्सिया'मध्ये अमेरिकेची लष्करी मालमत्ता तैनात आहे. त्यात विमानवाहू स्ट्राईक गट, पॅट्रियट/थाड श्रेणीच्या हवाई संरक्षण प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक युद्धक्षमता यांचा समावेश आहे. ते बहुतेक पारंपरिक हल्ले निष्प्रभ करू शकतात. शिवाय अमेरिकन आणि ब्रिटिश अणुपाणबुड्या या पाण्यात नियमितपणे कार्यरत असतात. कोणत्याही भारतीय नौदल टास्क फोर्सला हल्ला करण्याच्या टप्प्यात पोहोचण्यापूर्वीच पाणबुडीविरोधी युद्धाच्या गंभीर धोक्याला सामोरे जावे लागेल.

ब्रिटन आणि युरोप दोघेही इराणसोबतच्या या युद्धात थेट सहभागी होण्यास संकोच करत आहेत; पण इराणच्या 'दिएगो गार्सिया'वरील क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे ही परिस्थिती बदलेल. ताज्या हल्ल्यामुळे ब्रिटनचा संकोच दूर होईल. या देशाला अमेरिकेच्या छत्राखाली यावे लागेल. इराणच्या हल्ल्यामुळे युरोपला आपले लष्करी तळ सुरक्षित नाहीत, असाही संकेत मिळतो. इराणचा हा हल्ला या युद्धाची तीव्रता आणखी वाढवेल. अमेरिका आणि ब्रिटन यांच्यातील 'विशेष संबंध' इतके घट्ट आहेत, की अमेरिकेच्या कोणत्याही मोठ्या लष्करी कारवाईमध्ये ब्रिटनची तटस्थता जवळपास अशक्य आहे. 'नाटो'च्या चौकटीत, गुप्त माहितीची देवाणघेवाण आणि लष्करी समन्वय आपोआप कार्यान्वित होतात. ब्रिटन हा 'फाईव्ह आईज' आघाडीचा एक अविभाज्य भाग आहे. इराणशी संबंधित कोणत्याही संघर्षात अमेरिकेला गुप्त माहिती देणे त्याला करारानुसार बंधनकारक आहे, मग ब्रिटिश पंतप्रधान कीथ स्टार्मर यांची तशी इच्छा असो वा नसो. इतकेच नव्हे, तर 'दिएगो गार्सिया' हा हिंद महासागरातील एक ब्रिटिश प्रदेश आहे, जो अमेरिकेला भाडेतत्त्वावर दिला आहे. मध्य पूर्वेतील अमेरिकेच्या कोणत्याही हवाई कारवाईमध्ये या तळाचा वापर केला जातो. त्यामुळे ब्रिटन आपोआपच एक सहभागी बनतो. या परिस्थितीत इराणचा हल्ला अमेरिका-ब्रिटनपेक्षाही भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# आर्थिक दुष्टचक्रात भरडलेला शेतकरी

भारतीय अर्थव्यवस्था जवळपास ८० टक्के कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. शेतकरी हाच देशाचा आर्थिक कणा समजला जातो. नव्हे तो आहेच. तरीही तो परावलंबी आणि दलालाच्या हातचे खेळणे बनल्याने समाजामध्ये अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. हा संपूर्ण बाजार दलालांनी पोखरून काढल्याने शेतकऱ्यांची हतबलता शिगेला पोहोचली आहे. देशामध्ये सर्वच उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे दर ठरविण्याचे अधिकार उत्पादकांना आहे. मात्र, आपल्या रक्ताचे पाणी करून आणि उघड्या आकाशाखाली घाम गाळून उत्पादित केलेल्या धान्याचे भाव दलालांनी ठरवायचे अन् त्यावर आकारणीही करायची, अशी संघटित आर्थिक लूट स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही सुरूच आहे. ज्याचा माल, त्याचे दाम तोच ठरविणार हे एक नैसर्गिक सूत्र आहे. परवडणारा घेईल अन्यथा तो दुसरा रस्ता शोधेल, असा साधारणतः एक नियम असतो. परंतु, या नियमाला शेतकरीच अपवाद ठरला आहे. त्यामुळे शेतकरी जरी देशाचा अन्नदाता असला तरी या देशामध्ये सर्वाधिक काळ राज्य करणाऱ्या शासकांनी त्यास याचक बनवून ठेवले आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे साहजिकच शेतकरी आणि शेतमजुरांचे आर्थिक चक्रही पूर्णतः शेतीवरच अवलंबून राहत आले आहे. शेतकऱ्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या त्यामध्ये खपल्या. त्यामुळे पुढची तजवीज म्हणून मिळेल त्या भावाने आपला माल विकण्यास शेतकरी बाध्य झालेला असतो. ग्रामीण भागामध्ये अजूनही आर्थिक सेवांची अतिशय कमतरता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आपत्कालीन गरजाही कधीच परिपूर्ण होत नाही. त्यासाठी त्यांना दारोदार भटकावे लागते. अशा बिकट परिस्थतीमध्ये मिळेल त्या भावामध्ये आपला माल विकावा लागतो. कारण, मागणारा अथवा समोर मुलीचे लग्न, वैद्यकीय यासारखा मोठा खर्च आ वासून तोंडासमोर उभा असतो. अशावेळी सर्व पर्याय बंद असतात. कारखानदार आपल्या फायद्यावर ठाम असतो. तो सर्व गोळाबेरीज करूनच व्यवसाय करीत असतो. याउलट शेतकऱ्याला हेही कळत नाही की, त्याचा माल अंतिम खरेदीदाराला कोणत्या भावामध्ये विकला जातो. कारण, यावर त्याचे कोणतेच नियंत्रण नसते. कृषी बाजारपेठेमध्ये निर्माण झालेली मध्यस्थ व दलालांची लांब साखळी, एवढी साखळी प्रयत्न करूनही कोठेच सापडणार नाही. हीच संघटित साखळीच शेतकऱ्यांसाठी सदैव मारक ठरत आली आहे. या आधुनिक युगामध्ये कार्पोरेट क्षेत्र तर शेतकऱ्यांच्या मुळावरच उठले आहे. मागील काही वर्षांपासून बदलत्या हवामानामुळे शेती हा व्यवसाय प्रचंड तोट्यामध्ये आला असून, निसर्गाचे हे बदलते चक्र दुष्काळामध्ये तेराव्या महिन्यासारखे ठरत आहे. पाऊस कसा आणि कधी पडेल याचा नेम नाही. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने निसर्गचक्रही आपला रंग दाखवीत आहे. हे वास्तव दिवसेंदिवस अधिक गडद होणार आहे. त्यामुळे शेतामधील उभी पिके कधी शेतामध्येच सडतात, तर कधी पाण्याअभावी सुकूनही जातात. पीक हाती आलं की, त्याचे भाव खाली आलेले. या दृष्टचक्रामधून शेतकऱ्याने बाहेर पडण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो बाहेर पडूच शकत नाही. उलट त्या चक्रात तो अधिक फसत जातो. हे एक भयाण वास्तव आहे. त्यामुळे निसर्ग आणि दलाल अशा दुहेरी चक्रामध्ये अडकलेल्या शेतकऱ्यांच्या हाती हतबलतेशिवाय काहीच येत नाही.

आता पूर्वीसारखी शेतीही परवडणारी राहिली नाही. दरवर्षी वाढणारा लागवडीचा खर्च, खताचे वाढते दर त्यामुळे शेतमालाचा उत्पादन खर्च अतिशय वाढला आहे. कधी कांदा, कधी पालेभाज्या, कधी टोमॅटो तर कधी निसर्गाच्या धक्क्यानेही शेतकरी सदैव अडकित्यामध्ये सुपारीसारखा अडकलेला असतो. वर्षभर ही मालिका सुरू राहत असल्याने आज शेतकरी अधिक भरडला जात आहे. काँग्रेसने वाऱ्यावर सोडलेल्या शेतकऱ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलासा देण्याचा प्रयत्न केला. परंतु, विरोधकांना तो पचनी पडला नाही. नरेंद्र मोदी यांच्या द्वेषापायी विरोधकांनी सर्व सीमा ओलांडल्या आहेत. त्यामुळे आशेचा एक जो किरण दृष्टिपथास आला होता, तोही विरोधकांच्या आक्रास्ताळपणामुळे धूसर होताना दिसत आहे. शरद पवार कृषिमंत्री असताना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. परंतु, तेव्हाही शेतकऱ्यांच्या हाती फक्त निराशाच आली. केंद्रात रालोआ सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांचे दु:ख जाणून त्यांच्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. नुकताच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा हप्ता खात्यात जमा करण्यात आला. केंद्र सरकार आणि राज्य सरकार मिळून आतापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात दोन योजनांमधून ९० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ५४ लाख कोटी रुपये जमा केले आहेत. हे सर्व असूनही दलाल, व्यापारी यांच्या साखळीतून शेतकऱ्यांची सुटका होणे आवश्यक आहे.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# नवीन कामगार कायद्यांतर्गत अंमलबजावणी

आपल्याकडील उद्योग-व्यवसायात प्रस्थापित व परंपरागतरीत्या व्यवस्थापक-अधिकारी, मर्यादित वा विशिष्ट संख्येतील कर्मचारी-कामगार व तुलनेने मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगार अशा पद्धतीने नियोजन केले जाते. व्यवस्थापन व व्यवस्थापकांना या वर्गवारीनुरूप संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करावी लागते.

आता नव्या कामगार कायद्यांनुसार, कंत्राटी कामगारांना कामावरील सुरक्षा, आरोग्य व कामकाजाशी संबंधित 'नियम, २०२०'च्या तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत. याच तरतुदींनुसार आता कंत्राटी कामगारांची नेमणूक आस्थापनेशी अप्रत्यक्षपणे संबंधित असणाऱ्या सुरक्षा, कँटीन, स्वच्छता व निगडित कामे अशा ठिकाणी करता येईल.

अर्थात, यातील पूरक तरतुदीनुसार, ज्या कारखाने वा आस्थापनांमध्ये विशिष्ट प्रकारची कामे पारंपरिक स्वरूपात कंत्राटी पद्धतीने केली जातात, अशा आस्थापनांमध्ये कामगारांची नेमणूक व संख्या यामध्ये लवचीकता साधण्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी नेमणूक करण्याची तरतूद २०२०च्या औद्योगिक संबंध नियमांमध्ये करण्यात आली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. २०२०च्या कामाच्या सुरक्षा-आरोग्य या तरतुदींतर्गत आता कंत्राटी कामगारांसह सर्वच कामगारांना नेमणूकपत्र देणे बंधनकारक ठरणार आहे. हे नेमणूक पत्र संबंधित ठेकेदार त्यांच्या कामगारांना देतात अथवा नाही, याची जबाबदारी संबंधित व्यवस्थापनाची राहणार आहे. या नियमांची पूर्तता नव्या कामगार कायद्यांतर्गत लागू झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत करणे अपेक्षित आहे.

नव्या कामगार कायद्यांतर्गत असणाऱ्या पगार व वेतनविषयक तरतुदींनुसार काही महत्त्वपूर्ण बदल होणार आहेत. २०१९च्या वेतनविषयक तरतुदींनुसार सर्व प्रकारचे उद्योग व व्यावसायिक क्षेत्रांना लागू असणाऱ्या किमान वेतनाची निश्चिती आता केंद्र सरकारतर्फे करण्यात येईल. संबंधित राज्य सरकारांवर न्यूनतम वेतनाची ही मर्यादा पाळणे बंधनकारक असेल. याअंतर्गत महत्त्वाच्या तरतुदींनुसार कामगारांच्या ११६ श्रेणींची अकुशल श्रेणीत, १३४ श्रेणींची अर्धकुशल, तर ११३ श्रेणींची उच्च-कुशल श्रेणींमध्ये वर्गवारी करण्यात आली आहे. २०२०च्या सुरक्षा, आरोग्य व सेवा-शर्ती यामध्ये नमूद केलेल्या नव्या नियमांनुसार



कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहा वर्षेपर्यंतच्या मुलांसाठी पाळणाघराची सोय उपलब्ध करून देणे, अतिरिक्त कामाच्या तासांसाठी दुप्पट दराने अतिरिक्त वेतन देणे, महिला कर्मचाऱ्यांच्या संमतीने त्यांना संध्याकाळी ६ ते सकाळी ६ यादरम्यान कामावर येण्याची व्यवस्था करणे इ. सोयीसुविधा बंधनकारक करण्यात आल्या आहेत.

नव्या कामगार कायद्यांतर्गत २०२०च्या औद्योगिक संबंध अधिनियमांनुमार कामगारांना नोकरी-रोजगार गमाविण्याच्या वेळी उपयुक्त ठरावे, या उद्देशाने 'कामगार कौशल्य विकास निधी'ची योजना प्रथमच सुरू करण्यात आली आहे. या निधीमध्ये कामावरून कमी करण्यात आलेल्या कामगाराच्या शेवटच्या मासिक पगारातील १५ दिवसांच्या पगाराची राशी संबंधित व्यवस्थापनातर्फे देण्यात येईल. ही राशी कामावरून कमी करण्यात आलेल्या कामगाराच्या खात्यात ४५ दिवसांच्या आत जमा करण्यात येईल व अशाप्रकारच्या कामगारांना त्यांच्या कौशल्य विकासासाठी प्रोत्साहन दिले जाईल. २०२०च्या नव्या औद्योगिक संबंध कायद्यानुसार आस्थापनेअंतर्गत कामगार संघटनेच्या मान्यतेच्या संदर्भात कामगारांशी चर्चा-वाटाघाटीसाठी कौन्सिलची जोड देण्यात येणार आहे. याच संदर्भात पुढे नमूद केल्यानुसार, ज्या उद्योग-आस्थापनांमध्ये केवळ एकच कामगार संघटना असेल, तर त्या आस्थापना-व्यवस्थापनाला संबंधित कामगार संघटनेला मान्यता प्रदान करता येईल.

ज्या आस्थापनांमध्ये एकापेक्षा अधिक कामगार संघटना कार्यरत असतील व यापैकी कुणाही संघटनेकडे ५१ टक्के वा अधिक सदस्यसंख्या नसेल, तर अशा आस्थापनांमध्ये २० टक्के अथवा त्याहून अधिक सदस्यसंख्या असणाऱ्या कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची मिळून कौन्सिलची स्थापना केली जाईल.

संप व टाळेबंदी यासंदर्भात नव्या 'औद्योगिक संबंध कायदा, २०२०'मध्ये संप व टाळेबंदीला कायदेशीर स्वरूप देण्याची तरतूद आहे. त्यानुसार, कामगार संघटनेला संप करण्यासाठी १४ दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या कालावधीदरम्यान संपाची पूर्वसूचना देण्यात येणाऱ्या प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी समेट-प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक असेल. ज्या ठिकाणी कामगारांनी केलेला संप अवैध घोषित करण्यात येईल, अशा कामगारांचे नियमानुसार आठ दिवसांचे वेतन कापण्यात येईल. अशाच स्वरूपाच्या तरतुदी व्यवस्थापनातर्फे टाळेबंदी लागू करण्याच्या संदर्भात पण लागू होतील. टाळेबंदी लागू करण्यासाठी १४ दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक करण्यात आले असून, अन्यथा टाळेबंदी बेकायदेशीर ठरविली जाईल, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

नव्या तरतुदींनुसार, प्रत्येक आस्थापनेमध्ये कामगार व व्यवस्थापनाचे समप्रमाणात प्रतिनिधी असणारी 'वर्क्स कमिटी' स्थापण्यात येईल. या समितीचे काम परस्परांतील मतभेदांचे निराकरण करून चांगले वातावरण व संबंध निर्मितीवर भर देणे, हे असेल. याशिवाय, २०२०च्या औद्योगिक संबंध कायद्यामध्ये कामगारांच्या वैयक्तिक प्रश्न व समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'तक्रार निवारण समिती' गठित करण्यात येईल. या समितीत पण कामगार व व्यवस्थापनाचे प्रतिनिधी समप्रमाणात असतील. या समितीच्या सदस्यांची संख्या दहापर्यंत असेल. नव्या कामगार कायद्यांमध्ये कामगारांची सेवानिवृत्ती, कामगार-कपात, कामावरून काढून टाकणे व कामगारांचा राजीनामा या कामगारांच्या सेवाचक्राशी संबंधित असणाऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर विचार करण्यात आला आहे. नव्या नियमांनुसार, कामगार-कपात करण्यासाठी सरकारची पूर्वपरवानगी घेण्यासाठी आधीची १०० कामगार संख्येची अट आता ३०० कामगारांपर्यंत वाढविण्यात आली असून, वरील विविध नवे नियम व तरतुदी यांच्या माध्यमातून नवी दिशा आणि पद्धत देण्याची तयारी केली जात आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### बनावट बातम्यांचा मायाजाल

गेल्या काही वर्षांत जगाने संपर्काच्या क्षेत्रात क्रांती केलेली आहे. फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर) यासारख्या समाज माध्यमांतून बनावट आणि खोट्या बातम्या पसरवल्या जातात. खऱ्या बातम्यांपेक्षा खोट्या बातम्या आणि अफवा अत्यंत वेगाने पसरत असतात. बनावट बातम्यांद्वारे खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती अपलोड केली जाते. या बातम्यांमुळे भीती, द्वेष आणि अविश्वास निर्माण होऊ शकतो. कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी ती सत्य आणि विश्वासार्ह आहे याची खात्री करावयास हवी. बनावट बातमी ओळखण्यासाठी तिचा स्रोत असणारं न्यूज चॅनल वा वेबसाईट तपासा. हे संशयास्पद वाटत असल्यास इतर माध्यमांतून बातमीची सत्यता पडताळून बघावी. बातमीचा लेखक/लेखिका आणि ती केव्हाची आहे याची शहानिशा करावी. समाज माध्यमांवर माहितीची सत्यता न तपासता ती पुढे पाठवणे सामाजिक स्वास्थ्यासाठी घातक ठरू शकते.

**डॉ. मदन मनोहरराव काकडे**/९३७३११२४८७

### महिलांचे मत खरेदी करता येत नाही

'तिच्या हाती सत्तेची दोरी!' हा 'वेध'मधील लेख वाचून असा समज होतो की महिलांच्या खात्यात पैसे टाकले की निवडून येता येते. म्हणून तिच्या हाती सत्तेची दोरी आहे. पण असे लोक पैसे खात्यात जमा होणे क्षणिक एक लालूच आहे आणि त्यामुळे महिला त्या पक्षाला मतदान करतात हा गैरसमज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ज्या प्रमाणात महिला निवडून आल्या आहेत व कारभार सांभाळणार आहेत ते खरे तिच्या हातात सत्तेची दोरी येणं आहे. महिला योजनेखाली त्यांच्या खात्यात पैसे जमा करून त्यांची मते खरेदी केल्यासारखे वागणे अनुचित आहे. महिलांनी या आमिषांना बळी न पडता त्यांच्या तारतम्याने मतदान करावे म्हणजे खऱ्या अर्थाने सत्तेची दोरी तिच्या हातात येईल. महिलांची मते अशी खरेदी करता येत नाही हे त्यांनी दाखवून दिले पाहिजे.

**माया हेमंत भाटकर**/पुणे

## वाचक पत्रे

### श्रीरामांचे निस्सीम भक्त हनुमान



हनुमान हे भगवान श्रीरामाचे निस्सीम भक्त आहेत. रामायणातील महानायक, अष्टसिद्धी नवनिधीचे पूजक असून भगवान शिवाचा अकरावा रुद्रावतार मानले जातात. श्रीहनुमान अंजना आणि केसरी यांचे पुत्र असून वायुदेवाचे आधात्मिक सुपुत्र आहेत. हनुमानाचा जन्म अंजनेरी पर्वत नाशिक महाराष्ट्र चैत्र पौर्णिमेला झाल्याचे मानले जाते, याच दिवशी सर्वत्र विशेषतः महाराष्ट्रात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येता. (उत्तर भारतात नरक चतुर्दशीला तर वाल्मीकिच्या रामायणानुसार कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षाच्या चतुर्दशीला मंगळवारी झाला असल्याचे कळते) बालपणी सूर्याला फळ समजून गिळायला गेल्यामुळे इंद्राने त्यांच्यावर वज्रास्त्र सोडले, ज्यामुळे त्यांची हनुवटी जखमी झाल्यामुळे हनुमान हे नाव पडले. याशिवाय हनुमंत, बजरंगबली, आंजनेय, पवनपुत्र, वायुपुत्र, मारुती ही सुद्धा त्यांची नावे आहेत. महाराष्ट्रात श्री समर्थ रामदास स्वामींनी १७ व्या शतकात अकरा हनुमान (मारुती) मंदिराची सेवाभावनेतून राष्ट्रनिर्माणाकरिता स्वराज्य अभियानात तरुणांना शारिरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत करण्याकरिता स्थापना केली होती. अकरा मंदिरे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि आधात्मिक वारशाची ओळख आहे. श्री समर्थ रामदास स्वामींनी नाशिकला गोदावरीच्या पात्रात तेरा अक्षरी मंत्राचा तेरा वर्षे अखंड तेरा कोटी जप केला. (श्रीराम जय राम जय जय राम) त्यावेळेस वानराच्या रूपाने प्रत्यक्ष हनुमान स्वामींना भेटले. श्रीरामाच्या दर्शनापूर्वी प्रवेशद्वारावर असलेल्या मारुतीची स्तुती केली व प्रचंड सामर्थ्याचे श्रीमारुती स्तोत्र आजही आपल्याकडे म्हटले जाते.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

### राष्ट्र आणि धर्मासाठी

सध्या हिंदू संस्कृतीवर चित्रपट, वेब सीरिज, जाहिरात या माध्यमातून देवीदेवतांचे विडंबन केले जात आहे. हिंदूंच्या मंदिरांचे सरकारीकरण केले जात असून मंदिरांचा कोट्यवधी रुपयांचा निधी घेतला जात आहे. अशावेळेस राष्ट्र आणि धर्म यांच्या रक्षणासाठी आपणही काहीतरी करायला हवे, असा विचार करत असताना मागील वर्षाच्या हिंदू राष्ट्र जागृती सभेच्या काही व्हिडीओ क्लिप्स माझ्या पाहण्यात आल्या. त्यामधून हे लक्षात आले की, बोकाळलेला भ्रष्टाचार, गोहत्या, लव्ह जिहाद, मंदिर सरकारीकरण, राष्ट्रपुरुष आणि देवीदेवता यांचा अवमान याविरोधात हिंदूंनी संघटित होण्याची आवश्यकता आहे. या सभांमधून धर्माचरणाचे महत्त्व सांगितले जाते, समाजामध्ये जागृती केली जाते. अशा सभांमधून जनजागृती होणे ही काळाची गरज आहे. एक सामान्य नागरिक या नात्याने अशा सभा होणे ही काळाची गरज आहे असे वाटते.

**अपर्णा जगताप**/पुणे

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ६६ कोटींच्या वाढीसह...

पान ३ वरून...

**असे आहे मागील वर्षांचे बजेट**

सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक १०५५ कोटी रुपये, २०२३-२४ चे अंदाजपत्रक १०७५ कोटी १९ लाख रुपये, सन २०२४-२५ चे १ हजार १५७ कोटी २३ लाख १६ हजार ४०१ रुपयांचे अंदाजपत्रक होते. सन २०२५-२६ चे अंदाजपत्रक १२९३ कोटी ३० लाख १३ हजार ४०१ रुपयांच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली.

**सभागृह नेत्यांनी मांडलेल्या सूचना व शिफारशी**

✻ सुपर टॅक्स रद्द करून उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे. ✻ महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभिकरण करावे. ✻ वृक्षसंवर्धन व डिव्हायडरवर वृक्षारोपण करावे. ✻ जयंतीनिमित्त विचार प्रबोधन कार्यक्रम घ्यावेत. ✻ टीसीआयडीएस अंतर्गत एमआयडीसी सुधारणा कराव्यात. ✻ एमआयडीसी भागात रुग्णालय, अग्निशामक केंद्र व बागा उभाराव्यात. ✻ बोगस नळ शोधून कारवाई करावी. ✻ ओपन स्पेसचे ऑडिट करावे. ✻ शहर प्रवेशद्वार व दिशादर्शक फलक उभारावेत. ✻ उत्पन्न वाढीसाठी तज्ज्ञ समिती स्थापन करावी. ✻ सीएनजी/इलेक्ट्रिक वाहने खरेदी करावीत. ✻ मनपा शाळांत पॅटर्न लागू करावा. ✻ विणकर, मार्कडेय, जानकीनगर बागा सुशोभित कराव्यात. ✻ गोलचावडी दवाखाना सुपर स्पेशालिटीमध्ये रूपांतरित करावा. ✻ महिलांसाठी सार्वजनिक शौचालये बांधावीत. ✻ स्मशानभूमी सुधारणा कराव्यात. ✻ जुळे सोलापुरात नाट्यगृह उभारावे. ✻ जुळे सोलापुरात इनडोअर स्टेडियम बांधावे. ✻ मनपा दवाखान्यांचे नुतनीकरण करावे. ✻ प्रमुख रस्त्यांवर वृक्षारोपण करावे. ✻ अपघात टाळण्यासाठी डिव्हायडर, सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग करावे. ✻ ५४ मीटर रस्ता तात्काळ पूर्ण करावा. ✻ झोपडपट्टीतील पक्क्या घरांवर योग्य कर धोरण लागू करावे. ✻ थकित रिव्हिजन प्रक्रिया त्वरित पूर्ण करावी. ✻ नोंद न झालेल्या मालमत्तांचा सर्व्हे करून कर आकारावा. ✻ विकास आराखड्यासाठी निधी स्थापन करावा. ✻ सौरऊर्जाधारकांना १० टक्के करसवलत द्यावी. ✻ १०० टक्के मालमत्ता नोंद व कडक वसुली करावी. ✻ डिजिटल शिक्षण वाढवावे. ✻ प्रदूषण नियंत्रण उपाय तात्काळ राबवावेत. ✻ भाजी विक्रेते ओट्यावरच बसतील याची दक्षात घ्यावी. ✻ मनपा मालमत्तांची तपासणी व नावफलक लावावेत. ✻ भाजी मंडई वसुली महिला बचत गटांमार्फत करावी. ✻ स्मशानभूमीत स्वच्छता व पाणी व्यवस्था ठेवावी. ✻ जलतरण तलावांचे नुतनीकरण करावे. ✻ झोपडपट्टी पुनर्विकास राबवावा. ✻ सर्व मिळकती व नळांचा सर्व्हे करावा. ✻ हद्दवाढ भागात ज्येष्ठ नागरिक केंद्र व सुविधा द्याव्यात. ✻ डब्ल्यूटीपी प्लांट उभारून पाणीपुरवठा सुधारावा. ✻ वक्फ जागांवर रिव्हिजन करून कर वसुली करावी.

**सर्वांगीण विकासासाठीचे अंदाजपत्रक : महापौर कोंड्याल**

सोलापूर शहर विकासाच्या दृष्टीने आदर्शवत आणि महत्त्वपूर्ण असे हे अंदाजपत्रक आहे. वचनपूर्तीचे हे अंदाजपत्रक आहे. यामध्ये रस्ते, मूलभूत सुविधा, हद्दवाढ भागांचा विकास, महिला सुरक्षा, भारतरत्न डॉ. आंबेडकर संविधान भवन, मराठा भवन, ५४ मीटर रस्ता यासह विविध विकास कामांचा समावेश आहे. महापालिकेतील कर्मचाऱ्यांना मेडिक्लेम योजनेचा लाभ देण्यासाठी तीन कोटीची तरतूद करण्यात आली, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

**जाहीरनाम्यातील आश्वासनाची पूर्तता : सभागृह नेते काळे**

भाजपाने निवडणुकांमध्ये दिलेल्या आश्वासन आणि जाहीरनाम्यातील मुद्द्यांची अंदाजपत्रकमध्ये पूर्तता करण्यात आली. उत्पन्न वाढीवर अधिक भर देण्यात आला आहे. मूलभूत सुविधा यांसह नाट्यगृह, इनडोअर स्टेडियम आणि विविध ठिकाणी अभ्यासिका सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व नगरसेवकांना समान निधी देण्याचे आश्वासनही पूर्ण केले आहे, असे सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी सांगितले.

**लोकाभिमुख अंदाजपत्रक : स्थायी समितीच्या सभापती चाकोते**

यंदा प्रथमच नागरिकांकडून घेण्यात आलेल्या सूचना आणि शिफारसी यांचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात आला. सुंदर सोलापूरसह शिक्षण आणि आरोग्य यासाठी अंदाजपत्रकात निधीची तरतूद करण्यात आली आहे. हद्दवाढ भागाकडे अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, असे स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांनी सांगितले.

**महिला नगरसेविकांनीही बोलले पाहिजे : नगरसेवक केत**

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत महिलांसाठी स्वच्छतागृह दिसून येत नाही. याबाबत महिला नगरसेविकांनी गप्प बसून चालणार नाही. याविषयी सभागृहात बोलले पाहिजे, अशी अपेक्षा नगरसेवक मनीष केत यांनी व्यक्त केली. दरम्यान, नगरसेवक केत यांनी हा मुद्दा उपस्थित केल्याबद्दल नगरसेविका वृषाली चालुक्य यांनी त्यांचे आभार मानले.

**पाणीपट्टी परत करा : नगरसेविका भंडाले**

शहरवासीयांना प्रत्यक्षात पाणी न देता बेकायदेशीर वसूल केलेली पाणीपट्टीची रक्कम नागरिकांना परत करण्यात यावी, अशी मागणी एमआयएमच्या गटनेत्या वाहिदा भंडाले यांनी केली.

# शिक्षक भरतीला ग्रीन सिग्नल; ‘पवित्र’ पोर्टलद्वारे दोन महिन्यांत प्रक्रिया

## ‘टेट’ उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

शालेय शिक्षण व्यवस्थेत सर्वांगीण विकासावर भर देत आता क्रीडा, कला आणि कार्यानुभव विषयांच्या शिक्षक भरतीला चालना मिळणार आहे. इयत्ता पाचवी ते दहावीच्या पटसंख्येचा विचार करून इयत्ता सहावी ते आठवीसाठी या विषयांच्या शिक्षकांची पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार २०२४-२५ च्या संचमान्यतेत या पदांना मान्यता देण्यात आली असून, आगामी दोन महिन्यांत ‘पवित्र’ पोर्टलद्वारे ही भरती प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळा, खासगी अनुदानित माध्यमिक शाळा तसेच महापालिका व नगरपालिकांच्या शाळांमध्ये क्रीडा, कला आणि कार्यानुभव शिक्षकांची रिक्त पदे भरण्यास गती मिळणार आहे. मात्र, अल्पसंख्याक शाळांमधील भरती प्रक्रिया स्वतंत्रपणे होत असल्याने या भरतीत त्यांचा समावेश नसणार आहे. भरती प्रक्रियेसाठी ‘टेट’ (शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी) उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे गुणवत्ताधारक व पात्र उमेदवारांना संधी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शाळांमधील शिक्षकांची गरज निश्चित करताना

### क्रीडा, कला व कार्यानुभव शिक्षकांनाहीं नोकरीची संधी

आगामी भरती प्रक्रियेत नियमित शिक्षकांसोबतच क्रीडा, कला आणि कार्यानुभव शिक्षकांची पदेही भरली जाणार आहेत. शाळांची पटसंख्या ‘यू-डायस’ प्रणालीवरून निश्चित केली जाणार असून, निकष पूर्ण करणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमध्येही ही पदे उपलब्ध होतील. त्यासाठी लवकरच शासनस्तरावरून पुढील आदेश अपेक्षित आहेत.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी**



इयत्ता पाचवी ते दहावीच्या एकूण पटसंख्येचा निकष लावला जाणार आहे.

त्यानुसार २५० पटसंख्या असलेल्या शाळांना क्रीडा शिक्षक, ५०० पटसंख्या असलेल्या शाळांना क्रीडा व कला शिक्षक, तर ७५० पटसंख्या पूर्ण करणाऱ्या शाळांना क्रीडा, कला व कार्यानुभव अशा तिन्ही विषयांचे शिक्षक मंजूर होणार आहेत. सध्या ‘पवित्र’ पोर्टलवर नोंदणीकृत उमेदवारांची यादी तयार करण्याचे काम सुरू असून, लवकरच संबंधित शैक्षणिक संस्थांकडून रिक्त पदांच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. या पोर्टलच्या माध्यमातूनच पात्र उमेदवारांना संबंधित शाळांमध्ये मुलाखतीसाठी पाठविले जाणार असल्याने भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुसूत्र होणार आहे. दरम्यान, वित्त विभागाने एकूण रिक्त पदांपैकी केवळ ८० टक्के पदे भरण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे शैक्षणिक संस्थांसमोर कोणत्या पदांना प्राधान्य द्यायचे, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. नियमित शिक्षकांच्या पदांसह क्रीडा, कला व कार्यानुभव शिक्षकांची पदे भरताना संस्थांना समतोल साधावा लागणार आहे. या निर्णयामुळे शालेय शिक्षणात केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या क्रीडा, कला आणि जीवनकौशल्य विकासालाही चालना मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया अधिक मजबूत होण्यास मदत होणार असून, शिक्षक भरतीच्या प्रक्रियेला एक नवे वळण मिळणार आहे.



# आठ दिवसात निधी न दिल्यास ‘झेडपी’ला काँग्रेसचा घेराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

जिल्हा परिषदेच्या विविध योजनांअंतर्गत खासदार प्रणिती शिंदे यांनी सुचवलेल्या विकासकामांना निधी न मिळाल्याने जिल्हा काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. आठ दिवसात निधी मंजूर न झाल्यास जिल्हा परिषदेला घेराव घालून आंदोलनाचा इशारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिला आहे.

विविध गावांतील विकासकामांसाठी खासदार शिंदे यांनी वर्षभरात वारंवार पत्रव्यवहार करूनही जिल्हा परिषद तसेच शासनाकडून निधी मंजूर झालेला नसल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाध्यक्ष शटगार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावर चौकशी करून दोन दिवसांत माहिती देण्याचे आश्वासन जंगम यांनी दिले.

विकासकामांसाठीचा निधी सर्वांना समान मिळाला पाहिजे, अन्यथा काँग्रेस रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी उत्तर सोलापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष भारत जाधव, जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोक देवकते, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, बंटी चंदनशिवे, पद्मिनी शेट्टीआर, शिल्पा चांदणे, ॲड. महादेव कांबळे, उत्तमकुमार वाघमारे, रोहिणी गायकवाड, शंकर गायकवाड आदी उपस्थित होते.

# अभिनेते अनासपुरेंची प्रार्थना फाऊंडेशनला भेट

## विषमुक्त सेंद्रिय शेती प्रकल्पाचे केले उद्घाटन; स्वतः पहिले ग्राहक बनून भाजीपाला खरेदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

प्रार्थना फाऊंडेशनच्या माध्यमातून मोरवंची (ता. सोलापूर) येथे अनाथाश्रम व वृद्धाश्रम चालविण्यात येत असून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुले, वंचित, अनाथ, निराधार तसेच भिक्षा मागणाऱ्या मुलांचा आणि अनाथ, निराधार, बेघर वृद्ध आजी-आजोबांचा सांभाळ केला जातो. या समाजोपयोगी प्रकल्पाला भेट देण्यासाठी सुप्रसिद्ध व जेष्ठ सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी प्रार्थना फाऊंडेशनला भेट दिली. एवढेच नव्हे तर स्वतः पहिले ग्राहक बनून विषमुक्त भाजीपाला विकत घेतला. यावेळी त्यांनी नागरिकांना आवाहन करत आरोग्यदायी जीवनासाठी विषमुक्त अन्न महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

यावेळी त्यांनी आश्रमातील मुलांशी तसेच वृद्ध आजी-आजोबांशी संवाद साधला. मुलांनी अभ्यास करावा, कष्ट करावे आणि सक्षमपणे स्वतःच्या पायावर उभे राहावे, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. त्यांच्या या प्रेरणादायी भेटीमुळे आश्रमातील मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, प्रार्थना फाऊंडेशनच्या माध्यमातून आणि अविरत



फाऊंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विषमुक्त सेंद्रिय शेती प्रकल्पाचे उद्घाटन मकरंद अनासपुरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विशेष म्हणजे त्यांनी स्वतः पहिले ग्राहक बनून विषमुक्त भाजीपाला विकत घेतला. यावेळी त्यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, आरोग्यदायी जीवनासाठी विषमुक्त अन्न महत्त्वाचे आहे.

# ‘वालचंद’ च्या फाउंडेशन कोर्स सेमिनारने उजळली विद्यार्थ्यांच्या भविष्याची वाट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्समध्ये दोन दिवसीय मोफत फाउंडेशन कोर्स सेमिनार पार पडला.





या कोर्सची सुरुवात ६ एप्रिलपासून होणार आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना या संधीचा लाभ घेण्यासाठी वेळेत नोंदणी करण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी केले. उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी ११वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले.

विभागप्रमुख बाशा पठाण यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी अभ्यासाची योग्य पद्धत, वेळेचे काटेकोर नियोजन आणि सातत्यपूर्ण सराव यांचे महत्त्व पटवून दिले. तर अनुपम सिसोंदिया यांनी परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या रणनीती, अभ्यास आणि आत्मशिस्तीची गरज अधोरेखित केली. स्वयं-अर्थसहाय्यित विभागाच्या समन्वयिका सारिका महिंद्रकर यांनी फाउंडेशन कोर्सची अभ्यासरचना, आधुनिक अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा यांची माहिती दिली. सूत्रसंचालन अंबिका माळी आणि उज्वला तांदळे यांनी केले तर स्मिता वडले, आशा येळणे यांनी आभार मानले.

**CHANGE OF NAME**

I am Saroja Birajdar Changing my name from **Patil Bebi Saroja Sidram** to **Saroja Sidramappa Birajdar** for Passport issuance

**(Affidavit no.- 14421)**
**Date - 30/03/2026**

**वारस प्रमाणपत्राचे जाहीर प्रगटन**

दि.कि.अर्ज नं. ११/२०२६
नि.नं. ७

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर, अक्कलकोट यांचे न्यायालयात**

ज्यापेक्षा मयत मन्सूर शेखलाल नदाफ हे दिनांक १९/०१/२०२५ रोजी मौजे चुंगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथे मयत झाले असून, त्यांचे वारस अर्जदार : **१)** नुरबानू मन्सूर नदाफ, वय - ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. चुंगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. **२)** शेखलाल मन्सूर नदाफ, वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर प्रमाणे. **३)** मुस्कान मन्सूर नदाफ, वय - १९ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर प्रमाणे. **४)** आस्मा अशपाक नदाफ, वय - २५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. वानकर वस्ती, देगाव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर. **५)** रेश्मा सुभान नदाफ, वय - २६ वर्षे, धंदा - घरकाम, रा. फ्लॅट नं. ३, सर्व्हे नं. ३१/९५, नदाफ रेसिडेन्सी, चौधरी नगर, पुणे. शपथेवर निवेदन करतो की हे मयताचे वारस असून, वारसांचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार नं. १ ते ५ हे सदर मयताचे वारसदार नव्हे असे कोणास कळविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून १ महिन्याचे आत त्याने मा. न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयत मन्सूर शेखलाल नदाफ रा. चुंगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यांत येईल.

**पु.ने. तारीख :- ०२/०५/२०२६**
**आज दिनांक :- ३०/०३/२०२६**

**सही/-**
**लिपीक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, अक्कलकोट (आदेशावरुन)**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, अक्कलकोट (आदेशावरुन)**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पेठ उत्तर सदर बझार येथील मिळकत यांसी टी.पी. स्किम नं. ३, सि.स.नं. ३६३१, म्यु.पल घर नं. ५७३, ५७४ यावर बांधण्यात आलेले गिरीराज अपार्टमेंटमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ९ यांसी क्षेत्र ४८.२१ चौ.मी. इतके असून यात एक बेडरुम, एक हॉल, एक किचन, संडास बाथरुम व दोन गॅलरीसह फ्लॅट जागा. तसेच यात नळ कनेक्शन व वीज कनेक्शनची सोय आहे. यांसी सोलापूर महानगरपालिका मिळकत क्र. १७५०४० असा आहे. यांसी चतु:सिमा :- पूर्वेस - फ्लॅट नं. ७, दक्षिणेस - सि.स.नं. ३६४०, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - स्टेअरकेस असे आहे. सदर मिळकत ही श्रीमती काशीबाई शिवाजी जाधव यांचे मालकीची असून त्यांचे नावाची नोंद मिळकत पत्रिकेवर झालेली आहे. सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून रक्कम स्विकारुन इसारा पावती लिहून दिलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी परंतु सदर मिळकतीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, करार, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी, पोटगी, टाच, जप्ती, कुळ, वहिवाट, कब्जा करार, मदार, हिबानामा या संबंधीचा हक्क असलेस आणि इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचा वित्तीय अथवा सावकाराचा बोजा, हक्क व हितसंबंध असलेस अथवा सदर मिळकती सबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत सदर मिळकतीत असलेले हक्क दर्शविणारे कागदपत्रे पुराव्यासह खालील नमुद पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन असलेल्या हक्काची खात्री पटवून दयावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ठरल्याप्रमाणे आमचे अशिल मिळकती संबंधीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर सदर व्यवहारास कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार उपस्थित झाल्यास ते आमचे अशिलांवर व वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस दिली ता.३०/०३/२०२६.

**सही/-**
**विक्रम उत्तम कसबे**
**एन.कॉम., एल.एल.बी., ॲडव्होकेट**
**‘विसावा’ ४५२, डॉ. आंबेडकर नगर,**
**सोलापूर-०३. मो.नं. ९२२६११६४७३**

**IDFC FIRST Bank Limited**

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना तसेच सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, 2002’ च्या कलम 13 (2) अन्वये सूचना**

खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खालीलप्रमाणे सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची ही कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणाद्वारे सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारांमधील अटी व शर्तीचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या कर्जफेडीमध्ये अनियमितता निर्माण झाल्यामुळे, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे ‘अनुत्पादक मालमत्ता’ म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम, त्यांना जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आली आहे. तसेच, सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि हे व्याज संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या करारानुसार निश्चित दराने आकारले जाईल..

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 125309064 | मालमत्तेवर कर्ज | 1. दत्तात्रय मल्हारी खांडेकर<br>2. अनिता दत्तात्रय खांडेकर | 14/03/2026 | INR 8,07,645.32/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मालमत्ता क्रमांक 476/1 असलेले निवासी घर व त्यास संलग्न जमिनीचा संपूर्ण तुकडा; एकूण जमिनीचे क्षेत्रफळ 1113 चौरस फूट (मालमत्ता क्रमांक 476 च्या एकूण 2544 चौरस फूट क्षेत्रापैकी दक्षिण बाजूकडील भाग); दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले हे निवासी घर असून, त्याचा तळमजल्याचे क्षेत्रफळ 630 चौरस फूट आणि एकूण बांधकाम क्षेत्रफळ 630 चौरस फूट इतके आहे. ही मालमत्ता गाव : पुलूजवाडी, तालुका : पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413304 येथे स्थित आहे (ही मालमत्ता पुलूजवाडी ग्रामपंचायतीच्या दप्तरी नोंदणीकृत आहे). या मालमत्तेच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत. **सीमा :-** पूर्व - रस्ता; पश्चिम - रस्ता; उत्तर - मालमत्ता क्रमांक 356; दक्षिण - मालमत्ता क्रमांक 360.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 168815818 & 127696338 | मालमत्तेवर कर्ज | 1. जयराज विकास कवनाळे<br>2. जयराज विकास कवनाळ | 20/08/2026 | INR 10,70,820.92/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक 234/1 चा संपूर्ण भूखंड व हिस्सा; एकूण जमिनीचे क्षेत्रफळ 925.5 चौरस फूट; दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले निवासी घर, ज्याचे तळमजल्याचे क्षेत्रफळ = 650.00 चौरस फूट आणि एकूण बांधकाम क्षेत्रफळ = 650.00 चौरस फूट आहे. स्थान: गाव - तल्संगी, ग्रामपंचायत - तल्संगी, तालुका - मंगळवेढा, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र - 413319. चतु:सीमा : पूर्व - सरकारी रस्ता; पश्चिम - घर क्रमांक 234/2 (शिवानंद धनराया कवनाळे); उत्तर - सरकारी रस्ता; दक्षिण - रेवप्पा बसप्पा कवनाळे.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 135213065 | मालमत्तेवर कर्ज | 1. नामदेव मदनराव चव्हाण<br>2. राणी नामदेव चव्हाण | 14/03/2026 | INR 9,61,761.62/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक 985 असलेले निवासी घर व त्यास संलग्न जमिनीचा संपूर्ण तुकडा; एकूण जमिनीचे क्षेत्रफळ 1689 चौरस फूट; दगड, विटा आणि काँक्रीटचा वापर करून बांधलेले हे निवासी घर असून, त्याच्या तळमजल्याचे क्षेत्रफळ 500.00 चौरस फूट आणि एकूण बांधकाम क्षेत्रफळ 500.00 चौरस फूट इतके आहे. पत्ता: गाव - टाकळी सिकंदर, तालुका - मोहोळ, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र - 413248. मालमत्तेच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व - संतोष वसेकर, पश्चिम - रस्ता, उत्तर - जिल्हा परिषद शाळा, दक्षिण - दिलीप चव्हाण.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 136555347 | मालमत्तेवर कर्ज | 1. पांडूरंग नानासाहेब पाटील<br>2. पार्वती नाना पाटील | 20/03/2026 | INR 9,23,445.79/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मालमत्ता/घर क्रमांक 403 चा संपूर्ण भूखंड व हिस्सा, एकूण जमीन क्षेत्रफळ: 1974 चौ. फूट; दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले निवासी घर, ज्याचे तळमजल्याचे क्षेत्रफळ = 850.00 चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्र = 850.00 चौ. फूट; स्थित: गाव/मौजे: नारी, ग्रामपंचायत: नारी, तालुका : बार्शी, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-413404; आणि ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व - नामदेव बदाले, पश्चिम - पंडित बदाले, उत्तर - ऋषिकेश रणमल, दक्षिण - ग्रामपंचायत रस्ता.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 5 | 140075412 | मालमत्तेवर कर्ज | 1. संतोष हणमंत पाटील<br>2. जयश्री संतोष पाटील | 14/03/2026 | INR 5,63,225.47/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक 206 असलेले निवासी घर व त्यालगतचा संपूर्ण भूभाग; एकूण जमिनीचे क्षेत्रफळ 1050.00 चौरस फूट; दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले हे घर असून, त्याच्या तळमजल्याचे क्षेत्रफळ 690.00 चौरस फूट आहे; एकूण बांधकाम क्षेत्रफळ 690.00 चौरस फूट; स्थान : गाव - तळसंगी, तालुका - मंगळवेढा, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र - 413319; आणि या मालमत्तेच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत : पूर्व - रस्ता, पश्चिम - अशोक बनसोडे यांची मालमत्ता, उत्तर - विठ्ठल बसवंत पाटील यांची मालमत्ता, दक्षिण - विठ्ठल बसवंत पाटील यांची मालमत्ता.

आपणास याद्वारे आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार, तसेच संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या करारित व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना देय असलेली रक्कम, या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत अदा करावी. तसे करण्यात कसूर झाल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, स्वाक्षरी करणाऱ्यास सरफेसी कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अन्वये, वर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही सुरू करणे भाग पडेल. तसेच, सदर कायद्याच्या कलम 13 (13) अन्वये, आपणास सदर सुरक्षित मालमत्तांची विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

दिनांक : **31/03/2026**
स्थळ : **सोलापूर, महाराष्ट्र**

# जैन मुनी विशुध्द सागरजींची आचार्यपदाची १९ वर्षे पूर्ण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

आचार्य विशुद्ध सागरजी महाराज यांना आचार्य पदाला ३१ मार्चला १९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचे पूर्वाश्रमीचे राजेंद्र

### त्यांच्या दीक्षा प्रवासातील महत्त्वाचे टप्पे

**क्षुल्लक दीक्षा :** ११ ऑक्टोबर १९८९ला, १८व्या वर्षी.
**मुनि दीक्षा:** २१ नोव्हेंबर १९९१ रोजी श्रेयांस गिरी येथे आचार्य विराग सागरजी महाराजांच्या हस्ते
**आचार्य पद:** ३१ मार्च २००७ रोजी औरंगाबाद येथे.
**पट्टाचार्य पद :** ३० मे १९२५ इंदौर येथे.

लाला असून त्यांचा चंचल बालकापासून ते थोर अध्यात्म योगी बनण्यापर्यंतचा जीवनप्रवास अत्यंत प्रेरक आहे.

अवघ्या सात वर्षांच्या वयात त्यांनी रात्रीचे भोजन त्यागून संयमाच्या मार्गावर पहिले पाऊल ठेवले. पुढे ऐलक दीक्षा ग्रहण करून त्यांनी जिनवाणीचे सखोल ज्ञान आत्मसात केले. त्यांच्या कडक तपश्चर्येतून आणि ज्ञानामुळे आज ते जैन समाजाचे मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात.

# नंदूर-मंगळवेढा एस.टी.बस अडवून चालकास मारहाण

**मंगळवेढा :** नंदूर-मंगळवेढा या एस.टी.बसच्या पुढे रस्त्यात कारगाडी आडवी लावून बस थांबवून सदर बस चालकास शिवीगाळी करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी राजाराम ज्ञानोबा गवळी (रा.भालेवाडी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. आरोपीने एस.टी.चालकास खालच्या पातळीवर शिवीगाळी करुन तु डोणज मध्ये माझे वाहन मागे घेण्यास का लावले? असे म्हणत हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शासकीय कामात अडथळा आणल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

Classifieds

**पाहिजेत**

**पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन, ऑफलाईन काम करून अधिक इन्कम मिळवा. संधी सार्वांसाठी.**
**प्रियांका मॅडम**
**मो. 9226340650**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



## महत्त्वाचे

### प्रीती, दीपकची विजयी सुरुवात





**उलानबातर** : आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीती पवार आणि दीपक पुनियाने सोमवारी येथे आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मोहिमेची सकारात्मक सुरुवात केली. त्यांनी आपापल्या लढतींमध्ये वेगवेगळ्या शैलीत विजय नोंदविले. महिलांच्या ५४ किलो वजनी गटात प्रीतीने अत्यंत प्रभावी कामगिरी करीत, कझाकस्तानची माजी आशियाई विजेती (२०२५) असलेल्या एलिना बाजारोवावर ५-० अशा एकमताने निर्णय देत दणदणीत विजय मिळविला. एका अत्यंत अनुभवी आणि निष्णात प्रतिस्पर्ध्याविरुद्ध प्रीतीने निर्दोष विजय नोंदवून आपल्या क्षमतेचे एक जोरदार प्रदर्शन घडविले. पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात, बॉक्सम एलिट इंटरनॅशनल २०२६ मधील रौप्यपदक विजेता व आशियाई युवा मुष्टियुद्ध २०२२ स्पर्धेतील कांस्यपदक विजेता असलेल्या दीपकने उझबेकिस्तानच्या खावासबेक असादुल्लायेवचा ३-२ अशा विभाजित निर्णयाद्वारे निसटता पराभव केला. आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेमध्ये संपूर्ण खंडातील काही सर्वोत्तम मुष्टियोद्धांचा समावेश आहे.

### सिनर मियामी ओपन विजेता



**मियामी** : इटलीच्या जॅनिक सिनरने जिरी लेहेकाला ६-४, ६-४ अशा फरकाने पराभूत करत मियामी ओपन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या विजेतेपदाबरोबरच सिनर रॉजर फेडररनंतर सनशाइन डबल पूर्ण करणारा पहिला पुरुष खेळाडू ठरला. या विजयासह, २०१७ मधील रॉजर फेडररनंतर एकाच हंगामात इंडियन वेल्स आणि मियामी या दोन्ही स्पर्धा जिंकणारा तो पहिला पुरुष खेळाडू ठरला आहे. शिवाय, या दोन्ही स्पर्धांमध्ये एकही सेट न गमावता हा पराक्रम करणारा सिनर हा पहिलाच खेळाडू आहे. या २४ वर्षीय खेळाडूने आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच इंडियन वेल्सचे विजेतेपद जिंकले आणि सनशाइन डबल पूर्ण करणारा तो आठवा वेगळा पुरुष खेळाडू बनला. नोवाक जोकोविच व फेडररने हा पराक्रम अनेकदा केला आहे.

### एएफसी २० वर्षाखालील आशियाई चषकासाठी भारतीय संघ जाहीर

**नवी दिल्ली** : भारतीय २० वर्षांखालील महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक जोआकिम अलेक्झांडरसन यांनी सोमवारी एएफसी २० वर्षांखालील आशियाई चषक (थायलंड २०२६) फुटबॉल स्पर्धेसाठी २३ सदस्यीय संघाची घोषणा केली. थायलंडच्या राजधानीकडे रवाना होण्यापूर्वी भारतीय फुटबपॉल संघाने कोलकाता येथे सराव शिबिरात भाग घेतला. २० वर्षांनंतर या स्पर्धेसाठी पात्र ठरलेला भारत आपला मोहिमेचा प्रारंभ २ एप्रिल रोजी थम्मासट स्टेडियमवर जपानविरुद्धच्या सामन्याने करेल. त्यानंतर ५ एप्रिल रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध व ८ एप्रिल रोजी चीन तैपेईविरुद्ध भारतीय संघाचे सामने होतील. गटातील अव्वल दोन संघ आणि तिन्ही गटांमधील तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या संघांपैकी सर्वोत्तम कामगिरी करणारे दोन संघ उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करतील. शिवाय, उपांत्यपूर्व फेरीतील चार विजेते संघ २० महिला विश्वचषक (पोलंड २०२६) स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

**भारताचा २३ सदस्यीय संघ** : गोलरक्षक: मोनालिशा देवी मोइरांगथेम, नंदिनी, रिबांसी जमु. बचावपटू: सिंडी रेमरुआतपुई कोल्नी, निशिमा कुमारी, रेमी थोकचोम, रुची यादव, सहेना , शुभांगी सिंग, थोइबिसाना चानू तोइजम. मध्यरक्षक: अंजू चानू कायेंपाइबम, अरिना देवी नामेइराकपम, भूमिका देवी खुमुकचम, मनीषा सिंघा, नेहा, पूजा, श्रुती कुमारी. फॉरवर्ड: बबिता कुमारी, दीपिका पाल, लिंगदेकिम, शिलजी शाजी, सिबानी देवी नोंगमेइकपम, सुलंजना राऊल.

### मनिका, मानवच्या मोहिमेची सुरुवात पराभवाने

**मकाऊ** : येथे सुरू असलेल्या विश्वचषक टेबल टेनिस स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताच्या मनिका बत्रा आणि मानव ठक्करने आपल्या गट साखळी फेरीतील मोहिमेची सुरुवात पराभवाने केली. महिला एकेरीच्या ३१ मिनिटे चाललेल्या लढतीत मनिकाला जपानच्या मिवा हारिमोटोकडून ०-३ (१६-१८, ४-११, ६-११) असा पराभव पत्करावा लागला, तर मानव ठक्करला दक्षिण कोरियाच्या पार्क गँग-ह्योनकडून ०-३ (७-११, ६-११, ८-११) असा पराभव स्वीकारावा लागला. ही लढत २० मिनिटांपेक्षाही कमी कालावधीत संपली.

# राजस्थानने चेन्नईला हरवले

## वैभव सूर्यवंशीचे १५ चेंडूत अर्धशतक; जडेजा,आर्चर, बर्गरच्या प्रत्येकी २ विकेट





**गुवाहाटी, दि.३० मार्च-**

आयपीएलच्या १९व्या हंगामात एम.एस. धोनीशिवाय खेळणाऱ्या चेन्नई सुपर किंग्सची सुरुवात पराभवाने झाली. राजस्थान रॉयल्सने या संघाला ८ गडी राखून पराभूत केले.

सोमवारी गुवाहाटीच्या बरसापारा स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेन्नई सुपर किंग्सचा संघ १९.४ षटकांत १२७ धावा करून सर्वबाद झाला. राजस्थान रॉयल्सने १२.१ षटकांत केवळ २ गडी गमावून लक्ष्य गाठले. वैभव सूर्यवंशीने अवघ्या १५ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावले, ५२ धावा करून तो बाद झाला. त्याने ४ चौकार आणि ५ षटकार मारले. गोलंदाजीत रवींद्र जडेजा, जोफ्रा आर्चर आणि नांद्रे बर्गर यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. चेन्नईकडून जेमी ओव्हरटन सर्वाधिक ४३ धावांवर धावबाद झाला. अंशुल कंबोजने २ बळी घेतले.

**धोनी दुखापतीमुळे बाहेर**

सीएसकेचा माजी कर्णधार एम.एस. धोनी दुखापतीमुळे दोन आठवड्यांसाठी संघाबाहेर आहे. दक्षिण आफ्रिकेचा खेळाडू डेवाल्ड ब्रेविसदेखील दुखापतीमुळे तीन सामने खेळू शकणार नाही. ऋतुराज गायकवाड संघाचे कर्णधारपद भूषवत असून संजू सॅमसनला सलामीची जबाबदारी देण्यात आली आहे. पहिल्या सामन्यात या दोघांनाही प्रत्येकी केवळ ६ धावा करता आल्या.

# शीतल देवीला सर्वोत्तम तिरंदाज पुरस्कार



◆ **लॉझान, ३० मार्च**

भारताच्या शीतल देवीला जागतिक तिरंदाजी महासंघातर्फे २०२५ वर्षातील सर्वोत्तम तिरंदाज पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. शीतलच्या असाधारण कामगिरीमध्ये या सन्मानाची भर पडली असून, त्यात एका ऐतिहासिक विश्वविजेतेपदाच्या किताबाचाही समावेश आहे.

जम्मू आणि काश्मीरची ही १९ वर्षीय खेळाडू, गत वर्षी दक्षिण कोरियातील ग्वांगजू येथे झालेल्या जागतिक पॅरा तिरंदाजी स्पर्धेत महिलांच्या कम्पाऊंड वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकून, हात नसलेली पहिली व एकमेव महिला तिरंदाज ठरली आहे.

हात नसताना जन्मलेली शीतल, धनुष्य ओढण्यासाठी आणि नेम साधण्यासाठी आपले पाय, गुडघे आणि खांद्याचा कौशल्याने वापर करते. तिने जागतिक चॅम्पियनशिपमध्ये महिला सांघिक रौप्य आणि मिश्र सांघिक कांस्यपदक जिंकून पदकांचा संपूर्ण संचही मिळवला.

ग्वांगजू येथील विश्वविजेतेपदासह आणखी एका यशस्वी हंगामानंतर भारताच्या शीतल देवीने पॅरा आर्चर ऑफ द इयर या श्रेणीत हा सन्मान पटकावला आहे, असे वर्ल्ड आर्चरीने म्हटले आहे.

जागतिक स्पर्धेतील सुवर्णपदकाशिवाय शीतलने पॅरिस पॅरालिम्पिक्समधील मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदक, तसेच २०२२ च्या आशियाई पॅरा गेम्स आणि बँकॉक येथील २०२३ च्या आशियाई स्पर्धेत वैयक्तिक रौप्यपदकेही पटकावली आहेत.

हा क्षण खूप वैयक्तिक वाटतो. माझे हृदय कृतज्ञतेने, भावनांनी आणि या प्रवासात अनुभवलेल्या प्रत्येक गोष्टीने भरून आले आहे. धन्यवाद, असे अर्जुन पुरस्कार विजेती शीतलने सोमवारी समाज माध्यमावर पोस्ट केले. *(वृत्तसंस्था)*

# रोहितची आक्रमकता प्रतिस्पर्ध्यांसाठी धोक्याची : कुंबळे



◆ **मुंबई, ३० मार्च**

मुंबई इंडियन्ससाठी रोहित शर्माने नव्या आयपीएल हंगामाची सुरुवात ज्या आक्रमक पद्धतीने केली आहे, त्यामुळे मी खूप प्रभावित झालो आहे सध्याच्या आयपीएल बंगामाती त्याचा आक्रमक चेहरा प्रतिस्पर्ध्यांसाठी चिंतेचा विषय ठरेल, असे मत भारताचा माजी कर्णधार अनिल कुंबळेने व्यक्त केले.

३८ वर्षीय रोहितने रविवारी येथे झालेल्या आयपीएलच्या सलामीच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध मुंबई इंडियन्सच्या सहा गडी राखून मिळविलेल्या विजयात ३८ चेंडूंत ७८ धावांची खेळी केली.

रोहित शर्मा आपल्या २.० अवतारात परत आल्यासारखा वाटतोय. तो पुन्हा वर्चस्व गाजवण्यासाठी सज्ज आहे, हे त्याने आपल्या खेळीतून दाखवून दिले आहे. त्याच्या चौफेर फटकेबाजीने मला त्याच्या सर्वोत्तम काळाची आठवण करून दिली, असे कुंबळे म्हणाला.

वरुण चक्रवर्ती, सुनील नरेन आणि ब्लेसिंग मुझारबानी यांच्यासारख्या गोलंदाजांविरुद्ध षटकार मारणे सोपे नसते, पण त्याने ते सहज करून दाखवले. त्याने आपल्या तंदुरुस्तीवर खूप मेहनत घेतली आहे. असेही तो म्हणाला. जेव्हा तुम्ही थोड्या विश्रांतीनंतर परत येता, तेव्हा तुमचा टायमिंग परत मिळवण्यासाठी आणि लय पकडण्यासाठी पाच ते सात दिवस लागतात. *(वृत्तसंस्था)*

# देवळीत महाराष्ट्र केसरीचा आजपासून थरार

### मैदान तयार, पहलवान सज्ज



तयारीचा आढावा घेताना रामदास तडस व मान्यवर

◆ **देवळी, ३० मार्च**

माजी खासदार रामदास तडस यांच्या वाढदिवसानिमित्त देवळीत ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी किताब राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन मंगळवार ३१ रोजी होणार असून देवळी नगरी कुस्तीच्या जल्लोषात रंगण्यास सज्ज झाले आहे. भारतीय कुस्तीगीर संघ संलग्न महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने वर्धा जिल्हा कुस्तीगीर संघ व सार्वजनिक बजरंग व्यायाम शाळा, देवळीच्या संयुक्त वतीने ३१ मार्च ते १ एप्रिल दरम्यान ग्रीकोरोमन प्रकारातील ही प्रतिष्ठेची स्पर्धा रंगणार आहे.

खा. रामदास तडस इनडोअर स्टेडियम देवळी स्व. दत्ता मेघे क्रीडानगरी या स्पर्धेसाठी आकर्षक सजली असून स्पर्धा दोन मॅटवर खेळविण्यात येणार आहेत. स्टेडियममध्ये आधुनिक सुविधा उभारण्यात आल्या असून प्रेक्षकांसाठी बसण्याची व्यवस्था, शहरात ठिकठिकाणी स्वागत कमानी आणि सामन्यांचा थरार पाहण्यासाठी मोठ्या एलईडी स्क्रीनचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील तब्बल ४२ संघ आणि सुमारे ४०० मल्लांचे आगमन देवळीत झाले असून उद्घाटनापूर्वी सहभागी सर्व मल्ल आपापल्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत शहरातून मिरवणूक काढून स्टेडियमवर पोहोचून स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित खेळाडूंचा सहभाग या स्पर्धेचे आकर्षण ठरणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन ३१ रोजी सायंकाळी ७ वाजता माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी आमदार समीर कुणावार राहणार असून, स्वागताध्यक्ष आमदार राजेश बकाने, स्पर्धेचे आयोजक माजी खासदार रामदास तडस, आमदार दादाराव केचे, नगराध्यक्ष किरण ठाकरे, उपाध्यक्ष राहुल चोपडा आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

माजी खासदार रामदास तडस स्वतः स्पर्धा स्थळी उपस्थित राहून तयारीचा आढावा घेत आहेत. आमदार बकाने यांनीही नियोजनाची पाहणी केली आहे. या स्पर्धेच्या आयोजनाकरिता विलास जोशी, उमेश कामडी, रवींद्र करोटकर, रितेश लोखंडे, शुभांगी कुर्जेकर, सौरभ कडू, अंकित टेकाडे, शुभम तरेकर, प्रकाश करोटकर, विजय गोमासे आदी परिश्रम घेत आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

# प्रज्ञानंद, कारुआना संयुक्त आघाडीवर

### कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा



◆ **पाफोस, ३० मार्च**

भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने प्रतिष्ठित कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेत नेदरलॅण्डचा खेळाडू अनिश गिरीची संरक्षण फळी भेदून पूर्ण गुण मिळवित आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली. आता पहिल्या फेरीनंतर प्रज्ञानंद अमेरिकन ग्रॅण्डमास्टर फॅबियानो कारुआना व उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव्ह यांच्यासोबत संयुक्त आघाडीवर आहे.

पहिल्या फेरीत विश्वचषक विजेता सिंदारोव्हने आपल्या उत्कृष्ट डावपेचांचे प्रदर्शन करत रशियाच्या आंद्रे एसिपेन्कोवर मात केली, तर स्पर्धेपूर्वीचा प्रबळ दावेदार असलेल्या कारुआनाने सहकारी अमेरिकन खेळाडू हिकारू नाकामुराला धक्का दिला. आठ खेळाडूंच्या या डबल राऊंड-रॉबिन स्पर्धेतील जर्मनीचा मॅथियास ब्लूबाम व चीनचा वेई यी यांच्यातील दुसरा सामना अनिर्णीत राहिला, यात दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी एक गुण मिळाला. *(वृत्तसंस्था)*

### दिव्या, वैशालीच्या लढती बरोबरीत

महिलांच्या विभागत भारतीय ग्रॅण्डमास्टर व महिला विश्वचषक विजेती नागपूरच्या दिव्या देशमुखने, कोनेरू हम्पीच्या जागी ऐनवेळी बदली म्हणून आलेल्या युक्रेनच्या ॲना मुझीचुकसोबत सामना बरोबरीत सोडविला, तर आर. वैशालीने काही तणावपूर्ण क्षणांवर मात करून कझाकस्तानच्या बिबिसारा असाउबायेवासोबत गुण विभागून घेतला. रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिनानेही आपल्याच देशाच्या कॅटेरिना लॅग्नोसोबत सामना बरोबरीत सोडविला. चीनच्याच झू जिनर व टॅन झोंगयी यांच्यादरम्यानचा सामनाही बरोबरीत राहिला.

# कोमलिकाचे आशियाई स्पर्धेत पुनरागमनाचे ध्येय



◆ **रायपूर, ३० मार्च**

अथक परिश्रम करणे हाच प्रगतीचा एकमेव मार्ग आहे,या अथक परिश्रमाच्या बळावर आशियाई क्रीडा स्पर्धेत पुनरागमन करण्याचे ध्येय आहे, असे भारतीय तिरंदाज कोमलिका बारी म्हणाली.

एकेकाळी दीपिका कुमारीनंतर भारतीय तिरंदाजी क्षेत्रातील पुढील मोठी आशा म्हणून पाहिली जाणारी ही २४ वर्षीय कोमलिका बारी जागतिक क्रमवारीत घसरून ४९८ व्या क्रमांकावर पोहोचली आहे. तसेच, २०२४ पासून ती सध्या राष्ट्रीय संघातून बाहेर आहे.

सप्टेंबर २०२२ मध्ये गाठलेल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम ५१ व्या क्रमांकावरून झालेली तिची ही घसरण अत्यंत तीव्र आणि मोठी आहे. परंतु, कोमलिका हार मानण्यास तयार नाही.

पुढील काळात स्पर्धांनी भरलेले एक व्यस्त सत्र तिच्यासमोर आहे. त्याची सांगता या वर्षाच्या अखेरीस जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेने होईल आणि या संधीचा फायदा घेत पुन्हा एकदा आपले स्थान निर्माण करण्याची, तसेच २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकचे आपले स्वप्न पुन्हा जिवंत करण्याची तिला आशा आहे.

मी सध्या (भारतीय खेळाडूंमध्ये) अव्वल १६ खेळाडूंमध्ये समाविष्ट आहे आणि सराव शिबिराचा एक भाग आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या निवडीकरिता मी अत्यंत गांभीर्याने तयारी करीत आहे, असे कोमलिकाने येथे आयोजित पहिल्या खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

आमचे सरावाचे वेळापत्रक कायम राखत असतानाच, अधिकाधिक अनुभव मिळवण्यासाठी मी जास्तीत जास्त स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचाही प्रयत्न करीत आहे, असेही तिने सांगितले.

एकेकाळी तिचा हा प्रवास पाच वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या आणि जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी राहिलेल्या दीपिका कुमारीच्या प्रवासाचीच प्रतिकृती भासत होती.

२०२१ मध्ये, माद्रिद येथे १८ वर्षांखालील गटाचे विजेतेपद पटकावल्यानंतर अवघ्या दोन वर्षांनीच, व्रोक्लॉ येथे झालेल्या २१ वर्षांखालील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिने स्पेनच्या एलिया कॅनेल्सचा ७-३ अशा फरकाने पराभव करत विजेतेपद मिळविले. या कामगिरीसह, आपल्याच राज्यातील सहकारी खेळाडू असलेल्या दीपिकाने गाठलेल्या त्या दुर्मिळ दुहेरी विजेतेपदाच्या यशाची पुनरावृत्ती तिने केली.

त्यानंतर कोमलिकाने २०२१ मध्ये ग्वाटेमाला सिटी आणि पॅरिस येथे झालेल्या विश्वचषक स्पर्धांमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या संघाचा एक भाग म्हणून योगदान दिले. तसेच, २०२२ मध्ये ग्वांगजू येथे तिने सांघिक कांस्यपदकही पटकावले. विशेष म्हणजे, या काळात तिला दीपिकाचीच प्रशिक्षक असलेल्या पूर्णिमा महतो यांचे मार्गदर्शन लाभले होते. *(वृत्तसंस्था)*

# गिल, अय्यर छाप पाडण्यास उत्सुक



शुभमन गिल



श्रेयस अय्यर

◆ **मुल्लानपूर, ३० मार्च**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. भारताच्या टी-२० संघात अनेकदा दुर्लक्षित राहिलेले दोन फलंदाज- शुभमन गिल व श्रेयस अय्यर हे अनुक्रमे गुजरात व पंजाब संघाचे नेतृत्व करणार असून ह दोघेही या आयपीएलच्या अत्यंत महत्त्वपूर्ण सलामीच्या सामन्यात स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यास व आपली छाप पाडण्यास उत्सुक आहेत.

भारताचा कसोटी व वन-डे संघाचा कर्णधार असलेल्या गिलची टी-२० संघाचा उपकर्णधार म्हणून निवड झाली होती; परंतु संजू सॅमसनला संघात स्थान देण्यासाठी त्याला नंतर विश्वचषक संघातून वगळण्यात आले होते. त्यामुळे स्वतःला सिद्ध करण्याची व टीकाकारांना उत्तर देण्याची मोठी जबाबदारी गिलवर आहे.

२०२३ पासून केवळ विराट कोहलीनेच गिलपेक्षा अधिक धावा केल्या आहेत; परंतु आता लक्ष सातत्यावरून स्ट्राइक रेटकडे वळले आहे. २० कारकिर्दीत सुमारे १३८ चा स्ट्राइक रेट असलेल्या गिलने गत हंगामात सुधारणेची चिन्हे दर्शविली होती. फलंदाजी प्रशिक्षक मॅथ्यू हेडन यांचे गिलचे षट्कार मारण्याचे कौशल्य व त्याच्या आक्रमक शैलीवर बारकाईने लक्ष असेल.

२०२३ नंतर हार्दिक पांड्या संघातून बाहेर पडल्यापासून, गिलने कर्णधारपदाची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे व आता संपूर्ण संघ स्पष्टपणे त्याच्याच भोवती फिरताना दिसत आहे.

२०२२ मध्ये आपल्या पदार्पणाच्याच हंगामात विजेतेपद पटकावल्यानंतर, गुजरात टायटन्स हा सर्वात सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या संघांपैकी एक राहिला आहे. गत वर्षी त्यांनी गुणतालिकेत तिसरे स्थान पटकावले होते, मात्र एलिमिनेटर सामन्यात मुंबई इंडियन्सकडून त्यांना पराभव पत्करावा लागला होता.

२० खेळाडूंना संघात कायम केल्यामुळे हा संघ स्थिरावलेला व संतुलित वाटत आहे. गिल व साई सुदर्शनने गत हंगामात ७५९ धावांसह संघाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता, सुदर्शन बरगडीच्या दुखापतीतून सावरल्यानंतर पुनरागमन करीत आहे.

गुजरात टायटन्सकडे यष्टिरक्षक-फलंदाज कुमार कुशाग्रासारखे काही रोमांचक पर्यायी खेळाडूही उपलब्ध आहेत. सय्यद मुश्ताक अली चषकांत १६० हून अधिकचा स्ट्राईक रेट व ६० हून अधिकची सरासरी राखत त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपली छाप पाडली होती.

पंजाब किंग्जसाठी, पुन्हा एकदा बऱ्याच गोष्टी कर्णधार श्रेयस अय्यरवर अवलंबून असतील. श्रेयस हा आयपीएलमधील एक सिद्धहस्त व यशस्वी कर्णधार आहे. त्याने आतापर्यंत तीन वेगवेगळ्या संघांना अंतिम फेरीपर्यंत पोहोचवले आहे (२०२० मध्ये दिल्ली कॅपिटल्स, २०२४ मध्ये केकेआर व गत हंगामात पंजाब किंग्स).

सातत्यपूर्ण कामगिरी करूनही, अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीकडून श्रेयसकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. त्याने शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना डिसेंबर २०२३ मध्ये खेळला होता.

गत हंगामातही या कर्णधाराने स्वतः पुढाकार घेत संघाला आधार दिला होता. त्याने १७५ हून अधिकच्या स्ट्राईक रेटने ६०४ धावा कुटल्या होत्या. ही त्या हंगामातील सर्वाधिक धावा करणाऱ्या पहिल्या १० फलंदाजांमध्ये सर्वोच्च कामगिरी ठरली होती. तरीही, आशिया चषक व टी-२० विश्वचषकासाठी भारताच्या टी-२० संघात त्याला स्थान मिळविता आले नाही.

पंजाब संघाची खरी ताकद त्यांच्या स्फोटक फलंदाजीत सामावलेली आहे. सलामीवीर प्रभसिमरन सिंग व प्रियांश आर्या ही जोडी गत हंगामातील सर्वात विध्वंसक जोड्यांपैकी एक ठरली होती; त्यांनी एकत्रितपणे जवळपास १६९ च्या स्ट्राईक रेटने १,०२४ धावांची भर घातली होती. मात्र, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये या दोघांची कामगिरी तुलनेने साधारण राहिली आहे, त्यामुळे त्यांच्या सध्याच्या फॉर्मबद्दल प्रश्नचिन्हे निर्माण झाली आहेत.

निहाल वढेरा, शशांक सिंग व सूर्यांश शेडगे यांचा समावेश असलेली संघाची मधली फळी अत्यंत महत्त्वाची ठरेल. *(वृत्तसंस्था)*

### आजचा सामना

गुजरात टायटन्स वि. पंजाब किंग्स
**स्थळ** : महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### बाकलीवाल ट्युटोरियल्सच्या करिअर गाईडन्स सेमिनारला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

बाकलीवाल ट्युटोरियल्स यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या BEST २०२६ - Career Guidance Seminar ला काल विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विनोद बाबर यांनी Dream Big, Do Bigger या विषयावर विचार मांडले. कार्यक्रमाच्या निमित्ताने Parents-Teachers Meet चे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये पालकांना बाकलीवाल ट्युटोरियल्सच्या शिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळाली. यावेळी सोलापूर Center Head अभिषेक सिन्हा सरानी सांगितले की, विद्यार्थ्यांना योग्य दिशा, प्रेरणा आणि नियोजन मिळाले तर ते कोणतेही मोठे ध्येय साध्य करू शकतात. या सेमिनारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि पालकांना योग्य करिअर मार्गदर्शन देणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. भविष्यातही अशा मार्गदर्शनपर उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल. दरम्यान, JEE व NEET बॅचेस साठी मोफत डेमो लेक्चर्स ६ एप्रिल पासून सुरू करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना संस्थेची अध्यापन पद्धत प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी उपलब्ध होत आहे. हे डेमो लेक्चर्स दररोज सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत एम्प्लॉयमेंट चौक, जुळे सोलापूर, आणि अशोक चौक या सर्व तीन केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहेत. पंढरपूर केंद्रावर JEEचे डेमो लेक्चर्स सकाळी ९ वाजता असून NEET चे डेमो लेक्चर्स सकाळी १० वाजता असतील तसेच १३ एप्रिल पासून नियमित बॅचेस सर्व शाखामध्ये सुरु होणार आहेत.



### उल्हास- नवभारत साक्षर अभियान कार्यक्रम

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

उल्हास-नवभारत साक्षर कार्यक्रम अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी २०२६ सन्मा. शिक्षणाधिकारी सुलभा वटारे, गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक, विस्ताराधिकारी बापूराव जमादार, देवानंद खोबरे यांच्या नियंत्रणाखाली मुख्याध्यापक पाटील यांच्या निरीक्षणाखाली नवभारत साक्षरता ८ परीक्षार्थी यांनी यशस्वी परीक्षा दिली. कार्यक्रमास केंद्राध्यक्ष सारंग पाटील, पर्यवेक्षक नम्रता आनंद पवार, उत्कर्षा पोपट काळे यांनी परिश्रम घेतले. ही परीक्षा मुख्याध्यापक उदय जनार्दन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व सचिवा शिल्पा ठोकळ व संचालक मंडळ यांनी नवभारत साक्षर परीक्षार्थींना शुभेच्छा दिल्या.



### खिलार गायीकडून जुळ्या वासरांना जन्म

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळ येथे ब्रह्म मुहूर्तावर खिलार जातीच्या गोमातेने दोन जुळ्या खोंडांना जन्म दिले . गोशाळेतील प्रत्येक गाईंना व खोंडांना नावाने ओळखले जाते. आज रोजी सरस्वती नावाच्या गोमातेने दोन जुळ्या खोंडाना जन्म दिले आहे, त्यांचे नाव नरेंद्र व देवेंद्र असे ठेवण्यात आले. कारण गोमाते विषयी प्रेम असणारे गोभक्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ऐतिहासिक कार्य असून त्यांच्या कार्यपद्धतीमुळे आम्ही गोशाळेत गोमतांना व्यवस्थित सांभाळ करीत आहोत असे संस्थेचे अध्यक्ष प्रा. उमा बिराजदार सांगितले. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून गोमातेची सेवा घडो असे प्रार्थना गोमातेच्या चरणी केले.

### हुतात्मा चौक की जत्रा चौक...

सोलापूर शहरात वाढत्या लोकसंख्ये मुळे रस्त्यावर छोटे मोठे स्टॉल, मुलांसाठी खेळण्याचे साहित्य, चटपटे खाद्य खाण्यासाठी चौपाटी, उंटावर, घोड्यावर बसून फेरफटका मारण्यासाठी जागा नागरिकासाठी,व्यापारांसाठी असणे खूपच गरजेचे आहे. लोकांना संध्याकाळच्या वेळेला विरंगुळ्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाचीच आहे. शहरात बऱ्याच जागा रिकाम्या आपल्याला पाहायला मिळतात. पण त्या जागेवर कोणत्याच प्रकारची योजना नसल्यामुळे त्या जागा पडिक म्हणून आहेत. अशा जागेवर शासनाने छोटे-मोठे व्यवसाय तात्पुरत्या स्वरूपात चालू करण्याची गरज आहे. सोलापूर शहराची शान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किल्ला, किल्लाबाग परिसर व सोलापूरचे भूषण चार हुतात्मे हे आहेत. पण या गोष्टीचा विचार होताना दिसत नाही.


याउलट शहरातील महत्त्वाच्या जागेवर संध्याकाळच्या वेळेला थाटात खवय्या गल्ली, जत्रा आपल्याला पाहायला मिळते. खरे पाहता हे रहदारीचे ठिकाण असताना रस्त्यावर वाहने बेशिस्त पणे लावलेली व रस्त्यावर लहान मुले व ज्येष्ठ नागरिक, महिला वाहतुकीचा विचार न करता सर्रास वावरताना दिसतात. बऱ्याचदा वाहतुकीला अडथळे निर्माण झालेली आहेत व अपघात देखील झालेली आहेत या गोष्टीचा व सोलापूरचे चार हुतात्मे यांचा विचार करून सोलापूरचे अभिमान व रस्त्यावरील अतिक्रमण दूर करावे.

ही विनंती.

**- फैय्याज शेख, अध्यक्ष,**
सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच, सोलापूर

## निधन वृत्त...

### जीवनराव पाटील



**सोलापूर, दि. ३० मार्च-**

अनुविश्व सोसायटी, इंदिरानगर विजापूर रोड येथील रहिवाशी जीवनराव पाटील (वय ६९) यांचे दि. ३० मार्च रोजी हृदयविकाराच्या निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. युवा उद्योजक जितेश पाटील यांचे वडील होते. त्यांच्या पार्थीवावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जयंती मिरवणुकीत डीजेवर बंदी; पारंपारिक वाद्यांनाच परवानगी

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बार्शीत शांतता कमिटीची बैठक





**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० मार्च-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. जयंती मिरवणुकीदरम्यान उद्भवणाऱ्या सर्व अडचणी व मार्गावरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यात येईल, अशी ग्वाही तहसीलदार एफ. आर. शेख यांनी दिली.

ही बैठक शहरातील यशवंतराव चव्हाण सभागृहात तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीच्या प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे, महावितरणचे अधिकारी विनोद घोलप, विक्रम विधाते, तसेच डॉ. श्रीकांत शिंदे आदी उपस्थित होते.

कायदा, सुव्यवस्थेबाबत मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी स्पष्ट केले की, जयंती मिरवणुकीदरम्यान डीजेचा वापर करण्यास सक्त मनाई असेल. त्याऐवजी पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच उत्सवाच्या दिवशी शहरात 'ड्राय डे' पाळण्यात येणार असून, अवैध दारु विक्रीवर कडक कारवाई करण्यात येईल. मद्यपान करुन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे यांनी सांगितले की, शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांजवळील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात येणार आहेत. मिरवणुकीच्या दिवशी नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करुन दिले जातील. तसेच, शहरात दोन दिवसांआड नियमित पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.


बैठकीदरम्यान विविध सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे काही सूचना व मागण्या मांडल्या. माजी नगरसेवक आण्णासाहेब लोंढे यांनी बार्शी हे सर्वधर्मीय सलोख्याने सण-उत्सव साजरे करणारे शहर असल्याचे सांगत प्रशासनाने मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाला पूर्ण सहकार्य करावे, अशी मागणी केली. अजित कांबळे यांनी मिरवणूक मार्गावरील वीजपुरवठा खंडित होऊ नये तसेच जयंतीच्या आदल्या दिवशी शहरात पाणी सोडण्याची मागणी केली. नगरसेवक संदेश काकडे यांनी मिरवणूक मार्गावरील अडथळे व अडचणी वेळेवर दूर करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

अॅड. विवेक गजशिव यांनी शहरातील बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने दुरुस्त करण्याची मागणी केली. दीपक काकडे यांनी मिरवणुकी दरम्यान कोणीही गैरवर्तन केल्यास त्याला तत्काळ पोलिसांच्या ताब्यात देण्याचे आवाहन केले. या बैठकीत सोनू भोसले, धीरज बोकेफोडे, शौकत काझी, रुपेश बंगाळे उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर स्मारक जनजागृतीसाठी मंगळवेढ्यात ५ एप्रिलपासून प्रबोधन सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा ३० मार्च-**

सामाजिक समतेचे आद्य प्रवर्तक जगदज्योती महात्मा बसवेश्वरांचे मंगळवेढ्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभा करण्यासंदर्भात नागरिकांची जनजागृती व्हावी यासाठी ५ ते १२ एप्रिलपर्यंत प्रबोधन सप्ताह आयोजित केला आहे.



मंगळवेढा येथील कुंभार गल्लीतील रामलिंग मंदिरात झालेल्या समस्त मंगळवेढेकरांच्या विचार विनिमय बैठकीत साप्ताहाचे नियोजन करण्यात आले आहे. १२ व्या शतकात मंगळवेढा ही बसवेश्वरांची कर्मभूमी राहिलेली असुन महात्मा बसवेश्वरांच्या समतावादी, क्रांतिकारी विचारांचे आणि सामाजिक परिवर्तनाचे मंगळवेढा मूळ केंद्र होते अशा संत परंपरेचा वारसा सांगणाऱ्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमीत महात्मा बसवेश्वरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभा रहावे यासाठी विविध प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. स्मारक मंगळवेढ्यात होणे का आवश्यक आहे,त्यातून शहराचा कसा विकास होणार आहे व पर्यटन विकासातून कोणकोणत्या संधी निर्माण

**प्रबोधन सप्ताह याप्रमाणे**

| | |
|---|---|
| ५ एप्रिल | जन्मभुमी बागेवाडी ते मंगळवेढा बसवज्योत सायकल यात्रेतून शुभारंभ |
| ६ एप्रिल | महात्मा बसवेश्वर मूर्ती पूजन. |
| ७ एप्रिल | प्रबोधन मशाल रॅली |
| ८ एप्रिल | सह्यांची मोहीम, |
| ९ एप्रिल | महिलांची प्रबोधन पदयात्रा. |
| १० एप्रिल | निबंध स्पर्धा, |
| ११ एप्रिल | मोटरसायकल रॅली |
| १२ एप्रिल | महात्मा बसवेश्वर स्मारक संकल्प मेळावा, स्मारक जनजागृतीचे डिजिटल बोर्ड, मोटारसायकल स्टिकर, पत्रके वाटणे. |

होणार आहेत याची माहिती शहर व तालुक्यातील सामान्यातील सामान्य लोकांना पटवून देण्यासाठी महात्मा बसवेश्वरांच्या स्मारकासाठी प्रबोधनात्मक सप्ताहाचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रबोधन सप्ताहामध्ये जास्तीत जास्त मंगळवेढेकरांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे

### हनुमान जयंतीनिमित्त कैवल्य महाराज चातुर्मासे यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३० मार्च-**



येथील श्रीराम व हनुमान मंदिरा हनुमान जयंतीनिमित्त पंढरपूर येथील हभप कैवल्य महाराज चातुर्मासे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

येथील श्री हनुमानाची स्वयंभू मूर्ती असून शहरासह परिसरातील भाविकांची या मारुतीवर श्रद्धा आहे. हनुमान जयंतीनिमित्त या मंदिरात मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा करण्यात येतो. नोकरी व कामानिमित्त परगावी गेलेले भाविक हनुमान जयंती दिवशी नवस पूर्ण करण्यासाठी येतात.



## सोलापुरात भटके-विमुक्त समाजाचे ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती यांच्यावतीने भटके-विमुक्त समाजाच्या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. जनगणना २०२७ मध्ये भटके विमुक्त समाजासाठी स्वतंत्र रकाना समाविष्ट करावा, जेणेकरून पाल, तांडा व उघड्यावर राहणाऱ्या समाजाची योग्य नोंद होईल.

'भटके, विमुक्त आणि निम-भटके जमातींसाठी राष्ट्रीय आयोग विधेयक, २०२६' ला तात्काळ मंजुरी देऊन समाजाला घटनात्मक मान्यता द्यावी. खासदार प्रणिती शिंदे यांना निवेदन देण्यात आले. त्यांनी या प्रश्नावर संसदेत आवाज उठवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. समितीच्या वतीने सांगण्यात आले की, जर या मागण्यांवर तात्काळ कार्यवाही झाली नाही, तर समाजाला आणखी तीव्र आंदोलन उभारावे लागेल. असे संयोजन समिती सदस्य यशवंत फडतरे यांनी इशारा दिला आहे. भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती, सोलापूर जिल्हा मल्लेश सुर्यवंशी, वैशाली बनसोडे, किर्तीपाल शिवशरण, विश्वास नागटिळक मुत्याप्पा मारते, संतोष भारते, शोभा गायकवाड, मार्था असादे, रोहीणी गायकवाड अंजली सितारे, क्रांती आठवले,चंदा आठवले, सुषमा फडतरे, दिपाली राठोड, सुनिता मरिआईवाले, रंक्का मरिआईवाले, लक्ष्मी मरिवाई, सुभाष मरिआईवाले, अंबादास जाधव, राज लांडगे, गैराम्मा भारते, चन्नम्मा भारते उपस्थित होते. केवल फडतरे यांनी आभार मानले.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह चौघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० मार्च-**

हुंडा व मानपानाच्या कारणावरुन विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचा गंभीर आरोप करत एका महिलेने पतीसह सासरच्या चौघांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

धस पिंपळगाव रोड, बार्शी येथे सध्या राहत असलेल्या सौ. प्रार्थना शुभम मोरे (वय २६) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा विवाह दि. १ मे २०२४ रोजी इसबावी, ता. पंढरपूर येथील शुभम सुरेश मोरे यांच्याशी धार्मिक विधीनुसार पार पडला होता. विवाहावेळी माहेरच्या कुटुंबाने सासरच्या मंडळींना मानपान देऊन संसारोपयोगी वस्तू दिल्या असल्याचे त्यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, लग्नानंतर सुमारे एक महिन्यानंतर सासू सुषमा मोरे यांनी लग्नातील मानपान व रुखवत कमी असल्याचा आरोप करत वारंवार शिवीगाळ व अपमान करण्यास सुरुवात केली. त्यानंतर पती शुभम मोरे यांनीही त्याच कारणावरुन पत्नीला दोष देत अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप आहे. तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, दि. ५ जानेवारी २०२६ रोजी नणंद श्रद्धा चौगुले घरी आल्यानंतर कुटुंबीयांनी मिळून फिर्यादीकडे १० लाख रुपयांची मागणी केली व पैसे न आणल्यास घरात राहू नकोस असे सांगत तिला उपाशी ठेवून मानसिक त्रास दिला. तसेच डिसेंबर २०२५ मध्ये पतीने तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेतल्याचा आरोप करण्यात आला असून, ऑक्टोबर पासून पतीने तिच्याशी संवाद तोडून वैवाहिक संबंध ठेवले नाहीत, असेही फिर्यादीत नमूद आहे. वारंवार होणाऱ्या छळाला कंटाळून फिर्यादीने आपल्या माहेरच्या नातेवाईकांना माहिती दिली. त्यांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता, सासरकडील मंडळींनी 'आम्हाला तिला नांदवायचे नाही, तिला घेऊन जा', असे सांगून तिला माहेरी पाठवून दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दि. ५ जून २०२४ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पती, सासू-सासरे व नणंद यांनी वेळोवेळी शिवीगाळ, दमदाटी व उपाशी ठेवून शारीरिक-मानसिक छळ केल्याचा आरोप करत प्रार्थना मोरे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

### पतीसह तिघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० मार्च-**





सासरच्या लोकांकडून होत असलेल्या सततच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून शेंद्री (ता. बार्शी) येथील एका २९ वर्षीय विवाहितेने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. याप्रकरणी मृत महिलेच्या आईच्या फिर्यादीवरुन पती, दीर व सासूविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहिनी प्रमोद गोडगे (वय २९) हिचे लग्न ६ फेब्रुवारी २०१७ रोजी नालगाव (ता. परांडा) येथील प्रमोद नारायण गोडगे याच्याशी हिंदू रीतीरिवाजानुसार करण्यात आले होते. लग्नानंतर ती पती, दीर नामदेव गोडगे व सासू रसिका गोडगे यांच्यासह बार्शी तालुक्यातील शेंद्री या गावी राहत होती. मृत महिलेच्या आई छकुबाई दत्तात्रय शिंदे (रा. लोणी, ता. परांडा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नानंतर सुरुवातीचे दोन महिने सर्व काही व्यवस्थित होते. त्यानंतर मात्र मोहिनीला स्वयंपाक येत नाही, काम करत नाही, जास्त खाते अशा कारणांवरुन पती, दीर व सासू तिचा छळ करु लागले. तिला वारंवार शिवीगाळ व मारहाण करण्यात येत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. मोहिनी गर्भवती असतानादेखील तिला पुरेसे अन्न न देणे, जड कामे करण्यास भाग पाडणे अशा प्रकारे त्रास दिला जात असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. २०२३ मध्ये पाच महिन्यांची गर्भवती असताना जबरदस्तीने शेतातील जड ओझे उचलायला लावल्याने तिचा गर्भपात झाल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

मोहिनीला आधी एक मुलगी व नंतर १८ सप्टेंबर २०२४ रोजी मुलगा झाला. मात्र त्यानंतरही तिच्याशी वागणूक सुधारली नाही. तिला उपाशी ठेवणे, फोनवर माहेरी बोलू न देणे, वारंवार अपमानास्पद शब्दांत हिणवणे असे प्रकार सुरुच असल्याचा आरोप आहे. दि. २८ मार्च २०२६ रोजी पहाटे मोहिनीने राहत्या घरी विषारी औषध प्राशन केल्याची माहिती तिच्या नातेवाईकांना देण्यात आली. तिला तत्काळ बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरु असतानाच २९ मार्च रोजी रात्री तिचा मृत्यू झाला. मृत महिलेच्या आईने दिलेल्या तक्रारीत, पती प्रमोद नारायण गोडगे, दीर नामदेव नारायण गोडगे आणि सासू रसिका नारायण गोडगे यांनी सातत्याने केलेल्या शारीरिक व मानसिक छळा मुळेच मोहिनीने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मृत्यूपूर्वी पतीने सासू-सुनेत भांडण झाल्याचे व त्याने मोहिनीला चापट मारल्याचे नातेवाईकांना सांगितल्याचेही तक्रारीत नमूद आहे.या तक्रारीवरुन संबंधित तिघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे, छळ व कौटुंबिक अत्याचारासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

# जेऊरच्या तात्यासाहेब कळसाईतांनी बनवलेल्या 'चुलीं'ची महाराष्ट्रासह परराज्यातही मोठी क्रेझ

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.३० मार्च-**



इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर जेऊर (ता.करमाळा) येथील शेती अवजारे बनवणाऱ्या येथील श्रीनाथ वेल्डिंग वेअर्सचे तात्यासाहेब भारत कळसाईत यांनी बनवलेल्या लोखंडी जुगाड चुलींना मोठी मागणी येत असून त्यांनी बनवलेल्या चुली महाराष्ट्रातच नाही तर हरियाणा राज्यातही विकल्या जात आहेत.

सध्या सुरू असलेला इराण अमेरिका इस्त्राईल युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात सर्वत्र गॅस टंचाई निर्माण झाली आहे वेळेवर गॅस उपलब्ध होत नसल्याने लोक हैराण झाले असून पर्याय म्हणून सर्वत्र ईलेक्ट्रिक चुलीची मागणी वाढली अशा प्रकारच्या चुलीही बाजारात उपलब्ध होत नसल्याने अनेकांनी आपल्या पारंपारिक मातीच्या चुलीवर स्वयंपाक करणे सुरू केले आहे. अशावेळी जेऊर येथील तात्यासाहेब कळसाईत यांनी चार इंची लोखंडी चौकोनी पाईपच्या सहाय्याने तयार केलेल्या लोखंडी जुगाडचुलीवर कमी इंधनांमध्ये स्वयंपाक होत असल्याने इंजन इंधन बचतीसाठी मोठ्या प्रमाणावर या चुलींची मागणी वाढू लागली आहे. सध्या गहू हार्वेस्टिंग मशीनवर काम करणारे हरियाणा येथील लोक जेऊर येथे वेल्डिंग कामासाठी त्यांच्या वर्कशॉप मध्ये आल्यानंतर त्यांनीही चूल पाहिली त्यांना खूप आवडली गावाकडील मंडळींना मोबाईलद्वारे या चुलीची माहिती दिली. सध्या हरियाणामध्ये ही मोठ्या प्रमाणावर इंधन टंचाई असल्याने त्याही मंडळींना

> कळसाईत यांनी बनवलेल्या लोखंडी चुलीचे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे या चुलीमुळे इंधनाची बचत होते. थोड्याशा लाकडाच्या वापर करून याच्यावर स्वयंपाक करता येतो. याच्या वैशिष्ट्यपूर्णरचनेमुळे धुर फारसा होत नाही एकदा लाकडाने पेट घेतल्यानंतर ते कायम पेटत राहण्यासाठी खालील बाजूने हवा येत राहते.

ही चूल आवडल्याने त्यांनी कळसाईत यांच्याकडून गावाकडे घेऊन जाण्यासाठी आठ चुली खरेदी केल्या. व आणखी चुलीची ऑर्डर नोंदवली आहे.

या चुलीसंबंधी त्यांनी सोशल मीडियावर केलेली पोस्ट पाहून अनेक लोकांनी या चुलीची त्यांच्याकडे मागणी केली असून सध्या वर्कशॉप मधील इतर कामे थांबून त्यांनी अशा प्रकारच्या चुली बनवण्यास प्राधान्य दिले आहे. तात्यासाहेब भारत कळसाईत (लोखंडी चुलीचे निर्माते जेऊर) जेऊर येथे माझा शेती उपयोगी लोखंडी अवजारे बनवण्याचा व्यवसाय आहे गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर मला स्वतःला घरगुती वापरण्यासाठी मी लोखंडी एक चूल तयार केली होती तिला मजुरीसह साधारण दीड हजार रुपये खर्च आला तिची टेस्ट घेतल्यानंतर या चुलीवर चांगल्या प्रकारे स्वयंपाक करता येत असून इंधनाची मोठ्या प्रमाणावर बचत होत असल्याचे लक्षात आले व हाताळण्यासाठी ही सोयीस्कर असल्याने यासंबंधी माहिती मिळताच अनेकांनी अशा चुली बनवण्यास सांगितले आत्तापर्यंत अनेक जणांनी त्या खरेदी केल्या आहेत.

सध्या तयार केलेल्या चुलीला मागणी असली तरी त्यामध्येही आणखी काही किरकोळ बदल करून अत्यंत सुलभ अशी चूल बनवण्याचा माझा प्रयत्न सुरू आहे.

# नगरपरिषदेच्या उत्पन्न वाढीच्या विषयावरुन सत्ताधारी, विरोधी गटात वादावादी

- पंढरपूर नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा
- कॉरिडोर स्थगितीवरुन झाली खडाजंगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या उत्पन्न वाढीच्या विषयावरुन सत्ताधारी ।आणि विरोधी गटात जोरदार वादावादी झाली. विठुरायाच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात; यासाठी शासनाने पंढरपुरात कॉरिडोर करण्याचा निर्णय घेतला आहे.

कॉरिडोरच्या विषयावरून नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सत्ताधारी व विरोधी नगरसेवकांमध्ये खडाजंगी उडाली. पंढरपूर नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा सोमवार, दि.३० मार्च २०२६ रोजी नगराध्यक्ष डॉ.प्रणिता भालके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. 'कॉरिडॉर'ला मंदिर परिसरातील नागरिकांकडून विरोध होत आहे. त्यामुळे हा विषय सर्वसाधारण सभेत आणण्यात आला. आजच्या सभेसमोरील विषयपत्रिकेवर एकूण १२ विषय होते. कॉरिडॉरच्या विषयावरील चर्चेप्रसंगी सत्ताधारी आणि



विरोधी पक्षाच्या नगरसेवकांमध्ये चांगलीच खडाजंगी झाली. त्यामुळे हा विषय स्थगित ठेवण्यात आला. या विषयाच्या चर्चेत सत्ताधारी गटाकडून वासुदेव उर्फ भागवत बडवे, सुनील वाळुजकर, सौरभ थिटे पाटील, लक्ष्मण पापरकर तर विरोधी गटाचे नगरसेवक राहुल शिंदे तसेच अपक्ष नगरसेवक ओंकार जोशी आदींनी सहभाग नोंदविला.

**ठेकेदाराची ४७ कोटींची देणी :** पंढरपूर नगर परिषदेची चेतपत्रिका काढावी अशी मागणी नगरसेवकांनी केली होती. त्यानुसार ही श्वेतपत्रिका काढण्यात आली असून यामध्ये ४१ कोटी रुपये ठेकेदारांचे तसेच ६ कोटी रुपये पाणी पुरवठ्यासाठी असे ४७ कोटी रुपयांची देणी असल्याचे दिसून आले आहे.

**एकदा काय दाखवायचे ते दाखवा :** नगरपरिषदेच्या उत्पन्न वाढीसाठी झोपडपट्टीधारकांकडून खणपट्टी वसूल करावी. पाणीपट्टी वसूल करावी, अशी मागणी नगरसेविका उज्ज्वला भालेराव यांनी केली. ज्येष्ठ नगरसेवक नागेश भोसले यांनी त्यास हस्तक्षेप केला. तेव्हा नगरसेवक लक्ष्मण शिरसाट हे उठले नगरसेविकांना बोलू द्या-विषय टाळू नका, असे सांगताच नगरसेवक लक्ष्मण शिरसाट व इतर नगरसेवकांमध्ये खडाजंगी उडाली. यामुळे सभागृहात असलेल्या लक्ष्मण शिरसाट यांच्या सुनबाई प्रणिता शिरसट या आपल्या सासऱ्यांच्या मदतीला धावून गेल्या. यावेळी त्यांनी सभागृहातील विरोधी नगरसेवकांना उद्देशुन एकदा काय दाखवायचे ते दाखवा, आम्ही पण पाहायला तयार आहोत  असे खडे बोल सुनावले.

**झोपडपट्टीधारकांच्या नावावर सातबारा मिळावा :** शहरातील झोपडपट्यांमधून अनेक नागरिक तीन, तीन पिढ्यापासून वास्तव्य करीत आहेत. मात्र या झोपडपट्यांच्या जागांवर नगरपालिकेकडून विविध प्रकारची आरक्षणे टाकण्यात आलेली आहेत. त्यामुळे या झोपडपट्टीधारकांना हक्काची घरे मिळत नाहीत. मुख्यमंत्र्यांनी २५ तारखेला एक परित्रक काढुन ५०० स्के.फुटाच्या जागांवरील अनधिकृत बांधकाम असलेली घरे नियमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याच धर्तीवर येथील झोपडपट्टी मधील जागांवरील पालिकेची आरक्षणे काढून जी मंडळी पिढ्यानपिढ्या तेथे वास्तव्य करीत आहेत त्यांच्या नावावर त्या जागांचा सातबारा उतारा मिळावा, अशी महत्वपुर्ण सूचना नगरसेवक राहुल शिंदे यांनी सांगितले.

# 'हर हर महादेव'चा जयघोष; शिवभक्तांनी केला मुंगी घाट सर

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि.३० मार्च-**

हरहर महादेव अशा जयघोषात विविध वाद्यांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीत मानवी साखळीद्वारा शिखर शिंगणापूरच्या अवघड मुंगी घाटातून कावडी चढवण्याच्या पारंपारिक सोहळा धार्मिक वातावरणात पार पडला. भक्ती व शक्तीचा अगाध महिमा पाहण्यासाठी लाखो भक्तांनी डोंगर माथ्यावर गर्दी केली होती.

सासवड येथील शिवभक्त तेली भुतोजी महाराज यांच्या मानाच्या कावड सोमवारी दुपारी ३.३० दरम्यान सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. माळशिरस पंचायत समिती सभापती दत्ता मगर, उपसभापती मनिषा पाटील, तहसीलदार सुरेश सेजुळ, नायब तहसीलदार अमोल कदम, गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, जि.प.सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील, सपोनि विशाल वायकर, सरपंच रेखा माने आर्दीनी कावडयाचे स्वागत केले.

कोथळे गावच्या ओढ्यात सोलापूर व सातारा जिल्ह्याच्या सरहद्दीवर कावडी



भेटीच्या पारंपारिक सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. कोल्हापूर संस्थाच्या कावडीने संत तेली भुतोजी महाराज कावडीला तीन प्रदक्षिणा घालून उराउरी भेट घेतली. अनेक लहान-मोठ्या कावडींना त्यांचा मान देऊन व भेट घेवून संत तेली भुतोजी महाराज यांची कावड मुंगी घाटाच्या पायथ्याशी आली. दरम्यान, डोंगर रांगांमध्ये पावसाच्या सरी कोसळत होत्या. विजांच्या कडकडाटही सुरु झाला होता. तरीही भक्तांनी मानवी साखळी तयार करून कावडीने अवघड मुंगी घाटावर चढाई सुरु केली. घाटातील तिन्ही अवघड टप्पे लीलया पार करण्यात आली.

## पावसाच्या सरी, विजांचा कडकडाट; भक्तांनी केली होती मानवी साखळी

अकलूज उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष वाळके, नातेपुते पोलिस स्टेशनचे पोसई विशाल वायकर यांच्या नेतृत्वाखाली ६ पोलिस अधिकारी, ८२ पोलिस अमंलदार, एक राखीव पोलिस दल असा फौजफाटा तैनात करण्यात केला होता.

प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवे व मोरोची यांनी कोथळे गावात व मुंगी घाटाच्या पायथ्याशी ८ रुग्णवाहिकेसह आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिली होती. डॉ. अभय मेहता, शिवानी लाड, डॉ.सुचिता सावंत, दत्तात्रय लाड आर्दीनी रुग्णसेवा बजाविली. माळशिरस पंचायत समिती ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने मुंगी घाट व भवानी घाटात पाण्याचे टँकर ठेवण्यात आले होते.

# भीम प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांचा होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**




येथील भीम प्रतिष्ठानतर्फे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांच्यासह विविध क्षेत्रातील आठजणांची निवड करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक बाबा बाबरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पुरस्काराचे वितरण सोहळा येत्या रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता सोलापुरातील शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृह येथे मसाप पुण्याच्या मुख्य कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांच्या हस्ते व समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर ,जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख नगरसेवक अमोल शिंदे, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दिगंबर भगरे, रावजी सखाराम हायस्कूलचे प्राचार्य भारत केत, उद्योजक पदमचंद राका, राजेंद्र शहा (कासवा), उदय वैद्य, विठ्ठल शिवशरण, डॉ. शिवाजी पवार, धर्मेंद्र माने आदींची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे बाबरे यांनी सांगितले. पुरस्काराचे हे २६ वे वर्ष आहे.

या पत्रकार परिषदेस संयोजक अमित बाबरे , प्रतिष्ठानचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, उपाध्यक्ष अ‍ॅड. विशाल मस्के, सचिव अकबर शेख, सिद्धांत बाबरे, अ‍ॅड. स्वाती मस्के उपस्थित होते.

यांचा होणार सन्मान

यावेळी भीमराव मोरे (सामाजिक), सीमा भंडारी (शैक्षणिक), बलभीम पारखे (कामगार), किरण बनसोडे (पत्रकारिता), रुक्मिणी लांबतुरे (गौरव पुरस्कार), प्रकाश शेळके( विशेष गौरव पुरस्कार), रेणुका हिरेमठ (सन्मानपत्र), प्राजक्ता सोलंकर (सन्मानपत्र) तर आदर्श पालक पुरस्कारासाठी कृष्णा व रत्नमाला माने यांची निवड करण्यात आली आहे.



# भगवान महावीर यांचा जन्म कल्याण महोत्सव पाळणा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

विजापूर रोड येथील १००८ श्री बाहुबली मंदिर येथे भगवान महावीर यांचा जन्म कल्याण महोत्सव पाळणा कार्यक्रम सोमवारी (दि. ३०) उत्साहात पार पडला. यावेळी भगवान महावीर यांच्या त्रिशला मातेचा मान डॉ. प्रियांका सुरज व्हसाळे यांना मिळाला. यावेळी पंकजा पंडित, माया पाटील, छाया व्हसाळे, मनिषा जमगे, सुरेखा मगदूम, मनिषा संगवे, विजया बोंदार्डे आदी  जैन समाजातील महिला उपस्थित होते.

# 'मी बोलत असतानाच मध्ये का येतो? मला थांबवणारा तू कोण?'

- महापालिका सभेमध्ये 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन'मुळे वादाची ठिणगी
- अमोल शिंदे व प्रशांत पल्ली यांच्यात हमरीतुमरी, एकेरी भाषेमुळे तणाव शिगेला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

महापालिकेच्या सोमवारी झालेल्या अंदाजपत्रकीय सभेत वातावरण अचानक तापले. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे गटनेते अमोल शिंदे आणि भाजपाचे नगरसेवक प्रशांत पल्ली यांच्यात जोरदार वादावादी झाली. सभागृहात काही काळ अक्षरशः तणाव आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. हमरीतुमरी, एकेरी भाषेमुळे तणाव शिगेला पोहोचला होता.

अंदाजपत्रकावरील सूचना व उपसूचनांवर सर्वपक्षीय सदस्यांचे भाष्य सुरु असताना अमोल शिंदे यांनी परिवहन उपक्रमातील 'चेसी क्रॅक' बसेस प्रकरणावर भाष्य करत महापालिकेला बसलेल्या



तब्बल ५७ कोटींच्या दंडाचा मुद्दा उपस्थित केला. याचवेळी प्रशांत पल्ली यांनी 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन' घेत हस्तक्षेप केला.

आपले भाषण मध्येच तोडले गेल्याने संतप्त झालेल्या अमोल शिंदे यांनी आक्रमक पवित्रा घेत प्रशांत पल्ली यांना एकेरी भाषा वापरत शाब्दिक हल्लाबोल केला. 'मी बोलत असताना मध्येच का येतोस? मला थांबवणारा तू कोण?'' अशा कडक शब्दांत शिंदे यांनी पल्ली यांना खडे बोल सुनावले. पल्ली यांनी स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला, मात्र शिंदे अधिकच आक्रमक झाले. वाद चिघळत असतानाच सभागृह नेते नरेंद्र काळे, रोहिणी तळवळकर, अनंत जाधव यांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांनी उघडपणे अमोल शिंदे यांची बाजू घेतल्याने राजकीय रंग अधिकच गडद झाला.अखेर महापौर विनायक कोंड्याल यांनी हस्तक्षेप करत दोन्ही बाजूंना शांत राहण्याचे आदेश दिले आणि काही वेळातच तणाव निवळला.

दरम्यान, शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे पुन्हा उभे राहत ५७ कोटींचा दंड महापालिकेला परवडणारा आहे का? असा थेट सवाल उपस्थित केला. यावर आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार झालेल्या कार्यवाहीचे स्पष्टीकरण दिले.

मात्र शिंदे यांनी समाधान न मानता या गंभीर विषयावर महापौरांनी स्वतंत्र विशेष बैठक घ्यावी, अशी ठाम मागणी लावून धरली. महापौर कोंड्याल यांनी ही मागणी मान्य करत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

# धाराशिव जिल्ह्याच्या आर्थिक कायापालटासाठी चालना, भाजपाच्या माध्यमातून १०८ नवे उद्योजक घडणार

- आमदार राणाजगजितसिंह पाटील
- एक एप्रिलपासून नाव नोंदणीला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

धाराशिव जिल्ह्यातील होतकरू तरुण-तरुणींना हक्काचा रोजगार मिळावा आणि स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी, या उद्देशाने भारतीय जनता पक्षाच्या वतीने आगामी २०२६-२७ आर्थिक वर्षात जिल्ह्यात १०८ नवीन उद्योजक तयार करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येणार असून, यामुळे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे. केवळ उद्योग सुरू करण्याचा सल्ला न देता, तो प्रत्यक्षात यशस्वी करण्यासाठी भाजप पूर्ण ताकदीने तरुणांच्या पाठीशी उभी राहणार आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रकल्प अहवाल अर्थात उद्योगासाठी आवश्यक असणारा तांत्रिक प्रकल्प अहवाल तयार करून दिला जाणार आहे. बँकांच्या माध्यमातून अगदी सुलभपणे कर्ज पुरवठा आणि अनुदान उपलब्ध करण्यासाठी विशेष सहकार्य करण्यात येणार आहे.



केंद्र व राज्य सरकारच्या विविध सवलती व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्यही केले जाणार आहे. उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठीही यंत्रणा मदत करणार आहे.

या मोहिमेत पारदर्शकता आणि गुणवत्ता टिकवण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक सनियंत्रण समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती इच्छुकांच्या अर्जांची छाननी करेल, त्यांच्या उद्योगाची व्यवहार्यता तपासेल आणि पात्र उमेदवारांची निवड केली जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. या उपक्रमांतर्गत प्रामुख्याने पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही क्षेत्रांतील उद्योगांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामध्ये शेळीपालन, कडबाकुट्टी कारखाना, कांदा पावडर, चिंच पावडर निर्मिती आदी कृषी आधारित उद्योग, प्लास्टिक रिसायकलिंग, बायोमास हरित इंधन, वापरलेल्या फुलांपासून अगरबत्ती आदी पर्यावरण पूरक उद्योग, इ-वेस्ट, सोलर पॅनल स्क्रॅप आणि लिथियम बॅटरी स्क्रॅप रिसायकलिंग आदी भविष्यातील तंत्रज्ञान आधारित उद्योगासह नारळ करवंटीपासून कोकोपीट आणि पारंपरिक लेदर निर्मिती उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. इच्छुकांनी ८८८८६२७७७७ या क्रमांकावर वॉट्सप किंवा मेसेज द्वारे १ एप्रिल ते १५ एप्रिल या कालावधीत नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

**नोकरीमागे न लागता 'नोकरी देणारे' बनावे**

या मोहिमेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या तरुणांसाठी १ एप्रिल २०२६ पासून नोंदणी प्रक्रिया सुरू होत आहे. तसेच, महाराष्ट्र दिनी १ मे रोजी 'प्रतिष्ठान भवन, धाराशिव' येथे एका परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत निवडक उद्योजकांना पुढील दिशा ठरवून दिली जाईल. जिल्ह्यातील तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता 'नोकरी देणारे' बनावे, हा यामागील उद्देश आहे. १०८ उद्योजकांच्या माध्यमातून हजारो कुटुंबांना हक्काचा रोजगार तर मिळेलच मात्र त्यातून अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीही होईल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## मंगळवेढ्याजवळ अपघात; एकाचा मृत्यू, एक जखमी

**मंगळवेढा :** पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी मोटर सायकलवर निघालेल्या भावी पती-पत्नीचा कारने पाठीमागून धडक दिल्याने त्यामधील भावी पत्नी अंजली विजय वाघमारे हिचा मृत्यू झाला तर भावी पती प्रशांत मगरुमखाणे (रा.पाथरी ता.उत्तर सोलापूर) हे जखमी झाले असून निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात केल्याप्रकरणी कारचालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजाभवानी देवीच्या चरणी सव्वा दोन किलो चांदीची कळशी अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० मार्च -**

श्री तुळजाभवानी मंदिर येथे आज सकाळी पाथरी (जि. परभणी) येथील देवीचे निस्सीम भक्त वेदांत संजय कुलकर्णी यांनी सुमारे सव्वा दोन किलो वजनाची चांदीची कळशी अर्पण केली.



वेदांत कुलकर्णी व त्यांच्या कुटुंबीयांनी आज सकाळी भक्तिभावाने श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी ही चांदीची कळशी देवीच्या चरणी अर्पण करत आपली श्रद्धा व्यक्त केली.

यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने वेदांत कुलकर्णी व त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी विकास वाणी, महेश गंजे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.



# ‘सीएसआर’ निधीपासून वंचित धाराशिव; विकासासाठी समन्वयाची गरज

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

मराठवाडा दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखला जात असताना धाराशिव जिल्ह्याची परिस्थिती अधिकच गंभीर बनत चालली आहे. आकांक्षित जिल्ह्यांच्या यादीत स्थान असूनही अपेक्षित विकास न झाल्याने उद्योगधंद्यांची कमतरता, मूलभूत सुविधांचा अभाव आणि वाढती बेरोजगारी यामुळे जिल्हा विकासाच्या स्पर्धेत मागे पडत असल्याचे चित्र आहे.





जिल्ह्यात सुमारे लाखभर सुशिक्षित तरुण बेरोजगार असून रोजगाराच्या संधींच्या अभावामुळे स्थलांतर वाढत आहे. अशा वेळी ‘कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी’ (सीएसआर) निधी हा विकासासाठी महत्त्वाचा आधार ठरू शकतो; मात्र धाराशिवला या निधीचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

राज्यात दरवर्षी सुमारे ६ हजार कोटी रुपयांचा सीएसआर निधी उपलब्ध होतो. मात्र यातील बहुतांश निधी मुंबई, ठाणे, पुणे आणि रायगडसारख्या विकसित जिल्ह्यांकडे वळतो. उर्वरित महाराष्ट्रासाठी सुमारे ९०० कोटी रुपये उरतात, त्यातही धाराशिवसारख्या मागास जिल्ह्यांना अत्यल्प वाटा मिळतो.

मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तसेच ‘मित्रा’चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनीही सीएसआर निधी वितरणातील असमतोलाबाबत निरीक्षण नोंदवले आहे. शाश्वत ग्रामीण उद्योजकता चर्चासत्रात त्यांनी सांगितले की, ‘सीएसआर’ अंतर्गत काम करणाऱ्या संस्था तळागाळापर्यंत मदत पोहोचवण्यास इच्छुक असतात; मात्र योग्य मार्गदर्शन आणि प्रभावी समन्वयाच्या अभावामुळे निधीचे संतुलित वितरण होत नाही.

धाराशिवला ‘सीएसआर’ निधी मिळण्यात प्रशासकीय निष्क्रियता आणि राजकीय अनास्था हेही अडथळे ठरत असल्याची टीका होत आहे. पाणी, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर कामाची गरज असतानाही प्रभावी प्रकल्प सादर करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. उद्योगसमूहांशी सातत्यपूर्ण संपर्क आणि पाठपुरावा नसल्याने निधी आकर्षित करण्यात अडचणी येत आहेत.

### इच्छाशक्ती असेल तर विकास शक्य!...

ठोस नियोजन, प्रभावी समन्वय आणि सक्रिय पाठपुरावा यांचा संगम साधला, तर ‘सीएसआर’ निधीच्या माध्यमातून पाणीटंचाई, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांत मोठा बदल घडवता येऊ शकतो. मात्र यासाठी प्रशासनाची कार्यक्षमता आणि राजकीय इच्छाशक्ती अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट होत आहे.

### विकासासाठी ठोस उपायांची गरज...

धाराशिवच्या विकासासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र ‘सीएसआर समन्वय कक्ष’ स्थापन करणे, गरजाधारित ‘प्रोजेक्ट बँक’ तयार करणे, उद्योगसमूहांशी नियमित संवाद व बैठका घेणे, स्वयंसेवी संस्थांना प्रशिक्षण देणे आणि पारदर्शक अंमलबजावणी यंत्रणा उभारणे अत्यावश्यक आहे.

### मार्गदर्शन व समन्वयाचा अभाव...

जिल्ह्याच्या गरजांचे व्यवस्थित दस्तावेजीकरण, प्रकल्पांची सुसंगत मांडणी आणि कंपन्यांशी प्रभावी संवाद यांचा अभाव जाणवतो. प्रशासन, उद्योग आणि स्वयंसेवी संस्था यांच्यात समन्वय नसल्याने अनेक संधी हुकत आहेत. स्थानिक संस्थांना उडठ प्रक्रियेचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन न मिळाल्याने चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत.

## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापूर नगरपरिषद शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**तुळजापूर, दि.३० मार्च -**

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.२ येथे इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. ‘गुढीपाडवा प्रवेश वाढवा’ अभियानांतर्गत प्रवेश प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. मुख्याध्यापक गणेश रोचकरी, केरण लोहारे व सुज्ञानी गिराम यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, हार व पेढे देऊन स्वागत केले. यावेळी पालकांचीही उपस्थिती होती. शाळेत विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. कार्यक्रमास महेंद्र कावरे, बाळासाहेब जेटीथोर, महेंद्र पाटील, सुरजमल शेटे व विद्यादेवी स्वामी उपस्थित होते.



### विवेकानंद जाधव यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न

**उमरगा, दि.३० मार्च -**

उमरगा येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे सहशिक्षक विवेकानंद गोविंदराव जाधव यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले. ३३ वर्षे ९ महिने १४ दिवसांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे होते. प्रमुख उपस्थितीत डॉ. चंद्रकांत महाजन, डॉ. कपिल महाजन, रजनीकाकू महाजन, डॉ. शुभांगी महाजन, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, सविता लोहार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर देशपांडे यांनी, तर आभार जैतूनबी मेंडके यांनी मानले.



### रामपूर जि.प. शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**उमरगा, दि.३० मार्च -**

उमरगा तालुक्यातील रामपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन आ. प्रवीण स्वामी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. अजिंक्य पाटील, हणमंत दासमे, मिनाक्षी कुंभार, अनंत भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. विविध परीक्षांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विजय भोसले यांना ‘शिवसेवक’ पुरस्कार, तर धैर्यराज भोसले व विकास स्वामी यांना ‘ग्रामशिक्षक रत्न’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शेतकरी नृत्य, कोळी नृत्य, देशभक्तीपर गीत, मुकाभिनय आदी सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली. सूत्रसंचालन विकास स्वामी यांनी तर आभार राजकुमार कोराळे यांनी मानले.

### टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**परंडा, दि.३० मार्च -**

परंडा-सोनारी मार्गावर पिंपरखेड शिवारात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. आश्रुबा उत्तरेश्वर मांडवे (वय ३६, रा. कुक्कडगाव, ता. परंडा) हे दि.२८ मार्च रोजी दुपारी मोटरसायकलवरून जात असताना खानापूर पाटीजवळ समोरून येणाऱ्या आयशर टेम्पोने जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडले.

## तुरोरीत हॉटेलसमोरून ८० हजारांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० मार्च -**

तुरोरी येथील मारुती मंदिराजवळील हॉटेलसमोरून महिलेच्या पिशवीतील ८० हजार रुपयांची रोख रक्कम अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत सविता अंबादास तिगलपल्ले (वय ४५, रा. तलमोड, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २५ मार्च रोजी दुपारी त्या तुरोरी येथील मारुती मंदिराजवळील मधुकर सूर्यवंशी यांच्या हॉटेलमध्ये नातवास खाऊ घालण्यासाठी बसल्या होत्या. यावेळी त्यांच्या जवळ असलेली किराणाची पिशवी आणि त्यामधील ८०,००० रुपयांची रोख रक्कम अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी सविता तिगलपल्ले यांनी दि.२९ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## ई-गव्हर्नन्स स्पर्धेत धाराशिव जिल्हा राज्यात तृतीय; जिल्हाधिकाऱ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स विशेष कृती कार्यक्रमांतर्गत आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित गौरव समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभागांचाही गौरव करण्यात आला.

याप्रसंगी माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या कुशल नेतृत्व, दूरदृष्टी आणि प्रभावी नियोजनामुळे धाराशिव जिल्ह्याने ई-गव्हर्नन्स क्षेत्रात लक्षणीय प्रगती साधली आहे. जिल्हा प्रशासनाने तंत्रज्ञानाचा वापर करून कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख केले असून याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. १५० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत जिल्ह्यात विविध नाविन्यपूर्ण डिजिटल उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड, ‘तुळजाई’ चॅटबॉट, ‘कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर’ प्रणाली आणि ‘जीवनरेखा’ प्रणाली यांचा समावेश आहे.

डिस्ट्रिक्ट डॅशबोर्डमुळे विविध शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले असून निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे. ‘कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर’ प्रणालीमुळे शासन निर्णय आणि परिपत्रकांची अद्ययावत माहिती सहज उपलब्ध होत आहे. ‘जीवनरेखा’ प्रणालीद्वारे शेतरस्त्यांची नोंद व व्यवस्थापन सुलभ झाले असून ग्रामीण भागातील तक्रारींचे प्रभावी निराकरण होत आहे. तसेच ‘तुळजाई’ चॅटबॉटमुळे नागरिकांना विविध शासकीय सेवांची माहिती घरबसल्या उपलब्ध होत असून सेवा वितरण अधिक सुलभ, जलद आणि विश्वासार्ह झाले आहे. ई-ऑफिस प्रणालीच्या व्यापक वापरामुळे ‘पेपरलेस कार्यालय’ संकल्पना प्रत्यक्षात येत असून प्रशासनाची कार्यक्षमता वाढली आहे.

या यशामागे जिल्ह्यातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सांघिक प्रयत्न असल्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी नमूद केले.

## वाशीत व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसमुळे खळबळ; तरुणावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० मार्च -**

व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसद्वारे धमकी देत सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या प्रकरणी रंजीत सतीश लिमकर (रा. आंद्रुड, ता. भूम, जि. धाराशिव) याने दि. २९ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे १ वाजता आपल्या मोबाईलवर व्हॉट्सअ‍ॅप स्टेटस ठेवत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

आंद्रुड येथील यात्रेच्या पार्श्वभूमीवर मेला तो मारेगा, राडा होणार, पोर नाही ऐकणार अशा स्वरूपाच्या धमकीच्या मजकुरासह ३०७ कलमाचा उल्लेख करून गावात भीतीचे वातावरण निर्माण केल्याचा आरोप आहे.

याबाबत पोलीस अंमलदार मंगेश नामदेव मिसाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि.३० मार्च २०२६ रोजी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## तेंग सुडो स्पर्धेत उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचा झेंडा उंच

### चार सुवर्ण चार रौप्य सहा कांस्य पदक

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० मार्च -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलने राज्यस्तरीय तेंग सुडो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत ४ सुवर्ण, ४ रजत व ६ ब्राँझ अशी एकूण १४ पदके पटकावली. या स्पर्धा नांदुरा (जि. बुलढाणा) येथे पार पडल्या.



१४, १७ व १९ वयोगटातील राज्यभरातील सुमारे ४५० खेळाडू सहभागी झालेल्या या स्पर्धेत उमरगा शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध वजन गटात दमदार प्रदर्शन केले. सुवर्णपदक विजेत्यांमध्ये आनंदी कांबळे, मोहिनी घोडके, अश्विनी जाधव, ईश्वरी माने यांचा समावेश आहे. रजतपदक सृष्टी सूर्यवंशी, स्नेहल कांबळे, इस्माईल नदाफ, शिवदर्शन शिंदे यांनी मिळवले, तर गीता गायकवाड, प्रीती मेढे, श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ, वैष्णवी कोळनुरे, आदित्य पांडे यांनी ब्राँझ पदके जिंकली. लातूर विभागाचे प्रतिनिधित्व करत शाळेने शंभर टक्के पदकांची कामगिरी करत राज्यात तृतीय क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावली. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सह दिवाणी न्यायाधीश जी.पी. बनकर, एफ.के. खान, यू.आर. शेंडगे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे आदींच्या हस्ते करण्यात आला.

## महामार्गावर लूट; सहा जणांकडून तरुणास मारहाण करून १.१४ लाखांची रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.३० मार्च -**

मुरुम-लातूर मार्गावरील एनएच-६५ वर दाळींब उड्डाणपुलाजवळ सहा अज्ञात व्यक्तींनी तरुणास मारहाण करून त्याच्याकडील १ लाख १४ हजार रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.



याबाबत फिर्यादी ऋषीकेश दयानंद जाधव (वय २७, रा. मोतीनगर, लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २८ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे १०.१५ वाजता ते ड्रायव्हर शुभम याच्यासह त्यांच्या ‘बडा दोस्त’ (क्र. एमएच २४ एटी ४६८६) या वाहनाने मुरुमहून लातूरकडे जात होते.

दरम्यान, दाळींब उड्डाणपुलाजवळ पांढऱ्या रंगाच्या इनोव्हा कारमधून आलेल्या सहा जणांनी त्यांच्या वाहनासमोर कार आडवी लावून गाडी थांबवली. त्यानंतर फिर्यादीस जबरदस्तीने बाहेर ओढून चापट, हंटर व बेल्टने मारहाण केली आणि त्यांच्याकडील १,१४,००० रुपयांची रोख रक्कम हिसकावून नेली.

या प्रकरणी ऋषीकेश जाधव यांनी दि.२९ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## १० वर्षांनंतर स्टोव्हला नवसंजीवनी

### राज्यात पुन्हा केरोसीन वाटप सुरू

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर एलपीजीचा तुटवडा जाणवू लागल्याने केंद्र सरकारने १२ मार्च २०२६ रोजी राज्य सरकारला तात्पुरत्या स्वरूपात केरोसीन वितरणाची परवानगी दिली आहे. त्यामुळे तब्बल दहा वर्षांनंतर महाराष्ट्रात पुन्हा शिधापत्रिकाधारकांना केरोसीनचे वाटप सुरू होणार आहे. त्यामुळे १० वर्षांपासून अडगळीत पडलेले स्टोल पुन्हा सक्रीय होणार आहेत.

आखाती देशांतील युद्धामुळे जागतिक पातळीवर तेल आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम होत असून, भविष्यात या तुटवड्याची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाचा निर्णय घेण्यात आला आहे.



प्रारंभीच्या टप्प्यात अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब वर्गातील शिधापत्रिकाधारकांना प्रति कुटुंब, प्रति शिधापत्रिका ३ लिटर केरोसीन देण्यात येणार आहे.

केरोसीनचे वितरण पूर्वीप्रमाणेच स्वस्त धान्य दुकाने आणि परवानाधारक किरकोळ विक्रेत्यांमार्फत करण्यात येणार आहे.

दरम्यान, गेल्या काही वर्षांत पंतप्रधान उज्वला गॅस योजनेसह विविध योजनांद्वारे एलपीजी गॅस कनेक्शन मोठ्या प्रमाणावर वितरित करण्यात आले होते.

त्यामुळे केरोसीन वितरण बंद करण्यात आले होते आणि स्टोव्हवरील स्वयंपाक जवळपास थांबला होता.

मात्र आता पुन्हा केरोसीन उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण भागातील अडगळीत पडलेले स्टोव्ह पुन्हा वापरात येण्याची शक्यता महिला वर्गातून व्यक्त केली जात आहे.

## जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी गरजेची : ॲड. साळुंखे

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.३० मार्च -**

संत आणि समाजसुधारकांची भूमी असलेल्या महाराष्ट्राने देशाला पुरोगामी विचारांची दिशा दिली असली, तरी आजही अनेक नागरिक श्रद्धेच्या नावाखाली ढोंगी बाबा आणि मांत्रिकांच्या जाळ्यात अडकत असल्याची बाब चिंताजनक आहे. नागरिकांनी देव-धर्मावर श्रद्धा ठेवावी, मात्र अंधश्रद्धेला बळी पडू नये, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा ॲड. कोमल साळुंखे-ढोबळे यांनी केले.

राज्यात गाजत असलेल्या ‘कॅप्टन’ प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित केली. राज्यात हा कायदा अस्तित्वात असूनही मोठ्या प्रमाणावर गुन्हे दाखल होणे आणि ढोंगी बाबांवर कारवाई होणे, हे समाज अजूनही भोंदूगिरीच्या विळख्यात असल्याचे द्योतक असल्याचे त्यांनी सांगितले. भक्ती आणि श्रद्धा ही वैयक्तिक बाब असली, तरी चमत्काराच्या नावाखाली आजार बरे करण्याचे, गुप्तधन मिळवून देण्याचे किंवा संकट दूर करण्याचे आमिष दाखवणारे लोक हे फसवणूक करत असतात. अशा भोंदूगिरीला नागरिकांनी थारा देऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले.



केवळ गुन्हे दाखल करून अंधश्रद्धा निर्मूलन होणार नाही. राज्य सरकारने तालुका आणि गाव पातळीवर व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, असेही त्यांनी नमूद केले.

वैज्ञानिक आणि विवेकनिष्ठ समाज घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असल्याचे ॲड. साळुंखे यांनी सांगितले.

## प्रसूतीनंतर महिलेचा आकस्मिक मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.३० मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील रहिवासी आसमा अजरोद्दीन पठाण (वय ३२) यांचे रविवारी (२९ मार्च) सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात प्रसूतीनंतर आकस्मिक निधन झाले.



त्यांच्या निधनाने मंगरुळ गावावर शोककळा पसरली असून कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन लहान मुले (वय ५ व १०), तसेच इतर कुटुंबीय असा परिवार आहे.

मंगरुळ येथील कब्रस्तानात रात्री शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### प्राचार्य डॉ. गव्हाणे यांचा विद्यार्थ्यांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** 'इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड'चा मानाचा सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मिळाल्याबद्दल लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांचा महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. हा सत्कार विद्यार्थी परिषदेचा सचिव फरदिन शेख, सहसचिव शैलेश जामगे, श्रावणी लगडे, आदित्य सोनकांबळे, विद्यार्थी समन्वयक गणेश गव्हाणे व प्रा. आशिया बेग यांनी अत्यंत देखण्या स्वरूपात कार्यक्रमाचे नियोजन केले होते. डिजिटल माध्यमातून प्राचार्यांना प्रदान करण्यात आलेल्या पुरस्काराबद्दल अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यात उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. प्रकाश रोडिया व डॉ. गोविंद उफाडे, दत्ता पिटले, भगवान राठोड यांनी प्राचार्यांच्या शैक्षणिक दूरदृष्टीवर प्रकाश टाकला. या निमित्ताने प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांची विशेष मुलाखत फरदीन शेख याने घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक आव्हाड यांनी केले तर सर्वांचे आभार प्राजक्ता कापसे यांनी मानले. या सोहळ्यास परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, डॉ. अनुजा जाधव, क्रीडा विभागप्रमुख डॉ. अनिरूध्द बिराजदार, डॉ. विजय दळवी व डॉ. व्यंकट धुमाळ यांच्यासह अनेक प्राध्यापकांची आणि विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

### बोरोळ येथील शेतक-यांच्या ऊसाला अज्ञात व्यक्तींनी पेटऊन दिले



**तभा वृत्तसेवा**

**देवणी :** ' तालुक्यातील बोरोळ येथील सर्वे नं. १४९/१ मधील क्षेत्र १ हेक्टर ३० आर ऊसाच्या फडाला अज्ञात व्यक्तींनी दिं. ३० मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता शेतात कोणी नसल्याचे पाहून पेटऊन दिल्याने शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन आर्थिक आणि मानसिक छळ केल्याचे निवेदन देवणी तहसीलदार यांना देण्यात आले.

निवेदनात शेतकरी अशोक नरहरी बोंबळे म्हणटले आहे की, मी शेतात नसल्याचा अंदाज घेऊन दुपारी १२ वाजता जाणीवपूर्वक ऊसाला आग लावून जाळुन टाकले. ऊसा मध्ये केलेला ठिबक पण जळून खाक झाले आहे. ऊस तोडणी करुन तीन महिने झाले होते. आज रोजी ऊस तीन फूट उंच आला होता. शेतक-यांचे जवळपास सात लाखाचे नुकसान झाले असल्याने मानसिक त्रास होऊन आर्थिक त्रास देणा-या अज्ञात व्यक्तीवर फौजदारी गुन्हा नोंद करावी आणि झालेली नुकसान भरपाई मिळावी असे या निवेदनात अशोक बोंबळे नमूद केले आहे. याची माहितीस्त प्रती जिल्हाधिकारी लातुर, पोलीस निरीक्षक देवणी, मंडळ अधिकारी बोरोळ आणि तलाठी यांना देण्यात आले.

# ११ व १२ एप्रिलला सहाव्या राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचे आयोजन : डॉ. अभिमन्यू टकले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही दि. ११ व १२ एप्रिल २०२६ रोजी नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे सहाव्या राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. अभिमन्यू टकले यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत दिली. होळकर वाडा या ठिकाणी होणाऱ्या या संमेलनाच्या अध्यक्षपदी सोलापूरच्या पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांची निवड करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

या साहित्य संमेलनाचे कार्यवाहक प्राचार्य दत्तात्रय बारगळ हे आहेत. संयोजक बापूसाहेब शिंदे हे असून सदर संमेलन मार्गदर्शक व महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब कर्णवर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. संमेलनाचे उदघाटन आ. गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होणार आहे. ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होणार आहे. शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता संमेलनाचे उद्घाटन होईल. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खा. रामराव वडकुते, मध्यप्रदेशचे पालकमंत्री सैतान सिंग, माजी आमदार रामहरी रुपनवर, काळाराम मंदिराचे मुख्य पुजारी सुधीरदास महाराज, माजी आ. हरिभाऊ भदे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, सुभाष बोन्द्रे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन सोहळ्यात अनेक साहित्यिकांच्या ग्रंथांचे प्रकाशनही पाहुण्यांच्या हस्ते होणार असल्याचे डॉ. टकले यांनी सांगितले.

संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांना विविध पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात येणार आहे. संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात चांदवडच्या जडणघडणीत होळकरांचे योगदान या विषयावर प्राचार्य दत्तात्रय बारगळ हे मार्गदर्शन करणार आहेत. महाराजा यशवंतराव होळकर यांचे देशासाठी योगदान या विषयावर प्रा. डॉ. मधुकर सलगरे यांचे व्याख्यान होईल तर धनगर जमातीची राजकीय स्थिती या विषयावर प्रा. डॉ. विजय शिरसाठ मार्गदर्शन करणार आहेत. संमेलनाच्या चौथ्या सत्रात प्रशांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होणार आहे.

या कवी संमेलनात राज्यभरातील मान्यवर कवी आपल्या रचना सादर करणार आहेत. पाचव्या सत्रात पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर एकपात्री नाटक सादर होणार आहे. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी, रविवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत विविध परिसंवाद व चर्चासत्र होणार आहेत.यामध्ये धनगर समाजाची शैक्षणिक स्थिती या विषयावर प्राचार्य धोंडीराम गडदे आपले विचार व्यक्त करणार आहेत.

धनगर जमातीच्या मेंढपाळ व्यवसायाची स्थिती : काल, आज आणि उद्या या विषयावर चंद्रकांत हजारे मार्गदर्शन करणार आहेत. पुण्यश्र्लोक



अहिल्यादेवी होळकरांची त्रिजन्म शताब्दी एक आढावा या विषयावर राम लांडे हे आपले विचार व्यक्त करणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. मधुकर सलगरे, लक्ष्मण नजन यांचेही व्याख्यान होणार आहे.

संमेलनाच्या समारोप सोहळ्यास माजी आ. बच्चूभाऊ कडू, डॉ. यशपाल भिंगे, आयपीएस अधिकारी बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ पत्रकार दिलीप येडतकर, रेशमा पुणेकर, गणेश निंबाळकर, विनायक काळदाते आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून धनगर समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे डॉ. टकले यांनी सांगितले. यावेळी चंद्रकांत हजारे, संभाजीराव सूळ, प्रा. डॉ. सलगरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी साहित्यिक उज्वलकुमार माने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## रेणापूर पंचायत समितीतील नूतनीकरण दालनाचा आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ३० मार्च :** रेणापूर पंचायत समितीतील सभापती, उपसभापती आणि गटविकास अधिकारी यांच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या दालनाचा शुभारंभ लातूर ग्रामीणचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आला.

जिल्हा परिषद पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीनंतर भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात रेणापूर पंचायत समितीवर भाजपा मनसे युतीचा झेंडा फडकला आणि सभापतीपदी सौ. मोनिका सूर्यवंशी तर उपसभापती पदी शरद दरेकर यांची निवड करण्यात आली.

रेणापूर पंचायत समितीतील सभापती, उपसभापती आणि गटविकास अधिकारी यांच्या दालनाचे सुसज्ज असे नूतनीकरण करण्यात आले असून या नूतनीकरण करण्यात आलेल्या दालनाचा लातूर ग्रामीणचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुक्रवारी शुभारंभ करण्यात आला.




याप्रसंगी तहसीलदार प्रशांत थोरात, सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई आकनगिरे, गटविकास अधिकारी सुमित जाधव, सदस्या शितल राऊतराव, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, अॅड. दशरथ सरवदे, वसंत करमुडे, लक्ष्मण यादव, रमेश कटके, ओम चव्हाण, अशोक राठोड, निवृत्ती छिद्रे, नामदेव बोंबडे, राम मोरे, संतोष चव्हाण, अजय राठोड, गोपाळ पडिले, अच्युत कातळे, श्रीकृष्ण पवार, गणेश चव्हाण, उत्तम चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, अजित पाटील, सुरेश बुड्डे, अंबादास राठोड, राजू आलापुरे, शिवाजी जाधव, राजकुमार मानमोडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आकाश हिप्पाळे यांच्या कार्यालयाचे सहकार मंत्र्याच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ३० मार्च :** चाकूर येथील यशवंत मंगल कार्यालयाचे संचालक आकाश यशवंतराव हिप्पाळे यांच्या नवीन ऑफिस कार्यालयाचे उद्घाटन राज्यांचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्याची सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना म्हणाले की,आमचे स्नेही कै.यशवंतराव यांच्या सारखे आपणही यशवंत बना आणि आपला व्यवसाय भरभराटीला नेण्यासाठी सतत परिश्रम करण्याची ताकद ठेवा. त्यावेळेस आपण यशस्वी बनतो असा सल्ला त्यांनी आकाश यशवंतराव हिप्पाळे यांना दिला.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्यांचे माजी मंत्री बाळासाहेब जाधव, सिद्धी शुगर साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव, सिद्धी शुगरचे संचालक तथा अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील,लातूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, चाकूर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष करीम साहेब गुळवे, मच्छिंद्र नागरगोजे, उपसभापती शिंदे, चापोलीचे सरपंच डॉ. भालचंद्र चाटे, वडवळ जिल्हा परिषदेचे सदस्य भानुदास पोटे, रोहिना जिल्हा परिषद सदस्या उषाताई सोनकांबळे, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे, नगरसेवक मिलिंद महालिंगे,भागवत फुले, राम कसबे, शिवदर्शन स्वामी, पवन कांबळे, औद्योगिक वसाहतीचे चेअरमन शिवकुमार उस्तुरगे, राष्ट्रवादीचे नेते सिद्धेश्र्वर अंकलकोटे,मधुकर मुंडे, अनिल वाडकर, धनंजय जाधव, डॉ. सिध्देश्र्वर शेटकर, माधवराव शेटे, नरसिंग मोतीपवळे, गणेश पटणे, प्रकाश पेंटर, शिवसांब शेटे, नागिनबाई यशवंतराव हिप्पाळे, शांताबाई शेटकर, शिवकांता शेटकर, महानंदा उस्तुरगे, साक्षी हिप्पाळे, आदिती उस्तुरगे, युग उस्तुरगे, विष्णू कलुरे, आकाश कलुरे आदी मान्यवर उपस्थित होते.



### जळकोट तालुक्यात उल्लास : नवभारत साक्षरता मूल्यमापन व चाचणी; १९१ पैकी १८८ परीक्षार्थींनी दिली परीक्षा



**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. ३० मार्च :** केंद्र सरकार कार्यक्रम अंतर्गत २०२५-२६ या वर्षातील पायाभूत साक्षर संख्याद्वान मूल्यमापन चाचणी परीक्षा दि २९ मार्च रोजी रविवारी या दिवसीपरीक्षा घेण्यात आली तालुक्यात ३६ केंद्रावर १८८ नवसाक्षरांनी ही परीक्षा जळकोट तालुक्यात विविध शाळेमध्ये देण्यात आली.

देशातील १५ वर्षे व त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तीमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन,लेखनआणि संख्याज्ञान) यासाठी हे नियोजन करण्यात आले होते यामध्ये जळकोट तालुक्यात शालेचे नाव. के.प्रा.शा. अतनुर.प्रा.शा. फटाकडी तांडा. के.प्रा.शा.मंगरुळ .प्रा.शा. बेळसांगवी.प्रा.शा.सोनवळा .प्रा.शा.कोनाळीडोंगर.प्रा.शा.येवरी.प्रा.शा.लाळीखु.प्रा.शा. धनगरवाडी.प्रा.शा. बोरगाव.प्रा. शा. माळहिप्परगा.प्रा.शा. करंजी .प्रा.शा.कुणकी.प्रा.शा.हाळदवाढवणा.प्रा.शा.विराळ.प्रा.शा. शिवाजीनगरतांडा .प्रा.शा. जळकोट तांडा .प्रा.शा.डांगेवाडी .प्रा. शा.न.व.जळकोट .प्रशाला जळकोट .के.प्रा.शा. वांजरवाडा .प्रा. शा. केकतशिंदगी .ज्ञानवर्धिनी माध्यमिक मंगरूळ .संत ज्ञानेश्र्वर वि सोनवळा .स्व.म.ना.पा.मध्य विसांगवी .इंदिरा गांधी प्रा.शा जळकोट .संत ज्ञानेश्र्वर प्रा शा जळकोट . सुभद्राबाई इंग्लीश स्कुल जळकोट .एम.पी इंग्लीश स्कुल . जळकोट .ज्ञानविकास वि पाटोदा वु . श्री धोंडुतात्या वि कुणकी .श्री समर्थोंडुतात्या वि माळहिप्परगा .श्री समर्थोंडुतात्या वि कोळनूर .श्री गुरुदत्त माध्यमिक वि जळकोट .शांतामाता कन्या वि जळकोट .संभाजी केंद्रे महाविदयालय जळकोट .इत्यादी शाळेत परीक्षा घेण्यात आली.

जळकोट तालुक्यात विविध शाळेतील ३६ परीक्षा केंद्रावर १९१ नवसाक्षरांनी ही परीक्षा दिल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांनी दिली. या उपक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे,विस्तार अधिकारी के.पी.बिरादार, विभागप्रमुख एस.बी.कंदाकुरे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकांनी पुढाकार घेतला.

## हाडगा येथे अग्नितांडव, शेतकऱ्याचे २० लाखाचे नुकसान





**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ३० मार्च :** सोयाबीन व इतर शेतीउपयोगी साहित्य ठेवलेल्या गोडाऊनमध्ये शॉट सर्कीट होऊन लागलेल्या आगीत हाडगा येथील शेतकरी सर्जेराव मोरे यांचे जवळपास २० लाखाचे नुकसान झाल्याची घटना शनिवार (दि २८) रोजी रात्री नऊ वाजताच्या सुमारास घडली.

निलंगा तालुक्यातील हाडगा येथील शेतकरी सर्जेराव मोरे यांच्या शेतातील गोडाऊनला शॉट सर्किट होऊन आचानक आग लागली. आग लागल्याचे सर्जेराव मोरे यांना लक्षात येताच त्यांनी शेडमधील जनावरे बाहेर काढण्याचा प्रयत्न केला त्यात त्यांनाही दुखापत झाली. आगीने बघता बघता रोद्ररुप धारण केले. आगीत गतवर्षी सोयाबीनला भाव नसल्याने सोयाबीन न विकता शेडमध्ये साठवून ठेवले होते. गतवर्षीचे व यंदाचे मिळून जवळपास २७० कट्टे सोयाबीन, ७० कट्टे गहू, २० कट्टे ज्वारी, इतर शेती उपयोगी साहित्य, संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले तर एक शेळी जागीच जळून खाक झाली. जवळपास २० लाखाचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ धावून जात आग विझविण्याचा प्रयत्न केला. नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांना आगीची माहिती मिळताच त्यांनी निलंगा नगरपालिकेची अग्निशमन दलाची गाडी पाठवून दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी जवळपास एक तासाच्या अथक परिश्रमानंतर आगीवर नियंत्रण मिळवले. आग विझेपर्यंत सर्व साहित्य जळून खाक झाले होते. घटनास्थळी महावितरणचे अभियंता केंद्रे, तलाठी तावरे यांनी पंचनाम केला. आगीत जखमी झालेले शेतकरी सर्जेराव मोरे यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आले आहे......

## ओबीसी महासंघाच्या आंदोलनास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** आगामी राष्ट्रीय जनगनणेत ओबीसी आणि इतर जातीची गणना पारदर्शकपणे करण्याचे आश्र्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात आता जनगणना अर्जात ओबीसीचा कॉलम नाही त्यामुळे या निर्णयाचे पालन केंद्र सरकारने करायला पाहिजे व जनगणनेत ओबीसीचा कॉलम समावेश करावा या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने दि. २३ मार्च रोजी दिल्लीमध्ये देशव्यापी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हे आंदोलन राष्ट्रीय ओबीसी महासंघ बीसी वेल्फेअर असोसिएशन, तेलंगणा, आंध्र प्रदेश, आणि ओबीसी महासभा अन्य संघटनाच्या वतीने नवी दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील खासदार प्रतिभा धानोरकर, खासदार डॉ. नामदेव कीरसात, खासदार डॉ. प्रशांत पडोले, खासदार आप्पला नायडु, खासदार अंबिका लक्ष्मीनारायण, बुस्टीपती नागराजू, खासदार भट्टी मल्लू रवी, श्याम कुमार बर्वे कल्याण काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, बळवंत वानखेडे, बाळूमामा म्हात्रे, इकबाल अन्सारी आदींनी आंदोलनाला भेट दिली.

आंदोलन यशस्वी करण्याकरिता राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर, राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे, प्रा. शेषराव येलेकर, डॉ. प्रकाश, चेतन शिंदे, राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे राजाध्यक्ष श्याम लेडे व राज्य सरचिटणीस विजयकुमार पिनाटे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दिनेश चोखारे, अनंत भारासाकडे, सुनील पाटील, एकनाथ तारमळे, महिला अध्यक्ष ज्योती ढोकणे, पुडके, रणजीत डवरे, विक्रम गौंड, , प्रा. रविकांत, प्रा. रवी जोगी आदींनी परिश्रम घेतले.

# लोककल्याणकारी योजनांचा थेट लाभ - आ. अभिमन्यू पवार

## औसात भाजपा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ३० मार्च :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांचा थेट लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे.असे प्रतिपादन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

औसा येथील बालाजी मंदिरात आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय कार्यकर्ता निवासी प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. मंडळ प्रशिक्षण महाअभियानांतर्गत आयोजित या शिबिरात सरकारची कामगिरी आणि



अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला.

आ अभिमन्यू पवार पुढे म्हणाले, पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदयाच्या विचारसरणीवर आधारित योजनांमुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय लाभ पोहोचत आहे. जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, उज्वला गॅस योजना, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीकविमा योजना, आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजना यांसारख्या उपक्रमांमुळे जनतेच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यकर्ता हाच भारतीय जनता पक्षाचे खरे बलस्थान आहे. प्रशिक्षणाद्वारे कार्यकर्त्यांना अधिक सक्षम व अद्ययावत करण्याचा हा प्रयत्न असून त्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण वर्ग महाअभियान २०२६ अंतर्गत २८ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत औसा मतदारसंघातील औसा शहर, औसा ग्रामीण, किल्लारी व कासार सिरसी मंडळांसाठी प्रत्येकी ८ सत्रांचे दीड-दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले आहेत. याच पार्श्र्वभूमीवर औसा शहर मंडळ प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटनही करण्यात आले.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

नळदुर्ग बायपास रोडवरील निसर्ग हॉटेलजवळ शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.२७ मार्च रोजी सकाळी ९.१२ वाजता पोलीस कर्मचारी दत्तात्रय माणिकराव कुंभार व त्यांचे पथक शासकीय कामकाज करत असताना आयशर टेम्पो (क्र. एमएच १६ सीडी२३९५) मध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित व आरोग्यास घातक असलेला गोवा गुटखा वाहतूक करताना आढळून आला.




या कारवाईदरम्यान ५० गोण्या गुटखा, आयशर टेम्पो, एक स्विफ्ट कार व तीन मोबाईल असा एकूण ४८ लाख ४२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

कारवाई सुरू असताना आरोपींनी पोलिसांना गाडी सोडून दे, नाहीतर तुला बघतो अशी धमकी देत शासकीय कर्तव्यात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. तसेच इतर काही व्यक्तींनीही आरोपींना चिथावणी दिल्याची नोंद आहे.

या प्रकरणी संजय सुभाष जगताप, सचिन परमेश्वर पवार, सतीश तुकाराम सोंडगे व इंद्रजितसिंग उर्फ मिट्टू ठाकूर यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


# कार्यकर्त्यांनी केलेल्या त्यागावरच पक्ष उभा आहे : दत्ताभाऊ कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

प्रत्येक क्षेत्रात त्याग केल्याशिवाय फळ मिळत नाही. जनसंघाच्या माध्यमातून अनेक त्या विचारधारेच्या बळावरच आज केंद्र, राज्य आणि जिल्ह्यात भाजपचे सरकार कार्यरत आहे. प्रगत राष्ट्राच्या दृष्टीने ही बाब समाधानकारक आहे, असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी व्यक्त केले.




पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानाच्या समारोप प्रसंगी दत्ताभाऊ कुलकर्णी बोलत होते. भारतीय जनता पार्टीच्या वतीने भूम शहर व ग्रामीण मंडलस्तरीय दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन शनिवार (दि.२८) व रविवार (दि.२९) रोजी श्री संत गजानन महाराज मंदिर सभागृहात करण्यात आले होते.

या प्रशिक्षण वर्गाला माजी मंत्री आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, राज्य परिषद सदस्य तथा मतदार यादी पुनरनिरीक्षण विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर यांचे मार्गदर्शन लाभले. सात सत्रांमध्ये विविध विषयांवर तज्ज्ञ वक्त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणार्थींनी 'मन की बात' कार्यक्रम चित्रफितीच्या माध्यमातून पाहिला व ऐकला. तसेच सचिन घोडके यांनी मोबाईलच्या माध्यमातून सर्व प्रशिक्षणार्थींना 'सरल प'वर माहिती नोंदविण्यास मदत केली. या दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्गात तालुक्यातील १६३ बूथ प्रतिनिधी सहभागी झाले होते. प्रशिक्षणार्थींसाठी भोजन व निवासाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्ताभाऊ राजमाने, संतोष सुपेकर, बाबासाहेब वीर, स्वाती तनपुरे, विद्या खामकर, सिद्धार्थ जाधव, शुभम खामकर, आबासाहेब मस्कर, शांतीराज बोराडे, बापू बगाडे, संदीप खामकर, शरद चोरमले, रघूनाथ वाघमोडे आदींसह अनेकांनी परिश्रम घेतले.

## चैत्री एकादशीनिमित्त खानापूरची महादेव यात्रा रंगली; कावडधारकांचा उत्साह शिगेला



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील खानापूर येथे चैत्री एकादशीनिमित्त भरत असलेली प्रसिद्ध महादेवाची यात्रा यंदाही भक्तांच्या उत्साहात रंगली आहे. सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली असून संपूर्ण परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला आहे.

चैत्र महिन्यात निघणाऱ्या कावड यात्रेचे विशेष आकर्षण येथे पाहायला मिळत आहे. तालुक्यातील विविध गावांमधून कावडधारक डोक्यावर कावड घेऊन पायी खानापूरकडे प्रस्थान करत आहेत. मंदिर परिसरातील डोंगर चढून भाविकांकडून महादेवाला जलाभिषेक करण्यात येत असून, श्रद्धा आणि भक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळत आहे.

यात्रेनिमित्त खानापूर गावात जत्रेचे स्वरूप आले आहे. ठिकठिकाणी खेळणी, खाद्यपदार्थ व विविध वस्तूंची दुकाने सजली असून, लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण यात्रेचा आनंद लुटताना दिसत आहेत.

## सैनिक स्कूल व नवोदय पात्र विद्यार्थी वरद जाधवर याचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२९ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल येथील गुणवंत विद्यार्थी वरद राहुल जाधवर याने सैनिक स्कूल व नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पालक राहुल जाधवर, मिलन शेख, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे, शिवराज भुजबळ यावेळी उपस्थित होते. यावेळी वरद जाधवर याला पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. यावेळी वक्त्यांनी वरदच्या मेहनतीचे व जिद्दीचे कौतुक करत इतर विद्यार्थ्यांनीही त्याच्यापासून प्रेरणा घ्यावी असे आवाहन डॉ. जितेंद्र कानडे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर बंडगर यांनी तर आभार अबाई वाघमारे यांनी मानले.

## उत्तुंग तेज बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० मार्च -**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि भविष्यातील शास्त्रज्ञ घडावेत या उद्देशाने उत्तुंग तेज फाउंडेशन यांच्या वतीने उत्तुंग तेज बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा उत्साहात पार पडली. हिवरे बाजार अंतर्गत आयोजित या परीक्षेचे केंद्र स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे ठेवण्यात आले होते.

### १६८ विद्यार्थ्यांचा सहभाग

या परीक्षेस विविध शाळांमधील एकूण १६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयातील आपली जिज्ञासा आणि ज्ञान कौशल्य दाखवत परीक्षेत सहभाग घेतला. परीक्षेचे केंद्र संचालक म्हणून सनी सगर यांनी जबाबदारी पार पाडली, तर सहाय्यक म्हणून रूपाली वेदपाठक यांनी सहकार्य केले. पर्यवेक्षक म्हणून रामदास कुलकर्णी, राजोळे, मेंडके, अजिंक्य कांबळे, प्रणित सूर्यवंशी, पाटील बी.जी., तांबोळे तसेच रत्नदीप मालखरे यांनी परीक्षेचे सुयोग्य नियोजन व पर्यवेक्षण केले. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन दंडगे, डॉ. कपिल महाजन, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. चंद्रकांत महाजन, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड तसेच सदस्य प्रमोदभाऊ कुलकर्णी, राजा देशेट्टी, प्रवीण अणदूरकर आणि संजय धोंडदेव यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण होऊन भविष्यात अधिकाधिक विद्यार्थी संशोधन क्षेत्राकडे वळतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## नळदुर्गमध्ये पानपोईचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

नळदुर्ग येथे संजीवनी मेडिकल स्टोअर्स व ८-फार्मा ग्रुपच्या वतीने भाजपचे युवा नेते सुनील चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांसाठी मोफत पानपोई सुरू करण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना धरणे यांनी, सध्याच्या उन्हाळ्यात नागरिकांना थंडगार पाणी उपलब्ध करून देणे हा स्तुत्य सामाजिक उपक्रम असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास तानाजी जाधव, रीजवान काजी, स्वप्नील काळे, डॉ. जितेंद्र पाटील, सुहास येडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच नवोदय विद्यालयात प्रवेश मिळाल्याबद्दल आरोही सातपुते हिचा शालेय साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विनायक अहंकारी यांनी मानले.

## शिवलिंगात सगुण व निर्गुण हे दोन्ही तत्त्वे : आचार्य विनोद कृष्ण शास्त्रीजी



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३० मार्च -**

कळंब येथील कसबा पेठेतील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात सुरू असलेल्या शिवपुराण कथा सोहळ्यात प्रसिद्ध कथाकार हभप. आचार्य विनोद कृष्ण शास्त्रीजी नायगव्हाणकर (वृंदावन) यांनी शिवतत्त्व व अध्यात्माचे महत्त्व स्पष्ट केले.

२८ मार्च रोजी तिसऱ्या दिवसाच्या कथेत बोलताना त्यांनी भगवान शंकर हे आद्य देव असून त्यांची पूजा शिवलिंग स्वरूपात केली जाते, असे सांगितले. शिव निरगुण व सगुण स्वरूपात शिवलिंगात स्थित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच जीवनात संयम, योग्य आचार-विचार आणि शिस्त पाळण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी त्यांनी लवकर झोपा, लवकर उठा हा संदेश देत आरोग्यदायी जीवनशैलीचा सल्ला दिला. भारत ही ज्ञान, तप व त्यागाची भूमी असल्याने तो विश्वगुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. हनुमान जयंतीनिमित्त २६ मार्च ते २ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण व दुपारी २ ते ५ या वेळेत होणाऱ्या शिवपुराण कथेला भाविकांची मोठी उपस्थिती लाभत आहे.

दररोज सकाळी ज्ञानेश्वरी पारायण तर संध्याकाळी कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात येत असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## योग्य संगतीच यशाची गुरुकिल्ली : हभप. सोपान महाराज कनेरकर



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३० मार्च -**

माणसाच्या आयुष्यात त्याची प्रगती किंवा अधोगती ही तो कोणाच्या संगतीत राहतो, यावर अवलंबून असते. त्यामुळे आपली संगत कोणाशी आहे, हे तपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार व प्रबोधनकार हभप सोपान महाराज कनेरकर यांनी केले.

येथील कसबा पेठेतील ऐतिहासिक दक्षिणमुखी हनुमान मंदिरात आयोजित कीर्तन सेवेप्रसंगी ते बोलत होते. आपल्या रसाळ वाणीने त्यांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.

कीर्तनादरम्यान महाराजांनी एका अभंगाच्या माध्यमातून मानवी शरीराच्या नश्वरतेवर प्रकाश टाकला. जरी पोखले शरीर, तरी ते केव्हाही जाणार या ओळींचा दाखला देत त्यांनी सांगितले की, आपण ज्या शरीराची इतकी काळजी घेतो, ते एक दिवस मातीत विलीन होणार आहे. त्यामुळे या नश्वर देहाचा अहंकार न बाळगता परमार्थ, सद्गुण आणि सत्कर्मांची जोपासना करणे हाच मानवी जन्माचा खरा उद्देश असायला हवा.

या कीर्तन सोहळ्यामुळे कळंबमधील वातावरण भक्तिमय झाले होते. विठ्ठल-नामाच्या गजरात परिसर दुमदुमून गेला होता. हनुमान मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. महाराजांच्या सहज आणि प्रभावी प्रबोधनामुळे उपस्थित श्रोते भक्तिभावात न्हाऊन निघाले.

### व्यसनमुक्तीचा आणि सदाचाराचा संदेश...

कीर्तनादरम्यान महाराजांनी तरुणांना चुकीच्या संगतीपासून दूर राहण्याचे आवाहन केले. संतांच्या विचारांची कास धरून सात्विक जीवन जगावे, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत २५ तरुणांनी महाराजांच्या हस्ते तुळशीची माळ घालून व्यसनमुक्त व सदाचारपूर्ण जीवन जगण्याची शपथ घेतली. या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) नगरसेवकांचा मुंबईत गौरव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) प्रदेश कार्यालयात धाराशिव नगरपरिषदेतील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री शशिकांत शिंदे यांच्या हस्ते नगरसेवकांचा गौरव करण्यात आला. यावेळी खलिफा कुरेशी, बबलू शेख, इस्माईल शेख, पंकज भोसले, एजाज काजी, सुनील आंबेकर, अशोक देवकते, विशाल शिंगाडे आणि सरफराज कुरेशी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच धाराशिव पंचायत समितीतून निवडून आलेल्या सदस्य प्रियंका अमोल घोगरे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार, माजी आमदार अशोक बापू पवार, देवदत्त निकम यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमरगा शहरात 'वॉटर एटीएम' उभारावेत

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० मार्च -**

उमरगा शहर व बसस्थानक परिसरात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कमतरता भासत असल्याने विविध ठिकाणी 'वॉटर एटीएम' उभारावेत, अशी मागणी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.



अॅड. शीतल चव्हाण फाउंडेशनची मागणी...

याबाबत नगर परिषद उमरगा येथे नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असून, बसस्थानक, बाजारपेठ, शासकीय कार्यालये व रुग्णालय परिसरात तातडीने सुविधा उपलब्ध करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वॉटर एटीएम द्वारे स्वच्छ व परवडणाऱ्या दरात पाणी उपलब्ध करून देणे, तसेच त्यांची नियमित देखभाल ठेवण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. नगर परिषद प्रशासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या निवेदनावर ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनमार्फत राजू बटगिरे, राम गायकवाड, धिरज बेळंबकर, करीम शेख, धनय्या स्वामी, प्रदीप चौधरी, बबीता मदने, शबाना शेख, सत्यनारायण जाधव, राजू भालेराव, ॲड. ख्वाजा शेख, प्रदीप मोरे, ॲड. अर्चना जाधव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## वाहनधारकांकडून ३.२९ लाखांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च-**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.२९ मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवून मोटार वाहन कायदा उल्लंघन करणाऱ्यांवर धडक कारवाई केली.

या मोहिमेदरम्यान एकूण ३७४ प्रकरणांत कारवाई करण्यात आली असून ३ लाख २९ हजार ६०० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

## मोबाईलचा अतिरेक; कुटुंबातील नात्यांवर परिणाम : तोडकर

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३० मार्च -**

मोबाईलच्या अतिवापरामुळे कुटुंबातील संवाद कमी होत असून तरुण पिढी विविध व्यसनांच्या आहारी जात असल्याची गंभीर चिंता तोडकर अण्णा यांनी व्यक्त केली. ते जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते.




दि. २७ व २८ मार्च रोजी कळंब तालुक्यातील हासेगाव (केज) येथील 'पर्याय फाउंडेशन'च्या प्रशिक्षण कॅम्पस परिसरात या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्यास कळंब तालुक्यातील सुमारे ४५० महिला तर वाशी तालुक्यातील सुमारे ५५० महिला उपस्थित होत्या. पुढे बोलताना तोडकर अण्णा म्हणाले की, मोबाईल गेम्समुळे तरुण कर्जबाजारी होत असून अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडत आहेत. तसेच चरस, गांजा, ड्रग्स यांसारख्या व्यसनांचे प्रमाणही वाढत आहे.

त्यामुळे महिलांनी बचतीकडे वळून कुटुंब उभारणीसाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी मोहीम प्रमुख विलास गोडगे, संचालक ऋषिकेश तोडकर, अनिता तोडकर, तेजश्री भालेराव, सुनंदा खराटे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक बालाजी शेंडगे व भिकाजी जाधव यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्रुबा गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन कल्पना जतकर व ज्योती शिंदे यांनी केले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांचा लातूर जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे मंगळवार, दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सभापती प्रा. शिंदे यांचे सकाळी १०.४५ वाजता लातूर विमानतळ येथे आगमन होईल. सकाळी १०.५५ वाजता लातूर विमानतळ येथून शासकीय विश्रामगृह लातूरकडे प्रयाण करतील. सकाळी ११.१५ वाजता शासकीय विश्रामगृह लातूर येथे आगमन होईल व लातूर शहर जिल्हा भाजपच्यावतीने आयोजित स्वागत व सत्कार समारंभास उपस्थित राहतील. सकाळी ११.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथून विष्णूदास मंगल कार्यालय, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, अंबेजोगाई रोड, लातूरकडे प्रयाण करतील. सकाळी ११.४० वाजता विष्णूदास मंगल कार्यालय येथे आगमन होईल व लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत धनगर समाजाच्या निवडून आलेल्या उमेदवारांचा तसेच नूतन राज्यसभा सदस्य रामराव वडकुते व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेत यश मिळविलेल्या सनदी अधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभास उपस्थित राहतील. सभापती प्रा. शिंदे हे दुपारी १२.४५ विष्णूदास मंगल कार्यालय येथून दिपज्योती नगर, एकता कॉलनी लातूरकडे प्रयाण करतील. दुपारी १ वाजता दिपज्योतती नगर येथे आगमन होईल व श्री. अनिल गोयकर यांच्या निवासस्थानी राखीव. दुपारी १.४५ वाजता दिपज्योती नगर येथून लातूर विमानतळाकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता लातूर विमानतळ येथून विमानाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील



## विविध वृत्त...

### किरकोळ कारणावरून हल्ला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** 'तू आम्हाला पाहून हॉर्न का वाजविला', असा जाब विचारत बिथरलेल्या दोघांनी टेम्पोचा पुढील काच फोडण्यासह चालक व त्यांच्याोबतच्या एकावर कोयत्याने वार करून जीवघेणा हल्ला केल्याची घटना मळवटी रस्त्यावरील महादेव मंदिराजवळ शुक्रवार दि. २७ मार्च रात्री सव्वा आठ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहराच्या मळवटी रस्त्यावरील महादेव मंदिराजवळ फिर्यादी राम दत्तात्रय शिंदे ) हे व्यापारी त्यांचा टेम्पो घेऊन घराकडे निघाले होते. त्याचवेळी समोरील वाहने हटण्यासाठी शिंदे यांनी त्यांच्या टेम्पोचा हॉर्न वाजविला. याचा राग अनावर झालेले आरोपी अतीश उर्फ दाद्या कांबळे व करण कांबळे यांनी टेम्पो थांबविला. टेम्पोची पुढील काच फोडून नुकसान केले. त्याचप्रमाणे चालक शिंदे यांच्या उजव्या पायावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करून त्यांना जखमी केले. त्यांच्यासोबत असलेले अंकुश किशनराव सूर्यवंशी यांच्यावरही कोयत्याने हल्ला केला. यात दोघेही गंभीर जखमी झाले. याप्रकरणी राम दत्तात्रय शिंदे यांच्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन रेडेकर हे करीत आहेत.

### ॲड. असीम सरोदे यांचे लातुरात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** येथील मुख्याध्यापक राजकुमार नामवाड गौरव समितीच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ तथा राजकीय विश्र्लेषक आणि परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते ॲड. असीम सरोदे यांचे 'भारतीय संविधान आणि सध्याचे राजकारण' या महत्वपूर्ण विषयावर दि. ३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अशोक नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या व्याख्यानास प्रमुख पाहूणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानाचा लातूरकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राजकुमार नामवाड गौरव समितीच्या वतीने मोहन हाके, नरसिंग घोडके, शिरीष दिवेकर, प्रा. डॉ. सोमनाथ कदम, नारायण कांबळे, एकनाथ पलमटे, बालाजी साळुंखे, आप्पाराव शिंदे, उत्तम दोरवे, दयानंद कांबळे, एकनाथ पलमटे, नामदेव घोडके, दत्ता माने, बालाजी साळुंखे, बालाजी सोनकांबळे, जगन्नाथ यमले, राहुल गायकवाड, छगन घोडके, तुळशीराम घोडके, शारदाताई हजारे, अशोक तोगरे, मधुकर दुवे, व्यंकट सरोदे, प्रा. अशोक गोमुकले, प्रा. दिलीप भोगे, प्रा. राम कांबळे, डॉ. गंगाधर साखरे यांनी केले आहे.

### व्हीएस पँथर्स वाहतूक आघाडी कार्यकारिणीचा विस्तार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** येथील व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वाहतूक आघाडीच्या शहर कार्यकारिणीचा विस्तार नुकताच करण्यात आला. संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयात संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत वाहतूक आघाडीच्या शहर सचिवपदी आर्यन पठाण, तर शहर उपाध्यक्षपदी युनूस पठाण यांची निवड करण्यात आली. वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष शाहरुख मणियार यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या हस्ते नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे संघटनेत स्वागत करण्यात आले. यावेळी विनोद खटके यांच्या वतीने नव्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी संपर्कप्रमुख आनंद जाधव, कामगार आघाडीचे यासिन शेख यांच्यासह अमीर सय्यद, समीर शेख, समीर पठाण अरमान शेख, आजन शेख राजीक पठाण, मोहम्मद शेख जाफर शेख, अफरोज शेख बबलू शेख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शिक्षकांच्या प्रश्नांवर शिक्षक संघ आक्रमक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** शिक्षक प्रश्र्नांवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत आक्रमक झाल्याचे दिसून आले . संघाचे जिल्हा सरचिटणीस केशव गंभीरे यांनी शिक्षकांचे प्रश्र्न आक्रमकपणे मांडले. जिल्हा परिषद प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचे प्रश्र्न सुटत नाहीत, याकडे गंभीरे यांनी लक्ष वेधले. प्रश्र्नांमध्ये; चट्टोपाध्याय (१२ वर्ष) व निवड (२४ वर्ष) श्रेणीचे आदेश काढून प्रशिक्षण आयोजित करावे. चुकीच्या संच मान्यता दुरूस्तीचे प्रस्ताव संचालक कार्यालयाकडे पाठवून दुरूस्ती करावी. समायोजनापूर्वी पदवीधर (विज्ञान), मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख तसेच विस्तार अधिकाऱ्यांची पदोन्नती तात्काळ करावी. पदोन्नतीने पदे भरताना शासन निर्णयाचा विचार करून ५० टक्के व ५० टक्के पदे भरताना टीईटी उत्तीर्ण तसेच सीटीईटी उत्तीर्णचा निकाल लागेपर्यंत भरण्यात येऊ नये. भविष्यनिर्वाह निधीचे बिलेविनाविलंब काढण्यात यावी. प्रलंबित वैद्यकीय बिलेतात्काळ निकाली काढावीत. सेवांतर्गत पात्रता वाढविण्यासाठी शिक्षकांची पूर्व परवानगीचे प्रस्ताव व कार्योत्तर मान्यतेचे प्रस्ताव विनाविलंब निकाली काढावे. पं. स.च्या शिक्षण विभागातील रिक्त पदे त्वरित भरून सक्षम लिपीक देण्यात यावा. पात्र शिक्षकांना सेवेत कायम करण्याचे आदेश काढावेत. ऑनलाईन कामकाजासाठी केंद्रस्तरावर स्वतंत्र यंत्रणा राबवावी, यासह २१ मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले.

# भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या नगरसेविका कार्यशाळेस प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** महापालिकेत नगरसेवक म्हणून काम करत असताना पालिकेच्या बजेटचा अभ्यास करून विकास कामाची मागणी पाहिजे असे मत ज्येष्ठ माजी नगरसेवक अशोक गोविंदपूरकर यांनी व्यक्त केले.



भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या वतीने लातूर शाखेच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेविका साठी कार्यशाळा आयोजित केली होती. १९ नगरसेविका या कार्य शाळेला उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी डॉ अर्चना आपटे यांचे हमको मन की शक्ती देना प्रेरणा गीत म्हटले. मान्यवराचे स्वागत संघटनेच्या शहर अध्यक्ष प्रेमा बाहेती आणिसचिव संजीवनी सबनीस यांनी केले.भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या राष्ट्रीयअध्यक्ष्य कुमुदिनी भार्गव यांनी प्रास्ताविक करून संघटनेची माहिति देऊन कार्यशाळा आयोजना मागची भूमिका स्पष्ट केली.यशस्वी नगरसेवक होण्या साठी घरच्या जबाबदाऱ्या आणि नगरसेवक म्हणून करायची कामे, लोकाच्या अपेक्षा पुर्ण करताना महिलाना नियोजन करणे आवश्यक असल्याचे भार्गव यांनी नमूद केले. अशोक गोविंदपूरकर यांनी लातूर नगर पालिकेचा इतिहास, आरक्षण नसतानाही १९५२ च्या काळात केशरबाई भार्गव आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरसेवक म्हणून केलेल्या कामाची माहिती करून दिली. पक्षाच काम म्हणजे नगरसेवक पद नाही असे सांगत नागरसेविकांच्या जबाबदाऱ्या काय असतात ,आणि बजेट विषय अत्यंत सखोलपणे मांडला. माजी नगरसेवक ॲड. स्मितााताई परचुरे यांनी त्या नगरसेविका असतानाचे कांहीं अनुभव आणि पक्ष निरपेक्ष कार्य किती महत्वाचे ते सांगितले.

जेष्ठ पत्रकार अरूण समुद्रे यांनी संवाद आणि आणि संपर्क ही शक्तीस्थळे असल्याचे सांगितले.या कार्यक्रमात लातूर शाखेने प्रत्येक नगरसेविकेला स्मृतिचिन्हाने सन्मानित केले. प्रातिनिधिक स्वरूपात प्रेरणा होनराव आणि स्वाती घोरपडे यांनी मनोगत व्यक्त केले डॉ सुरेखा काळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यशाळेचे सूत्रसंचलन अनघा अंधोरीकर यांनी केले.

## विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची अभिरुची निर्माण करावी : व्यंकटेश रावलोड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** गणितासारख्या अवघड विषयाची भीती दूर करण्यासाठी अशा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. 'मॅथ्स मॉडेल अँड पोस्टर प्रेझेंटेशन' ही संकल्पना सर्व शाळांनी स्वीकारून विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाबद्दल अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी केले.

स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या वतीने आयोजित 'मॅथ्स मॉडेल अँड पोस्टर प्रेझेंटेशन' हा अभिनव उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी रावलोड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मारुती सूर्यवंशी होते.

यावेळी गणित तज्ञ प्रकाश कामाळे उपस्थित होते. परीक्षक म्हणून व्ही. एस. भोपे, एल. बी. शिरुरे, एस. जी, गुणाले, कांदे. ए. एच. यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. यावेळी कामाळे म्हणाले की, गणित विषयात अनेक महान व्यक्तींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या आयुष्यातील प्रेरणादायी गोष्टी विद्यार्थ्यांनी आत्मसात करून संशोधनाच्या दिशेने वाटचाल करावी. या उपक्रमात १२० गणिती मॉडेल्स सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने आणि सर्जनशीलतेने विविध संकल्पना मांडल्या. इयत्ता पाचवी वर्गातून जान्हवी कदम प्रथम, सुयश बुलबुले द्वितीय, दुर्वा मस्के तृतीय, अंकिता डोंगरे उत्तेजनार्थ इयत्ता सहावी वर्गातील अक्षरा लोखंडे प्रथम, पठाण शिरीन द्वितीय, वैष्णवी गायकवाड तृतीय, डांगरे राजवीर उत्तेजनार्थ इयत्ता सातवी वर्गातून अक्षरा चौंडे प्रथम, यशराज लाड द्वितीय, आर्यन पवार तृतीय, पल्लवी शेळके उत्तेजनार्थ इयत्ता आठवी वर्गातून शेख नाज प्रथम, अदिती चापुले द्वितीय, श्रेया सावंत तृत्तीय, ठोंबरे श्रावणी उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

## मनपा थकबाकीदार मालमत्ता धारकांची यादी जाहीर करणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** आर्थिक वर्ष २०२५-२६ संपण्यास अवघे दोन दिवस बाकी असतानाही काही थकबाकीदार मालमत्ताधारक कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. अशा टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांची यादीच महापालिका प्रशासन जाहीर करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

कराचा भरणा करावा, यासाठी वर्षभराच्या कालावधीत तीन वेळा १०० टक्के, दोन वेळा ८० टक्के त्यानंतर तीनवेळा ७० टक्के व सध्या ५० टक्के शास्ती माफी योजना सुरू आहे. याचा लाभ घेऊन वर्षभरात ५४ हजार १२३ मालमत्ताधारकांनी ७० कोटींच्या भरणा केला आहे. परंतु, अद्यापही काही थकबाकीदार मालमत्ताधारक कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. महापालिकेच्या कर संकलन विभागाने कर वसुलीसाठी मागील २ महिन्यांपासून जप्तीची कारवाई सुरू केली आहे. कर वसुलीसाठी आतापर्यंत जप्ती मोहीम, नळ तोडण्यात येत आहेत.

त्यानंतरही काही थकबाकीदार कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्याविरुद्ध आता धडक कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त मानसी यांनी दिले आहेत.त्यानुसार आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस ३१ मार्चपर्यंत कराचा भरणा करणार नाहीत, अशा थकबाकीदारांची नावे २ एप्रिलपासून जाहीर केली जाणार आहेत. यात पहिल्या टप्यात ७५ हजारांवरील थकबाकीदारांची नावे जाहीर करण्यात येणार आहेत. यात निवासी, दुकानदार, व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक, हॉटेलचालक, उद्योजक, बँक, पतसंस्था, मोकळ्या जमिनींचे मालक, विविध संस्था आदी थकबाकीदार मालमत्ताधारकांची नावे असणार आहेत.

थकबाकीदारांनी आपले नाव जाहीर होण्याचे टाळण्यासाठी सध्या सुरू असलेल्या ५० टक्के शास्ती सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त मानसी, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे. थकित बिल भरण्यासाठी नागरिकांना मदत होण्यासाठी ऑनलाईन सुविधा व अधिकचे कॅश काऊंटर वाढविले आहेत. सुटीच्या दिवशीही वसुली विभाग सुरू ठेवण्यात येणार आहे.

## 'उजास'तर्फे लातूरमधील आशा सेविकांमध्ये मासिक पाळीच्या आरोग्याविषयी जागरूकतेचा प्रसार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा प्रमुख उपक्रम असलेल्या 'उजास'ने लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कमध्ये 'पीरियड मेळा' या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. याद्वारे संस्थेने तळागाळापर्यंत मासिक पाळीच्या आरोग्याविषयी जागरूकता आणि स्वच्छता व्यवस्थापनाला चालना देण्याची आपली कटिबद्धता बळकट केली. या कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील २२८ आशा सेविका एकत्र आल्या. आघाडीवरील आरोग्य शिक्षक म्हणून त्यांच्या क्षमतेला बळकट करण्यावर यामध्ये लक्ष केंद्रित करण्यात आले.



केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरते मर्यादित न राहता क्षमता बांधणीच्या माध्यमातून समुदायाच्या नेतृत्वाखालील बदल शक्य करण्याच्या उजासच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा एक भाग आहे. आशा सेविकांना योग्य ज्ञान आणि साधनांनी सुसज्ज करून सर्वांत तळागाळातील महिला आणि किशोरवयीन मुलींपर्यंत अचूक, व्यावहारिक आणि प्रवादरहित माहिती पोहोचेल, हे सुनिश्चित करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमाला लातूरचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बारुरे, महिला व बाल कल्याण विभाग, लातूर येथील जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. जावेद शेख, लातूरचे उप शिक्षण अधिकारी (माध्यमिक) श्री. क्षीरसागर, लातूर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे उपायुक्त श्री. पंजाबराव खानसोले, लातूरच्या आशा जिल्हा समन्वयक संगीता डवरी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान, लातूर येथील डीएमएम आयबीसीबी श्री. अल्ताफ जिकारे यांसारख्या मान्यवरांनी उपस्थित राहून शोभा वाढवली. यावेळी समाजाच्या वर्तणुकीत बदल घडवून आणण्यात आणि मासिक पाळीच्या आरोग्याचे परिणाम सुधारण्यात आशा सेविकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर मान्यवरांनी प्रकाश टाकला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले आणि उजासच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रशंसा केली. तसेच, निरोगी समाज निर्माण करण्यासाठी आणि महिला व किशोरवयीन मुलींचे स्वास्थ्य सुधारण्यासाठी आशा कार्यकर्त्यांना अचूक ज्ञानाने सुसज्ज करणे महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी भर दिला.

पीरियड मेळा या कार्यक्रमाचे आयोजन संवादात्मक आणि सहभागी व्यासपीठ म्हणून करण्यात आले. यामध्ये मासिक पाळीच्या स्वच्छतेचे व्यवस्थापन, सुरक्षित प्रथा आणि संसर्ग प्रतिबंध या विषयांवर माहितीपूर्ण स्टॉल्स, प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शनपर चर्चा यांचा समावेश होता. मासिक पाळीबद्दलच्या खोलवर रुजलेल्या गैरसमजुती दूर करण्यावर यामध्ये विशेष भर देण्यात आला. त्यामुळे आशा कार्यकर्त्यांना समुदाय पातळीवर आत्मविश्वासाने संवाद सुरू करता येईल आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होईल.

उपक्रमाच्या धोरणात्मक दिशेची माहिती देताना 'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या, ''निव्वळ जनजागृतीकडून मासिक पाळीच्या आरोग्य व्यवस्थापनासाठी एक शाश्वत परिसंस्था उभारण्याकडे 'उजास'ची उत्क्रांती होत आहे. 'आशा' सेविकांच्या क्षमतेमध्ये गुंतवणूक करून, आम्ही सातत्यपूर्ण आणि स्थानिक बदल घडवून आणू शकणाऱ्या कुशल सामुदायिक आरोग्य समर्थकांचे एक नेटवर्क उभारत आहोत. या मॉडेलमधून विस्तारक्षमता आणि दीर्घकालीन शाश्वतता यांची सुनिश्चिती होते, तसेच शेवटच्या टप्प्यापर्यंत सेवा पोहोचवण्यास मदत होते. दिल्लीतील आमच्या अलीकडील प्रवेशासोबतच महाराष्ट्राबाहेर आम्ही जसजसा विस्तार करत आहोत, तसतसे या दृष्टिकोनामुळे आम्हाला विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये चिवट, समुदाय-केंद्रित प्रणाली तयार करणे शक्य होईल.''

या कार्यक्रमाचा समारोप एका सशक्त संदेशाने झाला. यामध्ये आशा सेविकांना आपापल्या समुदायांमध्ये स्वच्छतेच्या सवयींना प्रोत्साहन देणे, सामाजिक रूढींना आव्हान देणे आणि मासिक पाळीच्या आरोग्याविषयी मोकळ्या संवादांना चालना देणे यांसारख्या बदलाचे माध्यम म्हणून कार्य करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून उजास मासिक पाळीच्या आरोग्य व्यवस्थापनासाठी एक शाश्वत, समुदाय-आधारित परिसंस्था निर्माण करत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राबविलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील पहिल्या पाच जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने स्थान पटकावले आहे. या कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा आज मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात सन्मान करण्यात आला.



यावेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील प्रशासनिक कार्यालयांसाठी १५० दिवसांचा विशेष ई-प्रशासन कृती आराखडा कार्यक्रम जाहीर केला होता. यामध्ये प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि नागरिकाभिमुख करण्याचा हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने १ जून २०२५ पासून या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली होती. यामध्ये संकेतस्थळ सुधारणा, सेवा हमी कायदा (आरटीएस), ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि जीआयएस व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर आदी बाबींचा समावेश होता. या सर्व बाबींच्या आधारे करण्यात आलेल्या मूल्यमापनात

### १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची उत्कृष्ट कामगिरी

लातूर जिल्ह्याने २०० पैकी एकूण १७९.२५ गुण प्राप्त करून राज्यातील पहिल्या पाच उत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये स्थान मिळविले आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संपूर्ण टीमने राबवलेल्या या उपक्रमांची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली. या सन्मानामुळे लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

१५० दिवसांच्या या महत्त्वाकांक्षी ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून नागरिकांना विविध सेवा अधिक गतीने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा कल्पकतेने वापर करून कार्यालयीन कामकाज अधिक अचूक व गतिमान करण्यात आले. या उपक्रमांचे मूल्यमापन होऊन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाला राज्यातील पहिल्या पाच उत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये स्थान मिळाले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या 'टीम वर्क'मुळे ही कामगिरी शक्य झाली, हा संपूर्ण टीमचा गौरव आहे, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.